**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०१**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :०७/०५/२०१४

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र. ०१ गुरूवार दि.१५/०५/२०१४ रोजी सकाळी ११.००वाजता** अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये — अहमदनगर महानगरपालिका.

**गुरूवार दिनांक-१५/०५/२०१४ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| १ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१३-२०१४चे सुधारित व सन २०१४-२०१५चे मा.आयुक्त सादर करणार असलेले मुळ उत्पन्न व खर्चाचे अंदाज (म.न.पा.स्कुल बोर्डासह ) विचारार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- १ गुरूवार दिनांक १५/०५/२११४

ठराव क्रमांक- १ गुरूवार दिनांक १५/०५/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१३-२०१४चे सुधारित व सन २०१४-२०१५चे मा.आयुक्त सादर करणार असलेले मुळ उत्पन्न व खर्चाचे अंदाज (म.न.पा.स्कुल बोर्डासह ) विचारार्थ.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर
जा.क्र.अर्थ / अंदाजपत्रक /९२३/१४ दिनांक ०४/०३/२०१४

विषय :- सन २०१३-२०१४ चे सुधारित व सन २०१४-२०१५ चे मुळ उत्पन्न व खर्चाचे अंदाज सादर करणेबाबत

संदर्भ :- जा.क्र. अर्थ विभाग / अंदाजपत्रक /८६३ /१४ दि.१३/०२/२०१४ चे पत्र

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९५ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१३-२०१४ चे सुधारित व सन २०१४-२०१५ चे मुळ उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे.

यापूर्वी जा.क्र. अर्थ विभाग / अंदाजपत्रक /८६३/१४ दि.१३/०२/२०१४ रोजी मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सन २०१३-२०१४ चे सुधारित व सन २०१४-२०१५ चे मुळ उत्पन्न व खर्चाचे अंदाज सादर करणेकामी मा. महासभा बोलविणेबाबत कळविणेत आले होते. मात्र आता मा. स्थायी समिती दि.०४/०३/२०१४ रोजी अस्तित्वात आल्याने व सद्यस्थितीत लोकसभा निवडणूकीची आदर्श आचारसंहिता कोणत्याही क्षणी जाहीर होउ शकते.

त्यामुळे अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१३-२०१४ चे सुधारित व सन २०१४-२०१५ चे मुळ उत्पन्न व खर्चाचे अंदाज सादर करणेकरीता मा. स्थायी समितीची बैठक तात्काळ बोलाविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण२ महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज मधील ३ (क) नुसार मा.आयुक्तांनी लेखी मागणी केल्यावर मा. स्थायी समिती अध्यक्षाने २४ तासाचे आत समितीची सभा बोलाविली पाहिजे असे नमुद आहे. उत्क कलमानुसार बुधवार दिनांक ०५/०३/२०१४ रोजी या प्रयोजनासाठी मा. स्थायी समिती सभा बोलाविण्यात यावी ही विनंती.

येणेप्रमाणे मा.आयुक्त श्री. विजय कुलकर्णी सो. यांचे पत्र

--**--

मा.सभापती, स्थायी समिती यांचे निदर्शनास पत्र आणले असता, नगरसचिव, मा. आयुक्त यांचे पत्राप्रमाणे दि.०५/०३/२०१४ रोजी सकाळी ११ वा. मा. स्थायी समितीची सभा बोलविणेस यावी असा अभिप्राय मा.सभापती यांनी दिला. त्यानुसार दि.५/३/२०१४ रोजी सकाळी ११ वाजता सभा बोलविण्यात आली. तथापी केंद्रीय निवडणुक आयोगाने दि.५/३/२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजताच लोकसभा निवडणुकीची घोषणा केली. त्यामुळे आचारसंहिताही लागू झाल्याने स्थायी समितीची सकाळी ११ वाजता होणारी सभा रद्द करावी लागली होती.

आता निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पाडली असल्याने राज्यात आचारसंहिता शिथिल झाली आहे. त्यामुळे स्थायी समितीचे सभापती किशोर डागवाले यांनी बुधवारी दि.७/५/२०१४ रोजी स्थायीच्या सभेची विषयपत्रिका काढणे बाबत आदेश दिला. त्यानुसार दि. १५/०५/२०१४ रोजी सकाळी ११ वाजता अंदाजपत्रकावर विचार विनिमय करण्याकरीता सभा आयोजीत केली.

मा.स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक १५/०५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.स्थायी समिती सभागृह नविन प्रशासकीय इमारत ,औरंगाबाद रोड येथे भरली असता मा.सभापती साहेब यांनी मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी सो. यांचे सभेमध्ये पुष्प गुच्छ देवुन स्वागत केले व अंदाजपत्रकीय सभेस सुरूवात करणेचा आदेश दिला.

**मा.आयुक्त श्री. विजय कुलकर्णी :-** मा.सभापती, स्थायी समिती,मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी, कर्मचारी व उपस्थित पत्रकार बंधु यांचे सभेमध्ये स्वागत करतो. मी आज सन २०१३-२०१४ चे सुधारित व सन २०१४-२०१५ चे मुळ उत्पन्न व खर्चाचे अंदाज (म.न.पा. स्कुल बोर्डासह) मा. स्थायी समिती कडेस मंजूरी करिता सादर करीत आहे. त्यास मा.स्थायी समितीने मंजूरी द्यावी. सदर अंदाजपत्रक मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणेकामी सभेचे आयोजन करणे विषयी मी मा.सभापती, स्थायी समिती यांना पत्र दिले होते. मा.सभापती, स्थायी समिती , उपस्थित सर्व स्थायी समिती सदस्य यांचे स्वागत करतो. मी आज सन २०१४-२०१५ चा अर्थसंकल्प मा.सभापती स्थायी समिती यांच्याकडे सादर करीत आहे.

**मा.सभापती साहेब :-** अहमदनगर शहराच्या सर्वांगिण विकासाकरीता आवश्यक असणा-या महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पा करीता आजची मिटींग आयोजित करण्यात आलेली आहे. सर्वात प्रथम मी मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी, पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे समितीच्या वतीने हार्दिक स्वागत करतो.

यानंतर मा.आयुक्त साहेब यांनी अर्थसंकल्पावरील आपले मनोगत व्यक्त केले.

--**--

**मा.आयुक्त श्री. विजय कुलकर्णी :-** म.न.पा.चे स्थायी समीती सभापती त्याचप्रमाणे स्थायी समितीचे सन्माननीय सदस्य, अधिकारी ,कर्मचारी, पत्रकारबंधु स्थायी समितीची पहिली सभा असल्याने स्थायी समिती ही म.न.पा. ची महत्वाचा भाग आहे.ऐतिहासीक शहर म्हणून नगरची ख्याती आहे.सर्व जातीधर्माचे लोक येथे सलोख्याने राहतात.याची ख्याती महाराष्ट्रभर आहे.येथील नागरिकांना मुलभुत सेवा सुविधा मिळवुन देण्यासाठी आपण जास्तीत जास्त प्रयत्नशील आहोत. शहराची फेज २ ची योजना लवकरात लवकर पुर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत. घरकुल योजना जुन अखेर पर्यत पुर्ण होईल.सफाई कर्मचा-यांसाठी घरकुल योजना सुध्दा लवकरच पुर्ण होईल.केडगांव पाणीप्रश्न पुर्ण होण्याच्या मार्गावर आहे. नाटयसंकुलाचे काम देखील लवकर पुर्ण होईल. शहर स्वच्छता

आराखडयासाठी मोठा निधी आपल्याला मिळू शकतो, सावेडी मध्ये कत्तलखाना करण्यासाठी जागेचा प्रश्न लवकर मार्गी लागेल.

अर्थसंकल्पाचा अंदाज आपण सभापतींना सादर केला. ५९३ कोटींचे अंदाजपत्रक व भांडवली उत्पन्न २९९ कोटीं आहे. मालमत्ता कराकरीता जी.आय.एस.कार्यप्रणाली मुळे मालमत्ता कराच्या उत्पन्नामध्ये भरपडेल.सर्व मालमत्तांची माहिती वेबसाईटवर टाकू शकतो.त्या करीता साधारण सहा महिन्याचा कालावधी लागेल. आपले काही प्रस्ताव शासनाकडे प्रलंबीत आहेत त्यांचा पाठपुरवठा करून ते मार्गी लावण्याचा प्रयत्न करू. बस सेवा हि अत्यंत चांगल्याप्रकारे चालु आहे.फेरीवाला योजना ही लवकरच पुर्ण करू शकु. उपनगरामधील भाजीवाले व फेरीवाले यांच्या बाबतीतही लक्ष घालावे लागेल. पण उत्पन्नाच्या बाबतीत बोलायचे झाले तर, एल.बी.टी., मालमत्ताकर या बाबी महत्वाच्या आहेत. खर्चाच्या बाबतीत काटकसरीने खर्च करण्याची गरज आहे. त्यामुळे शासकीय योजनामधून आपण शहरसुधारण्याचे काम हाती ध्यावे. आम्ही काही दरवाढ सुचविली होती.परंतु ती आता विचारात घेता येणार नाही.

**मा.श्री.दिप चव्हण :-** २० फेब्रुवारी पर्यत समिती अस्तीत्वात नव्हती, त्यामुळे सभा घेता आली नाही. या कारणाने आता दरवाढ प्रस्ताव विचारात घेता येतील का ?तसेच दरवाढच्या संदर्भात २० फेब्रुवारी पर्यतच मान्यता करू शकतो का या बाबत शासनाकडून मार्गदर्शन मागवा.स्कुल बोर्डाच्या अंदाजपत्रका बाबत आपण काहीच बोलला नाहीत. जुनमध्ये शाळा सुरू होणार आहेत. नविन कायदयानुसार तुम्हाला शासनाने शहरातील सर्व शाळांचे अधीकार दिले आहेत.

**मा.आयुक्त श्री. विजय कुलकर्णी :-** स्कुलबोर्डाचे अधिकार संपले असुन आयुक्तांना अधिकार दिले आहेत.परंतु काही महानगरपालिकांमध्ये स्कुलबोर्ड निवडणुकीला स्थगीती अथवा न्यायालयात प्रकरण चालु असल्याने काय करायचे या बाबत शासन आदेश देणार आहेत. या कामासाठी एक अधिकारी व एक क्लार्क यांची नेमणुक करावी लागेल.

**मा.सभापती साहेब :-** ॲडमीशन साठी मनमानी डोनेशन मागतात, स्कुल बोर्डच्या अंदाजपत्रकाबाबत सांगा.

**मा.आयुक्त श्री. विजय कुलकर्णी :-** याची तरतुद पान नं.५५ वर आहे.आपली ५०टक्के अनुदानाची तरतुद केली आहे. शिक्षण मंडळाच्या बाबतीत २ कोटी ५५ लाक्ष एवढी तरतुद सुचविली आहे.जास्त खर्च त्याच्या पगारावर होतो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आस्थापनाचे हेड या अंदाजपत्रकात नाही.वर्गणीच्या दृष्टीकोनातुन आस्थापना सुची दिली पाहिजे का नको ?

**मा.आयुक्त श्री. विजय कुलकर्णी :-** आपल्याला ते बजेट पाठवितात. आपण ५० टक्के खर्च देतो. आपण डीटेल आकडेवारी मागवुन घेवू.

**मा.सभापती साहेब :-** आता बजेटवर चर्चा चालु होईल तेव्हा प्रत्येक डिपार्टमेंन्टच्या हेडने हजर रहाणे गरजेचे आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** किती शाळा बंद आहेत व किती चालु आहेत याची संपुर्ण माहिती पाहिजे.

**मा.सभापती साहेब :-** अंदाजपत्रकाच्या अभ्यासाला किती दिवस पाहिजे सांगा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** माहिती मिळवण्यासाठी वेळ दया.

**मा.सभापती साहेब :-** दिनांक २०-५-२०१४ रोजी सभा बोलवा. सन २०१४-१५ या वर्षाचे अंदाजपत्रक आपल्या महानगरपालिकेचे आयुक्त यांनी सादर केले आहे. अंदाजपत्रकाची माहिती दिली आहे.त्यावर चर्चा करण्यासाठी दिनांक २०-५-२०१४ रोजी सकाळी ११.३० वा. सभा पुढे सुरू होईल.

## चर्चा :-

**आज दिनांक २०/५/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता स्थायी समिती सभा अंदाजपत्रकाच्या विचारार्थ सुरू झाली.**

दि.२०/०५/२०१४ मा.सभापती यांचे आदेशाने दि.१५/५/२०१४ रोजी अभ्यासासाठी ची तहकूब केलेली सभा पुढे सुरू झाली. त्यावेळी चालू असलेल्या अंदाजपत्रकीय सभेमध्ये मा.स्थायी समिती सदस्य यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या व त्यांची मते मांडली.

**मा. सभापती साहेब :-**सभेचे कामकाज सुरू करण्यांत यावे.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पा.क्र. २६ महसुली भाग-१ अंदाजपत्रक वाचन करा.

**प्र.नगरसचिव श्री.वैदय :-** दिनांक १५/५/२०१४ रोजी अभ्यासासाठी तहकुब केलेली अंदाजपत्रकाची सभा आज दि.२०/५/२०१४रोजी पुढे सुरू करण्याचा आदेश मा.सभापती यांनी दिला आहे.त्यानुसार मा.सभापती यांच्या आदेशान्वये सभाकामकाज सुरू करण्यात येत आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** तहकुब सभा ही मा.चेअरमन यांच्या आदेशाने सुरू करत आहोत. बजेट हा अकौंट कोडच्या कोणत्या सेक्शन ने चालू केला जातो.

**मुख्यलेखाअधिकारी श्री.शेलार :-** महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ व महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९५ प्रमाणे केलेला आहे .

**मा.श्री.दिप चव्हाण :-** कलम ९५ वाचा.

**मुख्यलेखाधिकारी श्री.शेलार :-** स्पेसीफीक कलमानुसार आधार घेउन आपण बजेट तयार करतो ९५ मधील तरतुदी नुसार 'आयुक्ताने दरवर्षी ,महानगरपालिका वेळोवेळी विहीत करील अशा तारखेस किंवा तारखेपुर्वी स्थायी समिती वेळोवेळी मान्य करील अशा नमुन्यात सादर केला पाहीजे ' ही तरतूद वाचून दाखविली.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकाच्या संदर्भात हा अकौंट कोड ७१ चा कुठल्या कायद्याअंतर्गत आहे.आपण जे बजेट मांडले आहे ते कोणत्या अकौंट कोडने.

**मुख्यलेखाधिकारी श्री.शेलार :-** सन १९७१ च्या अकौंट कोडने.

**मा.श्री. दिप चव्हाण:-**अर्थसंकल्प अंदाजपत्रक २०१४-१५च्या संदर्भात बोलत नाही,महानगरपालिका झाल्या नंतर एक पोस्ट मुख्य लेखाधिकारी व एक पोस्ट चीफ ऑडीटरचे पद निर्माण झाले आहे. आपण सांगीतल्याप्रमाणे १९७१ च्या कोड प्रमाणे चालत आलेली परंपरा महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ प्रमाणे चालू आहे. ज्या महानगरपालिका अकाउंट कोड वापरीत नसतील तर कोणता कोड वापरावा. कामकाज करण्यासाठी मा.शासनाने वेळोवेळी याबाबत डायरेक्शन दिलेल्या आहेत. सन २०१३-१४ चा ऑडिट रिपोर्ट दिला का ? सोबत आम्हाला कायदयाच्या नियमाप्रमाणे सन २०१२-१३ व सन २०१३-१४ चा ऑडिट रिपोर्ट का दिला नाहि.

**मा.सभापती साहेब -** सन २०१२ -१३ चा ऑडिट झाले का सांगा.

**मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** सन २०११-१२ चे ऑडिट झाले आहे.सन २०१२-१३ चे ऑडिट चालु आहे.ऑडीट रिपोर्ट दिलेला नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** तुम्ही दिलेले आकडे कोणत्या आधारे आयडेंटीफाय होवू शकतात.चुकीची पध्दत संस्थेला माफ नाही. सन २०११-१२ चे ऑडीट झाले आहे. त्याचा सन २०१२-१३ च्या बजेट ला उल्लेख नाही. सन २०१२-१३ चे ऑडिट झाले आहे. आयडेंटीफीकेशनच्या संदर्भात तुम्ही मला काही दिलेले नाही. लेखापरिक्षणाचा अहवाल देणे कायदयाने बंधनकारक आहे.तुम्ही जे बजेट केलेले आहे.ते सिंगल एन्ट्रीपध्दतीने केलेले आहे. महाराष्ट्रमहानगरपालिका अधि.१९४९ चे कलम ९४ (२) अन्वये असे आहे कि, स्थायी समिती जे जे निर्देश देईल त्या प्रमाणे कार्यवाही केली पाहिजे. सन २०११-१२ सन२०१२-१३ चे बजेट कोणी तयार केले.

**श्री.अजिंक्य बोरकर :-** ऑडीट रिपोर्ट असल्याशिवाय व्हेरीफाय होणार नाही.

**मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** कलम ९५ मध्ये असे म्हणले आहे की, आयुक्तांनी अंदाजपत्रक सादर करावयाचे असते.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** सन २०१३-१४ ला अर्थसंकल्पामध्ये जे नमुने सुचविले होते ते दाखवा.

**मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** आता जो अर्थसंकल्प सादर केला तोच नमुना आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सन २०११-१२,१२-१३ लेखापरिक्षणामध्ये जे पॉईट घेतले तो लेखापरीक्षण अहवाल अंदाज पत्रकासोबत आमच्या समोर आला पाहीजे. हे कायद्याने बंधनकारक आहे. तोपर्यंत बजेटची मिटींग होत नाही.तुम्ही जे जमा नावे चे बजेट केले आहे, ते सिंगल एंट्रीने केले आहे. वास्तवीक पहाता महानगरपालिकेच्या कलम ९४(२)नुसार आहे का. त्यानुसार स्थायी समितीने जे जे निर्देश दिलेले आहेत ते दाखवा. नमुना ७व २८प्रमाणे असल्याचे नमुद केले आहे ते खरे आहे का. हे बजेट तुम्ही कोणत्या मॅन्युअल खाली दिले आहे.नॅशनल अकांउट मॅन्युअल १९६०चे कलम २८ प्रमाणे असल्याचे नमुद केले आहे हे खरे आहे का ?

**मुख्य लेखाधिकारी,श्री.शेलार :-** सांगता येत नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** कायद्याप्रमाणे बजेट नसेल तर बजेट होउच शकत नाही.

**मुख्य लेखाधिकारी, श्री.शेलार :-** कलम ९५ मध्ये असलेल्या मा.स्थायी समिती वेळो वेळी मान्य करील अशा नमुन्यात च्या तरतुदींनुसार सादर केले आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सन २०१०-११ ला मा.स्थायी समितीने अर्थसंकल्प सुचविले त्या बजेट मध्ये काय नमुने सुचविले ते सांगा. आता जो नमुना आहे ते सांगा.तुम्ही सन २००३ पासुन आपण आकौंट कोड १९७१ च्या पध्दतीने अर्थसंकल्प सादर केला आहे. मा.शासनाचे ५ जुलै २००५ चे परिपत्रक असुन आपण त्याची दखल घेतलेली नाही. तुम्ही स्थायी समितीला वेडयात काढले आहे. माझे याला ऑब्जेक्शन आहे. तुम्ही फक्त कलम ९५ कायद्याच्या आणी मा.शासनाच्या निर्देशांनुसार तुम्ही केले आहे.डबल एंट्री साठी आपण विभाग निर्मीती केली होती. तो विभाग काय करतो आहे. त्यामुळे गेली ९ वर्ष तुम्ही नगरच्या जनतेला, नगरसेवकांना वेडयात काढत आहात. याची नोंद इतीवृत्तात घ्यावी. या करीता आपण डबलएन्ट्री विभागाची निर्मीती केली आहे. तेथे सध्या प्रमुख कोण आहे?

**मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** ते आता अकौन्ट विभागात मर्ज केले आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-**त्यांना डबल एन्ट्रीचे नॉलेज आहे. जाणुन बुजुन सन२००५च्या नियमाने बजेट करत नाही. या ठिकाणी जबाबदारी निश्चित करण्यासाठी आज आयुक्तांची उपस्थीती कायदयाने आवश्यक आहे. तसा संकेत आहे. आयुक्त हजर नसतील तर त्याला काहीच अर्थ नाही. मागील लेखापरिक्षण अहवाला दिल्यानंतरच मी पुढील मुद्दे मांडील. या ऑडीट रिपोर्ट मध्ये प्रत्येक डिपार्टमेंन्ट

वाईज ऑबजेक्शन आहे. तसेच नॅशनल मॅन्युअल नुसार बजेट स्टॅडींग कमीटीला सादर करणे बंधनकारक आहे. या बजेटमध्ये बॅलंन्स शीट आहे का ?

**मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** इनकम-एक्सपेंडीचर अकौंटट आहे का ?

**मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** कॅश फ्लो विवरण पत्र आहे का

**मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** रिसीट ॲण्ड पेमेंन्ट अकौन्ट विवरण पत्र आहे का

**मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** लेखा परिक्षण टिपणी आहे का ?

**मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** या सर्व गोष्ट मला दया अभ्यास करूदया मग बजेटवर चर्चा करू.

**मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे :-** महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९मधील कलम ९४मधील तरतुदी अन्वये वार्षिक लेखे आणि कलम ९५अन्वये बजेट कशा पध्दतीने सादर करावयाचे याची कार्यवाही दिलेली आहे.त्यानुसार मुख्य लेखाधिकारी यांनी तयार करून मा.आयुक्त यांचे मान्यतेने सादर केले आहे.कलम ९५ मध्ये बजेटच्या तरतुदी आहेत. आजचा विषय अर्थसंकल्पीय तरतुदींचा आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** तुम्ही वेगळे काय सांगीतले.कलम ९४ व ९५ बाबत तुम्ही सांगीतले जमा व खर्च ॲन्युअल अकौन्ट तुम्ही ठेवले का ? मॅन्युअल अकाउंट शिवाय पुढे जाणार नाही. कलम ९५ काय म्हणते.

**मा.उपायुक्त सा डॉ. डोईफोडे -** यासोबत ठेवणे अपेक्षीत नाही.

**मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे :-** कलम ९५ नुसार बजेट तयार करून आयुक्त यांनी स्थायी समिती मान्य करील अशा नमुन्यात सादर करावयाचे असते.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** सन २०१२-१३,२०१३-१४ चा लेखापरिक्षण अहवाल दया,

**मुख्यलेखाअधिकारी श्री. शेलार :-** सन २०१२-१३ चे लेखापरिक्षण चालु आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** इंटरनल लेखापरिक्षण अहवाल दया.

**मुख्य लेखा परिक्षक श्री. अनारसे :-** महानगरपालिकेस लेखापरिक्षण अहवाल सादर करणार आहे.

**मा. उपायुक्त डॉ. डोईफोडे :-** आपण वार्षीक लेखे मागू शकता, अंदाजपत्रकाबरोबर द्यावेत असे म्हणू नका.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** त्यांना काहीच माहिती नाही, नगरपालिकेचे अकौन्ट कोडच डोक्यातुन काढून टाका. पुण्यात,नाशिक,नागपुर या शहरांमध्ये अशी उत्तरे चालत नाहित.ही नगरपालिका नाही.व विकास डोक्यात ठेवा.नगरचे नुकसान करू नका.ऑडीटमध्ये दलीत वस्ती निधीवर ठपका आलेला आहे. टी.डी.आर चे ऑबजेंक्शन आहे. जे काही चालले त्याचे आम्हाला काही घेणे देणे नाही, कायद्याप्रमाणे आजची मिटींग आहे. तुम्हाला जर आठवत नसेल तर ते शहराचे दुर्भाग्य आहे. तुम्ही एवढा पगार घेता. हे तुमचे काम आहे. आम्ही लोकप्रतीनिधी आहोत.स्टॅण्डींग कमिटी मध्ये ऑडीट रिर्पोट सादर करणे बंधनकारक आहे. देवु का तुम्हाला अकौन्ट चे नांव कुणाला जबाबदार धरणार ते कळू दया. इंटरनल ऑडीटरने काय शेरा मारला दाखवा मला.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे -** ऑडीटमध्ये कोणाला जबाबदार धरले हे तर कळू द्या.

**मा.उपायुक्त डॉ.डोईफोडे -** वार्षीक लेखे व ऑडीट संदर्भात जे पाहिजे ते मागवून देतो. मी माझा अहवाल देणार आहे. त्याचा बजेटशी काही संबंध नाही.

**मुख्य लेखा परिक्षक श्री. अनारसे -** अर्थसंकल्पात कलम ९५ च्या अनुषंधाने मा.आयुक्त यांनी सादर केला आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** यासोबत टीपणी दिलेली नाही. आम्ही जे कर दर वाढवून द्यावयाचे ते कशाचे आधाराने. इंटर्नल ऑडीटरने काय शेरा मारला. सादर करताना तो यासोबत नाही.

**मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** ऑडीट रिपोर्ट नुसार स्वतंत्र सादर करू.

**मुख्य लेखा परिक्षक श्री. अनारसे -** सन २०१२-१३ चे लेखे तपासणी साठी सादर झाले आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** काय झाले ते सांगा लेखा विभागाकडून का दिले नाही. कलम १०६ प्रमाणे बंधनकारक असतांना तुम्ही का नाही केले.

**मा.उपायुक्त डॉ.डोईफोडे :-** कलम १०६ (३) नुसार प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्या नंतर शक्य तितक्या लवकर नगरपालिका मुख्य लेखापरिक्षकाने महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा.स्थायी समितीस सादर केला पाहिजे अशी तरतूद आहे.

**मुख्य लेखापरिक्षक श्री.अनारसे :-** कालच माझेकडे सन २०१२ - १३ पर्यंतचे वार्षीक लेखे सादर केले आहेत. सन २०१३-१४ चे लेखे लेखा विभागाकडून तयार होताच लेखापरिक्षण विभागाकडून तपासून मा.आयुक्त यांचे कडे सादर केले जातील.

**मा.मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :-** सन २०११-१२ चे सादर करून मंजुर झाले.सन२०१२-१३ चे काम चालु आहे.सन २०१३-१४ साठी एक महिण्याची मुदत दया.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सन २०१२-१३ च्या संदर्भात श्री.जाधोर सो यांनी तसेच सन २०१० पासून केलेल्या लेखापरिक्षण कामाचा अधिकारी व कालावधी याचा तपशील दिला. सन २०११-१२ चे लेखापरिक्षण मा.महासभेत आले नाही. त्याबाबत तुम्ही पत्र द्यावयास पाहीजे.

**मुख्य लेखाधिकारी श्री.शेलार -** अकाउंट व ऑडीट हे वेगवेगळे विषय आहेत.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** सन २०११-१२ मध्ये ऑडीट ऑब्जेक्शन आले तर त्याला कोणाला जबाबदार धरणार.

**मा.उपायुक्त डॉ.डोईफोडे :-** कारवाई प्रस्तावीत करता येईल.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** जमा खर्चाची चर्चा कशाच्या आधारे करू रूपये ३ कोटी ४१ लाख ५८ हजार आताच तुमच्याकडे डिटेल कसे येतील.

**मा.उपायुक्त डॉ.डोईफोडे :-** लोकल फंडचा ऑडीट रिपोर्ट आधी देतो. वार्षीक लेखे तपासून देतो.२०१२-१३ चे श्री.अनारसे यांचे कडे आहे ते देतो. व २०१३-१४ करीता मुदत द्या. या वर्षामध्ये जमा काय होणार ते देउ शकतो, प्रत्येक स्किमचे डिटेल्स ते ते विभाग प्रमुख देतील. ज्या ज्या अनपेड रकमा आहेत त्याबाबत देखील ते माहिती देतील. एकही वर्षाचा मुद्दा लपवून ठेवणार नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- विकास निधी संदर्भात किती तरतूद केली हे मला माहिती आहे. गांडूळ खत प्रकल्पाला मंजूरी नसताना बी.ओ.टी.वर देता येईल का. ऑडीट पॉइंटवर चर्चा केली तर पुढील मंजूरी देता येईल.

**मुख्य लेखाधिकारी श्री.शेलार :-** बजेट संसदेमार्फत सादर करताना कॅगचा रिपोर्ट आला नाही म्हणून बजेटचे काम थांबवत नाहीत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** संसदेत बजेट सादर करण्याच्या कायदेशीर कलमांची माहिती दिली.

**मा.उपायुक्त (सा) डॉ.डाईफोडे** - अर्थसंकल्पाची चर्चा थांबवू नये.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** अर्थसंकल्पासोबत ऑडीट रिपोर्ट सादर करू नये अशी तरतुद आहे का.

**मुख्य लेखाधिकारी,श्री.शेलार:-**कायद्याने असे कोठेही म्हणाले नाही.

**मा.उपायुक्त (सा) डॉ.डोईफोडे :-** स्वतंत्रपणे द्यावयास तयार आहे.

**मुख्य लेखाधिकारी श्री.शेलार :-** सन २०१३-१४ चे वार्षीक लेखे देण्यास १ महिना व २०१२-१३ चे वार्षीक लेखे देण्यास ८ दिवस लागतील तपासणी बाकी आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ऑडीट ऑब्जेक्शन कोणत्या मुद्यांवर आहे ते तरी आम्हाला कळू द्या.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** काही महत्वाचे मुद्दे १ तासात द्या. आम्ही १ तासाने पून्हा बसू. आम्ही संस्थेचे विश्वस्थ आहोत. ऑब्जेक्शन आम्हाला कळू द्या.

**मा.श्री.सचिन जाधव :-** महत्वाच्या मुद्यावर माहिती द्या.

**मा.सभापती साहेब:-** प्रशासनाने माहिती उपलब्ध करून देण्यासाठी सभा १/२तास तहकूब करण्यात येत आहे. (वेळ दु.१२.४५).

**दुपारी १.१५ वा.सभा पुढे सुरू**

**मा.उपायुक्त (सा.)डॉ.डोईफोडे :-**मा.स्थायी समितीस वार्षिक लेखे तपासणीसाठी हवे होते प्रशासनाच्या वतीने सन २०१०-२०११ चे कलम १०६ अन्वये लेखे मंजूर झालेले आहे. सन २०११-२०१२ चे वार्षिक लेखे तयार करून ऑडीट तपासणी साठी दिले आहे. सन २०१३-२०१४ चे काम चालू आहे. सन २०११-१२ चा गव्हर्नमेंट ऑडीटचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्याचे अनुपालन नियमानुसार स्थायी समितीसमोर ठेवणार आहोत. वार्षिक टिपण्णी सगळयांना दया.

**मा.सभापती साहेब :-** सन २०११-२०१२ चे दया. पान नं.२६ पासून सुरू करायला काय हरकत आहे.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं.२६ वसुली विभाग अ.क्र.१ महसुली जमा सन २०१४-१५ ची तरतुद वाचुन दाखविली.

पान नंबर- २७ अग्निशमन विभाग आकेडवारी वाचन अ.क्र.१-१ ते ९, अ.क्र-.३ इतर कुत्र्यावरील कर

**मा.श्री. दिप चव्हाण व मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** कुत्र्यावरील कर म्हणजे काय

**वृक्षधिकारी श्री. म्हसे :-** पाळीव कुत्र्यावरील कर

**मा.श्री. दिप चव्हाण :-** कुत्रा पाळण्यासाठी परवाना कोण देत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** किती जणांनी परवाना घेतला.

**वृक्षधिकारी श्री. म्हसे :-** साठे मॅडम कडे परवाना देण्याचे काम आहे.

**मा.सभापती साहेब :-** कुठे गेल्या साठे मॅडम

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पारगमन शुल्क पान नं.२९ , गाळे भाडे , मंगल कार्यालय

**मा.श्री. दिप चव्हाण :-** मार्केट कोणाकडे आहे.

**मा. सभापती साहेब :-** गाळे हस्तांतर १ कोटी धरले परंतु लोक तयार असताना तुम्ही गाळे हस्तांतर करू देत नाही. हे पैसे कसे वसुल होतील. परत पान नं.२६ पासून चालू करू का ?

**मा.श्री. दिप चव्हाण :-** सन २०१४-२०१५ जे सोबत जोडल आहे ना पान नं.५ वाचा. मार्गदर्शन मागवले तर ते वाचा मग प्रस्ताव क्र.१ डॉ. राजूरकर प्रस्ताव वाचतील.

**मा.उपायुक्त (सा)डॉ. डोईफोडे :-** मार्गदर्शन मागवले आहे ते अद्याप मिळाले नाही.

**आरोग्याधिकारी डॉ. राजूरकर :-** आरोग्य विभागाकडून ४ प्रस्ताव क्र. १ ,व ३ जो आहे तो दर कमी करणेबाबत २. दुर्धर निधी बाबत ४. दाखले दुरूस्तीकामी शुल्क आकारणेबाबत. केसपेपरचे दर वाढवले त्यामुळे रुग्ण संख्या कमी झाली त्यामुळे दर कमी करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

**मा.श्री. अजिंक्य बोरकर :-** कमी म्हणजे किती कमी करायला पाहिजे.

**आरोग्याधिकारी डॉ. राजूरकर :-** केसपेपर - रू.५/- ठेवणे

**मा.श्री. दिप चव्हाण** :- ज्याचे दर आणि कर ठेवले आहे त्या पत्रव्यवहाराचे काय झाले. ॲक्ट वगळून मंजुरी देण्यात येत आहे. असे कशावरून टेक्नीकल प्रॉम्ब्लेम तुम्ही पाठवला. उत्तर आले नाही. सध्या चर्चा करायची नाही. औषधाचे वार्षिक टेंडर होते ते किती होते.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ.डोईफोडे :-** अद्याप मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही. औषधाचे स्टोअरचे वार्षिक टेंडर असते.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** एक्स रे च्या संदर्भात मशीन कोण ऑपरेट करते डॉक्टर व्यवस्थित आहे का १ ते ४ वाढवलेले आहे.

**मा.सभापती साहेब :-** फिरता दवाखाना बाबत माहिती सांगा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** प्रस्ताव क्र. २ बाबत महापौर दुर्धर निधी आरोग्य विभाग प्रमुख माहिती सांगा.

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** महापौर दुर्धर निधीमधून आर्थिक दृष्टया सक्षम नसलेले म्हणजे तहसिलदार यांच्या दाखल्याप्रमाणे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** हा निधी कधी सुरू झाला. ठराव कसा झाला ते सांगा.

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** सन २००४ पासून

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** उत्पन्न कुणी ठरवल. सुचक, अनुमोदक कोण होत ते सांगा.

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** हया मदतीचे फॉर्म महापौर कार्यालयातून वितरीत केले जातात. त्यानंतर आरोग्य विभागाकडे तपासणीसाठी फॉर्म येतो. नंतर ऑडीट होवुन अकौंट विभागामध्ये येतो.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** ठराव दाखवा ना ?

**मा.श्री. अजिंक्य बोरकर :-** आतापर्यत किती जणांनी त्याचा उपभोग घेतला ते सांगा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** विशेष निधी ही ॲक्ट मध्ये आहे त्याची नियमावली तयार करावला पाहिजे. आजपर्यत जो खर्च केला. त्याला सन २०१२-१३ मध्ये ऑडीटमध्ये ऑब्जेक्शन आले आहे.

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** नियमावली करा हा आक्षेप आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** माझ्यावर गुन्हा दाखल झाला. एका लाभार्थीचा चेक मागण्यासाठी आलो होतो.

**मुख्यलेखाअधिकारी श्री. शेलार :-** महापालिका सक्षम नसताना हा निधी चालू केला शहरातील दानशूर व्यक्तींकडून मदत घेवून ही योजना कार्यान्वीत करावी.

**मा.श्री. दिप चव्हाण व मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** हे रोग कोणते आहेत. त्याला आर्थिक दृष्टया दुर्बल हे ठरवणार कसे. प्रस्तावाबरोबर यादी दिली नाही.

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** ह्दयविकार झटका, गर्भपात, गॅस्ट्रो, कोमा, गायनॅलॉजीकल इ. महापौर कार्यालयाकडून फॉर्म वितरीत केला जातो. त्यांच्या मार्फत दुर्बल घटक ठरवला जातो.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** चेक नाकारायचा अधिकार कोणाला दिला.

**मा.उपायुक्त(सा.) डॉ.डोईफोडे :-** जे कायदयामध्ये नाही आहे ते आपण आता नियम ठरवून घेत आहोत. महापौरांचे अधिकार फक्त शिफारशी पुरते राहिल. आरोग्य विभाग प्रकरण तयार करील मुख्यलेखापरीक्षक यांचेकडुन तपासून उपायुक्तांकडे सही साठी प्रकरण जाईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ते कागदपत्र कोणते.

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** फक्त दुर्धर रोग नाही तर जन्मजात आजार व अपघाती आजार.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** दारिद्रय रेषेखालील कार्ड व मतदार यादी नांव घेवू नका. याबाबत चर्चा करुन ठरवू.

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** २०००० रुपयापर्यंत अर्ज येतात. ५० हजार रुपयांचे पण येतात. याबाबत किती मदत द्यायची याचे धोरण ठरविणे आवश्यक आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** फक्त रेशन कार्डची अट ठेवा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** या योजनेत ऑडीट पॉईंट आल्याने हा दुरुस्ती प्रस्ताव आहे. त्याचे शिर्षक बदलायचे आहे. या दुरस्त्या कायदेशीर असतील त्याच करा.

**मा.सभापती साहेब व मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ही योजना सर्वांनाच लागू करा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हा विषय महासभेत घेवून तेथे चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घ्यावा. त्याचे अधिकार महासभेस द्यावेत.

**मा.सभापती साहेब :-** या विषयाचे अधिकार महासभेस द्यावेत.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं. २२ वर गोषवारा आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आता नगरपालिकेचा गोषवारा आहे हा किती दिवस चालवायच फॉर्मेट आलेले आहे. नाशिक व पुणे महानगरपालिकेचे फॉर्मेट मध्ये आहे. त्याप्रमाणे करा. १० वर्षापासुन प्रयत्न नाही आज चर्चा केली नाही तर ते थांबणार नाही. पुढचे बजेट सहा महिन्या नंतरच ते रिपोर्ट करून आम्हाला सादर करतील पान नं. २२ व २३ नोव्हेंबरच्या बजेटला सुधारित नमुना व डबल एंट्रीच्या अंतर्गत नमुन्यामध्ये करण्यात येईल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** एकुण कुळ किती ?

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** ९३ हजार १३४ चारी झोनचे

**मा.श्री. दिप चव्हाण :-** सन २०१२-२०१३ ला किती प्रॉपर्टी आहेत.

**श्री. झिने :-** ८९,०००

**मा.श्री. दिप चव्हाण :-** सन २०१३-२०१४

**श्री. झिने :-** ९३,०००/-

**मा.दिप चव्हाण :-** बांधकाम परवानग्या किती दिल्या डिंमाड किती होती.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** झिने ब-याच घरांना आकारणी केली जात नाही.

**श्री. झिने :-** ३५ कोटी चालू डिमांड , थकबाकी १२० कोटी ४४ कोटी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पान नं.२६, रू.३३४५२२०००/- सन २०१३-२०१४ ची २६८२०००००/- अपेक्षित किती. त्यात शास्ती किती.

**मा.सभापती साहेब :-** जमा किती , १२ कोटी मध्ये शास्ती किती ?

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** १२ कोटी ३४ लाख वसुल, ३ कोटी ८८ लाख

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** ३५ कोटी ८७ लाखच्या अगेन्स किती झाले.

**मा.श्री. दिप चव्हाण** :- पान नं.२९ वर अ.क्र.१० बघा वाचन

**श्री. झिने :-** १५० केसेस फक्त पेंडींग आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** सन २०१२-२०१३ची अपेक्षीत २६ कोटी होती.४०% वसुली झाले ६०% वसुल होत नाही. त्यामुळे बजेट कोलमडत तुम्ही काय काम केले ते सांगा.

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** आमचे कर्मचा-यांना जनगणना , आर्थिक गणना, निवडणूक या कामात होते.त्यामुळे आम्हाला पूर्ण वेळ कर्मचारी मिळाले नाहि.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** नोंदी नसलेले घर किती

**मा.श्री. दिप चव्हाण :-** तुम्ही जे म्हणतो ते कारण पटत नाही. तुमची वसुली होत नाही कर्मचारी नाही हे एक कारण होत नाही.

**श्री. झिने :-** कर्मचारी बिगारी आहे. क्लार्क स्टाफ नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** जेव्हा आपल्याकडे रजिष्टर ब्रॅच होती त्यावेळी किती स्टाफ होता.

**श्री. झिने :-** ४ ते ५ कर्मचारी स्टाफ होता. त्यांच्या मार्फत किती काम होणार.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** तुम्ही जे झोन पाडले. कोणत्या झोनमध्ये किती थकबाकी आहे. प्रत्येक झोनला वसुली अधिकारी आहे कर्मचारी आहे. प्रत्येक झोन अधिका-याचे सांगा.

**प्रभाग अधिकारी श्री. सोनवणे :-** प्रभाग समिती क्र. १ कर्मचारी बिगारी आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** तुम्ही त्याला वसुली करायला पाठवता का ? प्रभाग क्र.१ नंबरची आकडेवारी सांगा ? तुम्ही त्याला वसुली करायला पाठवता ना चारही झोनला तुम्ही आकडेवारी त्यांना पाहिजे ना ? त्यांनी त्यांची आकडेवारी आणायला पाहिजे ना ? सन १९९५-९६ पासून डिमांड रजिष्टर नाही आहीत. मी नगरसेवक या नात्याने मी डिमांड रजिष्टरचा प्रश्न उपस्थित केला होता.४ झोनची वुसली होत नाही तर झोन पाडून झोनचा उपयोग काय ? प्रत्येक झोन ऑफिसरला सारखे बाहेर जाव लागते आणि तुम्हाला वसुली करिता डिमांड रजिष्टर केल्याशिवाय वसुली होणार नाही.

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** सन २०१३-२०१४ डिमांड ४२ कोटी ३ लाख वसुल १२ कोटी ४५ लाख

**मा.श्री. दिप चव्हाण :-** १५ कोटी पैकी ४ कोटी आले तर १० कोटी वसुल न होण्या मागचे कारण काय ?

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** कर निरीक्षक फॉल अप घेतो वसुली चालू आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** १ नंबर झोनला कुळ किती ?

**प्रभाग अधिकारी श्री. सोनवणे :-** २१०००

**मा.श्री. दिप चव्हाण :-** हे पैसे जर आले नाही तर काय होणार दोन नंबर झोनची डिमांड व थकबाकी किती.

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** १० कोटी डिमांड पैकी ३ कोटी वसुल ७००० लोकांची थकलेली आहे. बेहेरे साहेबांनी १ एप्रिल पासून आम्हाला ज्या सुचना केल्या त्यानुसार आमचे नियोजन चालू आहे. त्यानुसार आम्ही पूर्णपणे वसुल करण्याचा प्रयत्न करू बिल वाटप करण्यास उशीर झालेले आहे

**मा.श्री. दिप चव्हाण :-** ७ कोटी वसुल होत नाही त्याच्याशी आमचा काही संबंध नाही.

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** काही धार्मिक स्थळे आहेत.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** धार्मिक स्थळांना कर माफ आहे.

**मा.सभापती साहेब :-** धार्मिक स्थळांना कर लावता कशाला ? कायद्यातील कलम १३२ नुसार. धार्मिक स्थळे, मंदिर, मस्जीद, गुरुव्दारा, चर्च इत्यादी सर्व प्रार्थना स्थळांना कर आकारणी करु नये.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** तुमच्याकडे डाटा आहे का ? किती मंदिर, किती चर्च , किती मशीद आहे. टि.पी. चे जोशी सर्व्हे झाला ना किती स्थळ आहे. याची माहिती ओ का १३२ सेक्शन खाली टिपणी करा ऑफिस रिपोर्ट पाहिजे. झोन नं.३ ची परिस्थिती

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** ६ कोटी ९४ लाख डिमांड पैकी वसुल १ कोटी १९ लाख वसुल
प्रभाग समिती क्र.४ १५ कोटी ४० लाख डिमांड पैकी ३ कोटी ३२ लाख वसुल

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** १२ कोटी ३६ लाख ४ झोनची वसुल

**मा.श्री. दिप चव्हाण :-** १२ कोटी ३६ लाख कर्मचा-यांचा आस्थापना खर्च ३६ कोटी अपेक्षीत आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** १० % सुट घ्यायची आहे त्यांना एप्रिल, मे , जून पर्यत सुट दया लोकांना बिल मिळोल नाही.

**मा.उपायुक्त (कर)श्री. बेहेरे :-** १००% बील वाटप होत नाही ७० % वाटप झाले

**मा.श्री. दिप चव्हाण :-** वसुली कर्मचा-यांचा आस्थापना खर्च

**आस्थापना प्रमुख श्री. खोलम :-** २ कोटी ८९ लाख

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आस्थापनावर किती खर्च असावा किती बंधनकारक आहे. वसुली क्लार्क व वसुली हेडक्लार्क कुठे काम करतात. कार्यक्षम कर्मचारी किती.

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** ९० कर्मचारी , ४ झोनचे मिळून

**श्री. झिने :-** वसुली लिपिक व बिगारी यांच्यात फरक पडतो. वॉर्डमध्ये फिरताना त्यांना अडचणी येतात

**मा.श्री. दिप चव्हाण :-** त्यांना प्रमोशन दया , टीमवर्क तयार करा.

**मा.श्री. अजिंक्य बोरकर :-** दर महिन्याला मिटींग घ्या.

**मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :-** एकूण शहरामध्ये ९० वॉर्ड आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** वसुलीची मिटींग होते तेव्हा या विषयावर फोकस होत नाही का ? एल.बी.टी. कडे १५ लोक काम करतात. तर २६० लोक नाक्याचे कुठे काम करतात. नवीन ग्रामपंचायत समाविष्ट झाले निघले कर्मचारी गेले कुठे मार्केट खाजगी तत्वावर दिले तर ते कर्मचारी कुठे गेले जर ७०० कर्म चा-यांपैकी २०० कर्मचारी वसुलीला दिले तर वसुली नक्की होईल २०१४ मध्ये १४ लोक रिटायर्ड झाल्यानंतर तुम्ही कसे काम करणार, स्टाफींग पॅटर्नचा याच्याशी काही संबंध नाही रेग्युलर माणूस भरायला पाहिजे.

**मा. सभापती साहेब :-** उदया दि.२१/०५/२०१४ रोजी सकाळी ११.३० वा सभा उपस्थित रहावे.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-**उदया दि.२१/०५/२०१४ रोजी सकाळी सगळे खाते प्रमुखांनी माहितीस उपस्थित रहावे.

**दिनांक २१/०५/२०१४ रोजी सकाळी ११.३० वा मा. स्थायी समिती सभागृह येथे अंदाजपत्रक बाबतच्या सभेस पुन्हा सुरूवात झाली.**

**मा.सभापती साहेब :-** आपण कालाची बैठकीमध्ये काय सुचना दिल्या होत्या. त्यानुसार माहिती आणली का ?

**मा.श्री. दिप चव्हाण :-** बजेटचे जे कायदे आहे. त्यामध्ये मागील ३ वर्षाचे जे आकडे आहे. ते धरून पुढील कार्यवाही करता येते तीन वर्ष मागे गेले तर सन २०१२-२०१३ ची जमा १४ कोटी ९० लाख ३५ हजार ६८६ एवढी आहे याची डिमांड किती होती. सन २०१२-२०१३ ची डिमांड सांगा सन २०१२-१३ ची संकलीन कराची रक्कम किमान ३५ कोटी धरले होती. त्यापैकी १४ कोटी ९० लाख ३५ हजार ६८६

वसुल पात्र रक्कम प्रत्येक वेळी तुम्ही जी धरली त्यापैकी ४०% रक्कम वसुल झाली. बजेटमध्ये धरताना आपण १००% धरतो त्यामुळे बजेटचे आकडे फुगतात तुम्ही गेल्या २००४ पासून डिमांड रजिष्टर पासून कुठेही सुधारणा झाली नाही गोषवारा ४३५७०२००० इतकी रक्कम धरली बजेट अकौंटच्या अनुषंगाने गृहीत रक्कम धरता येत नाही.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** मागचा ट्रेंड लक्षात घेतला पाहिजे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** महिला व बाल कल्याण , दलित वस्ती, अपंग योजना यांना किती धरावा, रियल बजेट करत असताना मा. शासनाचे आदेश लक्षात घेता ५% धरणे आवश्यक आहे. जोपर्यंत वसुल पात्र रक्कम आपल्याकडे येत नाही. तोपर्यंत शहराचा विकास होउ शकत नाही.

**मा.सभापती साहेब :-** नागापूर, बोल्हेगांव , सावेडी या भागातील नागरिकांची सोय व्हावी या दृष्टीने या तिन्ही भागांना मध्यवर्ती,जवळ असेल अशा ठिकाणी महिला व लहान मुले यांच्या करिता कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या धर्तीवर प्रसुतीगृह व बालरूग्णालय उभारणाच्या दृष्टीने महिला व बाल कल्याण समिती ने पुढाकार घ्यावा.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** रिॲप्रोप्रिएशन बजेट नोंव्हेंबर मध्ये तयार करणे योग्य असते. गेल्या वर्षी निवडणुकामुळे ते झाले नाही. यावर्षी डिसेंबरमध्ये रिॲप्रोप्रिएशन करु.

**मा.श्री.दिप चव्हाण:-**अकौंट कोड वापरायला सांगीतल रिॲप्रोप्रिएशन पध्दत महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ च्या कलमानुसार आहे. नॅशनल मॅन्युएल अकौंट कोड २००३ कलम ३१ नुसार ठेवणे बंधनकारक आहे.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** अकौंट कोड तयार झाली पण अजून त्या वापरायला सुरूवात केली नाही. १ एप्रिल पासून कराव्या अशी आहे. परंतु प्रत्यक्षात ती सुरवात केली नाही आपण धरलेले उत्पन्न किती खर्च किती होते.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** या मध्ये कलम१०६ चे बंधनकारक आहे. नवीन सेक्शनच काही नाही. लेखा परिक्षणच्या संदर्भात तुमच ऑक्जेक्शन काय पाठवल हे तुम्ही सांगीतले नाही.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** लेखा परिक्षणाचे विषय वेगळा आहे. हे जे मुद्दे आहे हे मला माहित नाही. अकौंट कोड मागच्या वर्षापर्यंत लागू केलेला नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आम्ही विश्वस्त आहे आम्हाला जे प्रश्न पडते ते आम्ही तुम्हाला विचारतो ६० % वसुलीच्या विषयावर बोला जी थकीत बाकी आहे. डिमांड रजिष्टरच काय करणार , टाचण, रजिस्टरचे काय करणार, कर्मचा-यांचे काय करणार , वृक्ष कराचे काय करणार ५,९३,०००/- कसे आले कशाच्या आधारे केली ते सांगा, कशी दिली ते सांगा बजेट कोणी केला उत्तर व्यवस्थित दया.

**मा. उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** विभागाने काय सांगीतल.

**मा.श्री.दिप चव्हाण:-** काल डोईफोडे साहेबांनी सांगितल की सगळया डिपार्ट मेंटच्या हेडनी अदयावत माहितीस्तव उपस्थित राहिल पाहिजे अशा प्रकारे उत्तर दिली नाही पाहिजे अकौंटंटची नेमणूक झाली काय. मा. शासनाचे आदेश काय आहे.

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** R.V. च्या ०.५० % वृक्षकर घेतो.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** वेळोवेळी मा. शासनाचे आदेश येतात रेफन्स सांगा वृक्षकर कशाच्या आधारे लावला जातो.

**मा. सभापती साहेब :-** तुम्ही कोणत्या आधारे वृक्षकर लावला तो जी.आर. दाखवा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** मा. शासनाने महानगरपालिकेच्या जी.आर. आहेत ते तुमच्या कडे नाही सार्वजनिक आरोग्य व सेवा सुविधा या बाबत माहिती नाही. काल तुम्हाला सांगीतले होते की, सर्व माहिती आणा. अशी उत्तरे सदस्यांना देवू नका. याची नोंद इतिवृत्तात घेण्यांत यावी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** निवृत्ती वेतन ४४.०९ तुमच्या आस्थापानावर होणारा खर्च याची आकडेवारी सांगा

**मा. आयुक्त श्री. कुलकर्णी :-** तुम्ही जो रेशो काढता त्याची भुमिका सांगा ११.४५ हा कसा वाढतो ते सांगा ,सांगता यायला पाहिजे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** इथे मॅन्युअल वर होतात. चुक मान्य आहे. बजेटला धरण्याच्या तरतुदी नुसार ॲक्ट दाखवा.

**मा.उपायुक्त डॉ.डोईफोडे :-** चर्चा होउ दया कामे झालेलीच असेल ना ? विभाग प्रमुख काय सांगतो ते सांगा. ठराव आणला तर एवढे रेकॉर्ड तो घेउन येउ शकत नाही. तुमचा प्रश्न बरोबर आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** ज्यावेळी बजेटच्या दृष्टीकोनातून मिटींगला येतात त्यांना सगळे रेकॉर्ड आणू शकत नाही. तर मला ऑफिस रिपोर्टची टिपण्णी दया आता तुम्ही डिपार्टमेंटचा प्रस्ताव दया त्याच्यावर मान्यता देउ. प्रस्ताव वाचून दाखवा. त्यांच्याकडे ऑफिस प्रस्ताव नाही.

**मुख्यलेखाअधिकारी श्री. शेलार :-** आम्ही टिपण्णी मागत नाही ४ ते ५ मिटींग घेउन आकडेवारी जी आहे त्यावर चर्चा होउन ती फायनल करतो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हे जे आकडे वाढवले आहेत त्याचा आधार काय त्याचा रेशो असेल. प्रत्येक विभागाकडुन आलेले आकडे त्यांच्याकडे पाहिजेत.

**मा.आयुक्त साहेब :-** त्याचे आकडे आहेत.

**मा.श्री. दिप चच्हाण :-** आजची चुक पुढे सुधारली जाते.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** सिस्टीम डेव्हलप करू शासकीय अधिकारी आम्ही कधी जाउ याचा भरवसा नसतो थोडा वेळ दयावा त्यांना फार वेळ दयायची गरज नाही. कारण त्यांना नियम माहिती पाहिजे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** सिरीयल प्रमाणे होईल कारण मागच्या चुकापुढे करायच्या नाही.

**मा.सभापती साहेब :-** विभाग प्रमुखाची जबाबदारी आहे. सभा तहकुब करून मिटींग लावा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** वृक्षकराबाबत आपण नंतर चर्चा करू

**मा.सभापती साहेब :-** घ्या पुढील मुद्दा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** विशेष स्वच्छताकर वर बोला आकडे कशाच्या आधारे घेतला २७ लाख ८३ हजार कशा आधारे घेतला कर आकारायचा काय कारण आहे. जनतेकडून कशाच्या आधारे वसुल करता सांगा २६ नंबरचे सगळे टॅक्सेस बाबत माहिती नाही.

**मा. सभापती साहेब :-** हे सगळे कर नागरिकांकडून वसुल करतो त्यामुळे त्याची सगळी माहिती व्यवस्थित दया.

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** साहेब सगळी माहिती देता येईल. मी सगळी माहिती घेउन येतो.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** १९९६ पासून डिमांड रजिष्टरचा विषय मांडतो मी. गुजराथी साहेब होउन गेले. यांचे उत्तर पारंपारिक आहे. पुढील मुद्दा घ्या.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** अग्निशमन विभाग

**अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :-** अग्नीशमन हेडमध्ये अपेक्षीत उत्पन्न १ लाख ठेवले हद्दीबाहेर आग लागल्यानंतर ते बिल वेळेवर वसुल होत नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** सन २०१३-१४ ला १ लाख २१ हजार दाखवले.

**अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :-** रू. १ लाख २० हजार ५४२ सन २०१३-१४ ला ५००००ची तरतुद होती त्यामध्ये ७० हजार ५४२ /- वसुल झाले.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** आपण कसे पैसे आकारतो.

**अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :-** २००५ पासून ४ रू. किलो मीटर , ४ रू. घसारा ३०.०० कि.मी. असेल तर ८००/- रू. सुप्याला गाडी गेली ३० कि.मी.

**मा.सभापती साहेब :-** शहराला पैसे नाही बाहेरचे पैसे घेतो.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** ना- हरकत प्रमाणपत्र कोणाला देतो.

**अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :-** हॉटेल, रेसीडेन्सीयल, हॉस्पीटल व इतर

**मा.श्री.दिप चव्हाण** :- जुन्या बिल्डींग २००९ पुर्वीच्या ज्या इमारती असतील त्यांना फायरफंड आकारता येणार नाही.

**अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :-** महिन्याला १० ते १५ ना हरकती साठी प्रकरण येतात.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** माय सिनेमा जे थिएटर आहे त्याचे काय.

**अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :-** रू. ३०,०००/- फी आकारली.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** रिन्युअल आपण कसे घेतो.

**अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :-** रू.१०००/- आपण घेतो.

**मा. आयुक्त श्री. कुलकर्णी :-** आपण सर्व्हे करून घ्या.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** प्रॅक्टीकली घ्या १०% वाढवा. त्यापेक्षा जास्त झाले तर चांगलेच आहे. त्यामुळे तरतुद १५ हजारने वाढविण्यांत यावी. जकात कराचे काय.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** जकात कर हा ठेक्याने गेली होती.

**एल.बी.टी. प्रमुख श्री. गांधी :-** सन २०१३-१४ या वर्षी स्थानिक संस्था कर ३६ कोटी ३७ लाख वसुल झाले.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** सन २०१२-१३ ला २१ कोटी जमा झाले ९ महिन्याचे जकातीचा ठेका ९० कोटीला गेला.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** एप्रिल, मे, जून तीन महिने जकातीचा ठेका गेला होता नंतर एल.बी.टी लागू झाली.

**एल.बी.टी. प्रमुख श्री. गांधी :-** २१ कोटी +२१ कोटी एकूण ४२ कोटी

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** पारगमन आपण स्वतंत्र चालवतो ना.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पारगमन वजा करा.रूपयाचे कोटी कधी झाले.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ. डोईफोडे :-** हा अंदाज होता रू.४८ कोटी सन २०१३-१४ चा अंदाज झाला सुधारित ३४ कोटीचा अंदाज होता.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आता ३६+२२ कोटी म्हणजे ५८ कोटी आता ४२ कोटीला आपण लॉस मध्ये आहे ३५ कोटी लॉस आहे.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** मागेच तीन वर्ष आपण ६५ पर्यत आलो.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पारगमन व एल.बी.टी. च्या दृष्टीकोनातुन आकडा पाहिता तर जकात वसुलपात्र किती होती.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** एकत्रीत आकडा आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आपण व्यापारी जे जकात भरण होते तेच एल.बी.टी. ला आहे

**एल.बी.टी. प्रमुख श्री. गांधी :-** ७५४० रजिस्ट्रेशन आहे./ ३५१० व्हॅट रजिस्ट्रेशन. सेलटॅक्स आयुक्त कार्यालयाकडून माहिती घेतली. औरंगाबादला MIDC आहे. सोलापुरला ऍस्कार्ट जास्त आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** संकलीन कर, पाणीपट्टी, घरपट्टी , एल.बी.टी आणि जकात याच्यावरच सगळे बजेट आहे १७०० लोकांना नोटीस दिल्या.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ.डोईफोडे :-** टेक्नीकल स्टाफ नाही, बाहेरून सी.ए. घ्यायच चालू आहे. १७०० लोकांना नोटीसा कशाच्या आधारे दिल्या.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** आपल्या कर्मचा-यांनी किती दुकान शोधात

**एल.बी.टी. प्रमुख श्री. गांधी :-** २८०० आमचे लोक निरंतर नवीन लोकांना शोधून फॉर्म देउन नोंदणी करायला सांगतो.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** एल.बी.टी. वर चर्चा करून त्यावर मार्ग निघायला पाहिजे त्यांची मुळ पद काम करणारे कर्मचारी कुठे वर्ग झाले. लोक एल.बी.टी. ला का काम करत नाही २६० पैकी १६० शिपाई बिगारी धरून १०० तर कर्मचारी असेल परंतू फक्त १५ लोक एल.बी.टी. ला आहे तर ८५ लोक कुठे आहे.प्रत्यक्षात पुणे, औरंगाबाद, सोलापुर सारखे करा पुण्याला लोक पाठवून त्यांना ट्रेनिंग देउन सक्षम करा. कोहिनुरच लास्ट जकात भरण्याचा रेशो किती होता. त्याप्रमाणे एल.बी.टी. किती भरतो फिगर अकौंटला देत होते.का हप्ता तर भरत होता कोहिनूर , सारडा, होलसेलर किती होते. आपण व्यवस्थीत नियोजन केले तर आपण १०० कोटीच्या आसपास जाउ शकतो. एल.बी.टी. रद्द केले तर बजेट कोलमडू शकतो एल.बी.टी. ची वसुल पात्र अत्यंत कमी आहे. वसुलपात्र करण्याच्या पध्दतीत सुधारणा करणे गरजेचे आहे वसुलपात्र करण्याच्या पध्दतीत सुधारणा करणे गरजेचे आहे.

**मा.सभापती साहेब व मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** त्यांच्या काय पध्दती आहे ते अवलंबण्याची गरज आहे.

**एल.बी.टी. प्रमुख श्री. गांधी :-** १४ सर्कलमध्ये व्यापारी विभाग आहे. त्यामध्ये कर्मचारी यांना भाग वाटून दिले आहे. एकाला ५०० ते ७०० व्यापारी आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** कर्मचारी गेले कुठे सांगा आस्थापनावाले जकातीचे लोक कुठे वर्ग झाले.

**आस्थापना प्रमुख श्री. खोलम :-** जकातीच्या मुळ पदावर १९१ मंजूर पद त्यापैकी १४२ भरलेले पद ४४ पद रिक्त आहे जकात ५ पद व्यपगत वर्ग ३९१

**मा.सभापती साहेब :-** यादी करा त्यातील काही पुण्याला ट्रेनिंगला पाठवा.

**मा.श्री.अजिंक्य बोरकर :-** वरील प्रमाणे सर्व उपाय योजना अंमलात आणाव्यात त्यामुळे एल.बी.टी. रु.५० लाखाने उत्पन्न वाढेल. त्यामुळे स्थानिक संस्था कर उत्पन्नाची तरतुद रु.५० लाखाने वाढविण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** स्थानिक संस्था कराच्या माध्यमातून मिळाणा-या उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीने प्रभावी उपाययोजना करण्यात यावी व उत्पन्नाच्या तरतुदी मध्ये रूपये ५०लाख वाढ दर्शविणेत यावी.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं. २८ कराव्यक्तीरिक्त उत्पन्न वाचन

**मुख्यलेखाअधिकारी श्री. शेलार :-** अकौंट कोड मधील फॉरमॅट नुसार आहे. आधारे धरून आपण बजेट करतो.
**मा.श्री. दिप चव्हाण :-** कोंडवाडी फी किती कोंडवाडा आहे का ? कोंडवाडयाच्या अस्तिवाची परिस्थिती सांगा.
**कोंडवाडा विभाग श्री. म्हसे :-** मागच्या वेळी सन २०१२-१३ ला बंद होता.
**मा.श्री. दिप चव्हाण :-** तुम्ही जमा म्हणले तर १४०० कशी रक्कम आली.
**कोंडवाडा विभाग श्री. म्हसे :-** एप्रिल पासून बंद आहे.
**मा.श्री. दिप चव्हाण :-** बंद केलेले रेकॉर्ड आहे का कोणाच्या सांगण्यावरून झाले.
**कोंडवाडा विभाग श्री. म्हसे :-** ६ कर्मचारी गर्दीच्या ठिकाणी जनावंर हाकलतात.
**मा.श्री. दिप चव्हाण :-** कोंडवाडा बंद आहे मग ती रक्कम कशी आली कोणत्या पदावर आहे.
**कोंडवाडा विभाग श्री. म्हसे :-** उदयान अधिक्षक
**मा.उपायुक्त (कर)श्री.बेहेरे :-** आता ही रक्कम आली कशी सांगा मागचा भरणा एखादयाकडे आहे .
**आरोग्याधिकारी डॉ. राजूरकर :-** कोंडवाडा बंद नाही सन २०१२-१३ ला जागेचा अडचण आल्यामुळे, साहित्य, व कर्मचारी नसल्यामुळे कामात व्यवस्थित पणा नव्हता एम.आय.डी.सी, वडगांव गुप्ताला कोंडवाडयासाठी ज्यांची जनावंर होती त्याची नावे सांगा रजिस्टर दाखवा.
**मा.श्री. दिप चव्हाण :-** सध्या किती माणूस आहे.
**कोंडवाडा विभाग श्री. म्हसे :-** २ माणसे आहेत.
**मा.सभापती साहेब :-** साहेब हे लोक घरी असतात.
**कोंडवाडा विभाग श्री. म्हसे :- ग**रदास आणि काकाटे नेप्ती चौकात जनावरे हाकलतात.
**मा.श्री. दिप चव्हाण :-** १ लाखानी आकडा कमी करा.
**आरोग्याधिकारी डॉ.राजुरकर :-** दरवर्षी नवीन हॉस्पीटल व क्लिनीक यांना नोंदणीसाठी शुल्क आकारले जाते गेल्यावर्षी १ लाख २५ हजार जमा झाली होती आता दीड लाख अपेक्षीत आहे. मा. शासन ठरवते आपण ठरवत नाही.
**मा.श्री. बाळासाहेब बोराटे** :- आपण फी वाढीचा प्रस्ताव ठेवला का ?
**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** आपल्याला अधिकार नाही.
**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ज्या दवाखान्यांच्या नोंदी झालेल्या नाहीत त्यांचे काय ?
**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** मेडीकल ऑफीसर कडुन पहाणी करुन नोंदण्‍ी वाढविता येतील.
**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** बॉम्बे नर्सिंग होम मध्ये १ लाख रुपये वाढ धरण्यांत यावी.
**मा.सभापती साहेब :-** नवीन वैद्यकीय व्यावसायिकांचा शोध घेवून बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत फी पासुन मिळणा-या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने कार्यवाही करावी. यास्तव रु.१ लाखाने तरतुदीमध्ये वाढ दर्शविण्यांत यावी.
**मा.श्री. दिप चव्हाण :-** मेडिकल ऑफिसर आस्थापना सुचीवर किती आहे.
**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** ४ प्रकारचे डॉक्टर आपल्याकडे कार्यरत आहे २० ते २२ डॉक्टर असतील. सोनोग्राफी सेंटर तपासणी करणे व रिपोर्ट करणे बंधनकारक आहे तोफखाना सुजाता साळवे- नागापुर , आयेशा शेख- मुकुंदनगर, टुमणे- केडगाव
**मा.सभापती साहेब :-** बिल्डींग नियमात नसले तरी त्यांना दिलेले प्रमाणपत्र आहे का ? बिल्डींग बेकायदेशीर आहे. नुतनीकरण करायला आल्यावर तुम्ही पहायला जाता का ?

**आरोग्याधिकारी डॉ.राजूरकर :-** हॉस्पीटल साठी आवश्यक पात्रता, कर्मचारी हे पाहण्याची जबाबदारी आरोग्य विभाग करते.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** नियमावली आणि आपण बसू.

**मा.सभापती साहेब :-** तुम्ही म्हणता नगरला २ ते ३ च हॉस्पीटलला परवानगी आहे बाकीच्याचे काय ? OPD म्हणून परमिशन घेतली आणि तो हॉस्पीटल चालवतो त्याला तुम्ही काय करता. हॉस्पीटल व मंगल कार्यालयाला पार्कींगला परवानगी आहे. त्याचे लायसन सुध्दा तुम्ही जप्त करू शकता.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** डॉ. राजूरकर तुम्ही फक्त म्हणता कायदा सुस्पष्ट नाही.

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** ॲक्ट बनला रूल्स अधीकृत नाही नियमावली नसेल तर मार्गदर्शन मागवा.

**मा.श्री.उमेश कवडे :-** डॉक्टर दवाखान्याची जागा भाडयाने घेउन हॉस्पीटल करून चालू करतात. त्यांचा पहिला प्रश्न मार्गी लावला पाहिजे.

**मा.सभापती साहेब :-** टी.पी. आणि अतिक्रमण यांनीही याच्यात लक्ष घातले पाहिजे.

**अर्थविभाग श्री. लोंढे:-**पा.नं.२९मनपा मालमत्ता व उपयोगिता सेवा यांचेपासुन मिळालेले उत्पन्न वाचन

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** गोसावी व्यवस्थीत सांगा.

**मार्केट प्रमुख श्री.गोसावी :-** ३३ संकुल असुन ८७३ गाळे आहेत. सावित्रीबाई फुले-१३७ गाळे फेज-१ , फेज-२, ३७ गाळे सन २००३-०४ पासून गाळे भाडयाने

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आम्हाला अहवाल देउन टाका किती गाळे बंद आहे. कुणाचे करार संपले. ८७३ पैकी ५६३ गाळयांची मुदत संपली भाडेतत्वावर वाढ करता येणार नाही पण व्यवस्थीत माहिती असेल तर आपल्याला त्यातून फायदा होईल माळीवाडा, वाडियापार्क , सावेडी याची सगळी माहिती उदया दया ३७२ लोक सुनावणी साठी उपस्थित होते १७१ लोक अनुपस्थित होते.

**शहर अभियंता श्री. मगर :-** शिवपवन, भाग्योदय, एस.टी. महाले, सौभाग्य सदन, मंगल कार्यालय बंद आहे जळीत प्रकारण झाल्यापासून सभागृह शिवपवन रू.४८०८/- भाडे आहे + मंगल कार्यालयाच एकुण उत्पन्न ६ लाख १ हजार उत्पन्न मिळेल शिवपवन, आंबेडकर कार्यालय , भागोदय, महावीर कलादालन यांचे नोव्हेंबर अखेर उत्पन्न रू.६ लाख १ हजार आहे.

**मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :-** ५६३ लोकांची सुनावणी घेतली त्यांना १० बाय १० च्या गाळयांना ६०००० रू. घेउन

**मा.सभापती साहेब :-** लोक बोलावले होते का ?

**मार्केट विभाग श्री. माने :-** बोलावले होते पण लोक पैसे भरायला तयार नाही.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** संबंधीत लोक सांगतात पैसे घ्या रिन्युअल करून दया. मग तुम्ही का करत नाही.

**मा.श्री. सचिन जाधव :-** तुम्ही लोकांना नोटीसा दया म्हणजे लोक येतील.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** लोक आले नाही तर सिल करून टाका रू. १ कोटीच अंदाज धरला आहे.

**मा.सभापती साहेब :-** सय्यद हे करून घ्यायच दुकानदाराची अडवणूक करू नको. आयुक्त साहेब यांना सक्त ताकीद द्या.

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** वैदयकीय संस्थेचे उत्पन्न गरोदर मातांना सोयी सुविधी फ्री दिलेले आहे. शासकीय निमशासकीय दवाखाने यांना आपण मोफत देतो. एक्सरेसाठी मशिन चालू आहे मशिन दुरूस्तीचा खर्च रू.५००००/- आहे यावेळी आपण डिजीटल एक्सरे घेण्यासाठी १५ लाख खर्च आहे. तिथे एक्सरे निघतात परंतु एक्सरे व्यवस्थीत निघत नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** एक्सरे काढल्यानंतर डॉक्टरांकडे त्याचा उपयोग होत नाही तर तिथले लोक काय करतात.

**आरोग्याधिकारी डॉ. राजूरकर :-** तिथे १ क्लार्क , १ शिपाई नवीपेठ एक्सरे सेंटरला ७ जणांचा स्टाफ आहे तिथे स्वाईन फ्लू व क्षयरोग यासाठी ते लोक काम करतात.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** गेल्या अनेक वर्षापासून

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** डॉ. मोटे तिथे कार्यरत आहेत.

**मा.उपायुक्त(सा.) डॉ. डोईफोडे :-** दवाखाना चालू आहे.

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर** :- तोफखाना व नवीपेठ / ९ पैकी ३ दवाखाने चांगले जातात १ वर्षात १५० पेशंट होतात.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** त्यांचा आस्थापना खर्च किती

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** काही आरोग्य केंद्राला आर.सी.एच. स्टाफ आहे आर.सी.एच. च्या ४ सिस्टर्स आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** चांदणेची कोणती केस आहे

**आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :-** अंब्रेला सोसायटी मार्फत त्यांची कंत्राटी नेमणूक केली जाते. आरोग्य केंद्राल मनपा आस्थापना वरील डॉक्टर आहे. मानधनावर कुणीही नाही कॉन्ट्रॅक्ट बेसीस वरचे आहे.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** मानधनावर कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने घेतलेले डॉक्टर आहेत.

**मा.सभापती साहेब :-** उदया दिनांक २२/०५/२०१४ रोजी सकाळी ११.३० वा सभा पुढे सुरू होईल.

**दिनांक २२/०५/२०१४ रोजी सकाळी ११.३० वा मा. स्थायी समिती सभागृह येथे अंदाजपत्रक बाबतच्या सभेस पुन्हा सुरूवात झाली.**

**मा.सभापती साहेब :-** आपण कालच्या बैठकीमध्ये काय सुचना दिल्या होत्या. त्यानुसार माहिती आणली का ?

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** मुख्यलेखाधिकारी श्री. प्रदीप शेलार हे तब्येत बरी नसल्याने ते १० दिवसाच्या मेडिकल रजेवर आहेत.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** साहेब बजेट त्यांनी तयार केले असल्याने ते उपस्थित रहाणे आवश्यक आहे. त्यांची रजा जो पर्यत संपत नाही तोपर्यत सभा तहकुब करावी याचा अर्थ त्यांनी बोगस बजेट तयार केले. बजेट तयार करताना कॅफो व ऑडीटर उपस्थित असणे आवश्यक आहे. त्यांनी सिव्हील सर्जनचे सर्टिफिकेट दिले का ? मला जे करायच ते मी कादयाच्या तरतुदीनुसार करतो. त्यांनी मागच्या बजेटला सुध्दा खरात साहेबांवर सोपवून ते रजेवर गेले एवढी घाई का करता.तुम्ही सदरचा चार्ज कुणाकडे दिला. बजेट संबंधी विचारायला गेल्यावर ते म्हणतात तुम्हाला पुस्तक दिले ते वाचा. इतर कर्मचारी इमरजंसीला रजेवर गेल्यावर तुम्ही घरून बोलावुन आणता त्याची बिनपगारी करता. मग अधिका-यांना नियम नाही का ? सफाई कर्मचा-यांची सर्टिफिकेट नसेल तर त्यांची बिनपगारी करतात.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** सफाई कर्मचा-याची कामावर येण्याची इच्छा असून त्यांना कामावर घेत नाही.

**मा. सभापती साहेब :-** डॉक्टरकडे गेल्याशिवाय काय झाले काय सांगणार.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** डिटेल सर्टिफिकेट दिले जाते.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** बजेट कलमानुसार तयार त्यांनी केले आहे. ते रजेवरून हजर झाल्यानंतर मिटींग सुरू करू.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** चार्ज दुस-याला दयायला सांगा. ते महासभेला पण नसतात.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** त्यांना सवय पडली त्यांना सिनसियर पणा नाही. हम करे सो कायदा ही त्यांची पध्दत चांगली नाही. माझे हेवेदावे कुणाबरोबर नाही. कायदा हा कायदा. बजेटच्या वेळी मागच्या वर्षीप्रमाणे आपले चुकलेले आहे म्हणून त्यांनी जाणूनबुजून रजा घेतली हे चुकीचे आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** बजेटसाठी रणदिवेंना सुटी दिली नाही मग यांना कशी दिली. दुपारपर्यंत त्यांना हजर व्हायला सांगा नाहीतर चार्ज दुस-याला दयायला सांगा.

**मा.सभापती साहेब :-** सन्माननीय सदस्य शेलार साहेब आजारी असल्याने व मा. आयुक्त बाहेरगांवी असल्याने अर्धा तास सभा दुपारी १२.१० वा. तहकुब करू व अर्धा तासाने सुरू करू.

**स्थायी समिती सभा पुढे दुपारी १२.४० ला सुरू.**

**मा.उपायुक्त (सा.)डॉ.डोईफोडे :-** शेलार साहेब यांनी मेडिकल रजा घेतल्याने त्यांचा चार्ज कुणाकडे नव्हता. त्याबाबत मा. आयुक्त साहेब यांच्याशी दुरध्वनीद्वारे चर्चा करून मुख्य लेख अधिकारी यांचा चार्ज श्री. परशरामी साहेब यांना देत आहोत.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** टेंपरवारी चार्ज देण्यात आला आहे. आपला विषय हा बजेट व शेलार साहेब यांचा संदर्भात आहे. श्री. परशरामी यांना चार्ज वेतनश्रेणी नुसार देण्यात आला आहे. मनपाची रचना ही आयुक्त, उपायुक्त,अकौंटट,ऑडीट चिफ इंजिनिअर, चिफ अकौंटट हा या पदाशी निगडीत आहे. बजेटच्या नियमानुसार श्री. परशरामी चालू शकत नाही . शेलार साहेबां नंतर चिफ अकौंटट कोण आहे.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** खोलम अकौंटट पदाची माहिती दया.

**आस्थापना प्रमुख श्री. खोलम :-** तडवी आहे पण ते सध्या रजवेर आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** श्री. परशरामी हे त्यांचे रेग्युलर काम पहाणार, प्रशासनाच्या सोयीसाठी त्यांचे काम पण करणार बजेटचे काम पहाणार नाही ऑफिसचा चार्ज ॲडीशनल दिला आहे.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ. डोईफोडे** :- मा. सभापती साहेब मुळ विषय बजेट जे आहे ते मुख्यलेखाधिकारी स्वतः होउन आकडे देत नाही विभाग प्रमुख जे आकडेवारी देतात त्यानुसार चर्चा करून मा. आयुक्त बजेट तयार करून सभापती कडे सादर करतात.

**मा.सभापती साहेब :-** परशरामी कडे चार्ज देता येतो का ?

**मा.उपायुक्त(सा.) डॉ. डोईफोडे :-** त्यांच्या पदानुसार येतो. तो बेकायदेशीर होते नाही**.**

**मा.श्री. दिप चव्हाण:-** तुम्ही जर तुमच्या म्हण्याप्रमाणे मी मान्य केले तर आयुक्त सुध्दा उपस्थित नाही.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** आयुक्त असले पाहिजे असे नाही. आम्हालाही अधिकार आहेत. बजेटच्या अनुषंगाने आपण पुढे गेले पाहिजे नियम आहेत. नियम ४३(५) नुसार आयुक्त नसले तर उपायुक्त चालतात.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** कॅफो म्हणून परशरामी बसले त्यानुसार बजेट त्यांनी बनवले नाही तर ते बसवून काय उपयोग.

**मा.सभापती साहेब :-** आपण जी नियमावली वाचली अंदाजपत्रकावर चर्चा आपण सुरू केली वास्ताविक पहाता मा. आयुक्त यांनी थांबायला हवेत होते . शेलार सुध्दा रजेवर गेले हे चुकीचे आहे त्यांनी जी रजा घेतली त्याची शहानिशा करा. तुम्ही सभा सुरू राहू दया आयुक्त साहेबांना मिटींगला हजर रहायला सांगा.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** ऑफिस कामासाठी ते पुण्याला गेले लवकर आले तरी मिटींगला यायला सांगतो.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं.२६ मनपा दर व कर जमिन व इमारतीवरील कर विषय वाचन

**मा.सभापती साहेब :-** संकलीत करापासुन सुरू करा. आपण काय ज्या विषयावर थांबलो तेथून सुरू करा. श्री. साबळे माहिती सांगा.

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** वृक्षकर १९७५ वृक्ष प्राधिकरणाचा ठराव झाला होता. नगरपालिका २ ई दि.२१/८/१९९७ साली ठराव झालेला

**मा.श्री. दिप चव्हाण :-** १९९७ च्या ठरावानंतर काही बदल झाले नाही का ?

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** मा. शासनाच्या नियमाप्रमाणे R.V. च्या २७ टक्के पहिला विषय सर्वसाधाकराची माहिती आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** वृक्षकरांसंबंधी बोला १९४९ चे कलम ९७ प्रमाणे तुम्हाला मान्यता मिळाली का दि.३०/६/२००३ ला मनपा घोषीत झाले कलम १५० प्रमाणे ठराव तिथल डिमॉलीश झाला आहे म्हणून ९७ चा ॲक्ट लागू होत नाही. संकलीत कराच्या संबधीत मी बोलत नाही मी वृक्षकरासंबंधात बोलतो.

**मा.उपायुक्त (कर)श्री. बेहेरे :-** R.V. च्या अर्धा टक्के नुसार वृक्षकर लावता येतो.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** कर वसुल करताना तोंडी करू शकत नाही मान्यता पाहिजे ४९७ प्रमाणे मान्यता दाखवा. ४९७ अंतर्गत महानगरपालिका जाहिर झाल्यापासून नियम लागू होत नाही संक्रमण काळ कोणता ते सांगा ४९७ प्रमाणे ६ ब नियम वाचा.

**मा. उपायुक्त (कर)श्री. बेहेरे :-** तुम्ही ४९७ म्हटले ४५७ क नुसार आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण** :- संक्रमण अवस्था सांगायला तुम्हीला कुणी सांगीतल ज्याचे अधिकार आहे त्याला बोलू दया. तुम्ही कुठेन आणले कायदा प्रत्येक अधिकारी यांना आमचा अपमान करायचा असेल तर कसे चालेल त्याचा ९७ चा ठराव माझ्यासमारे झालेला आहे. नवीन कायदयाला मान्यता नाही आहे हे जनतेसाठी चालले आहे. संक्रमण अवस्था आहे का नाही. आली तर का आली याचे रुलींग दयावे. ४९७ अंतर्गत एकही कार्यवाही झाली नाही हि संक्रमण अवस्था आहे असे उपायुक्त कर यांचे म्हणणे आहे हे प्रोसीडिंग मध्ये घ्या. ४९७ ची तरतुद दाखवा.

**मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :-** ही तरतुद ४५७ नुसार आहे आपण ४९७ म्हणालात.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** जर मी ४९७ म्हणालो असेल तर ते मला ४५७ म्हणायचे आहे. आपण क्रॉस कशासाठी करता. आपण माहिती बरोबर देत नाही. कॅफो म्हणतात मागची तरतुद केली. अशा प्रकारे सदस्यांचा अपमान करणारी उत्तरे देवू नका याची प्रोसिडींगला नोंद करा.

**मा. उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** मालमत्ता कराच्या आधारीत सदस्य वृक्ष कराबाबत बोलतात. आपण सर्वसाधारण कराच्या ०.५० टक्के प्रमाणे लागतो. आपण नगरपालिकेची पध्दत लागू केली. मनपा झाल्यानंतर पुन्हा बदल करायला हवा होता आता आपण जे नवीन असेसमेंट करणार आहोत ज्या मध्ये आपण मनपाच्या नियमानुसार तयार करणार आहेत.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आता जनतेला दिलेले बिल हे कोणत्या नियमाने दिले बील १२७ सेक्शन प्रमाणे छपाई १५० प्रमाणे जर कोर्टामध्ये न्यायप्रविष्ट बाब झाली तर त्याला जबाबदार कोण बिल वसूल करताना याला जबाबदार कोण वसुली बेकायदेशीर आहे सन २००३ ते २०१४ पर्यत ही बेकायदेशीर चाललेली बाब आहे. एखादा नागरिक न्यायालयात जाउन न्यायप्रविष्ट बाब झाली तर त्याची जबाबदारी कोणावर निश्चित करावी.

**मा. उपायुक्त(सा.) डॉ. डोईफोडे :-** महानगरपालिका झाल्यानंतर प्रशासनाने जे काही ठराव आहे ते कायम करावी असे आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** ठराव हा कायदा नाही तुम्ही चुकीची माहिती देउ नका. आयुक्त साहेब व चेअरमन साहेब नागरिकांसाठी बेकायदेशीर कर वसुल करू नये. जनतेची लुटमार चालू आहे. कोर्ट कायदा पहातो. देवरा साहेबांचा ठराव चालणार नाही . सन २००३ ते २०१४ पर्यत बेकादेशीर चालू आहे. आयुक्त साहेब मिटींगला हजर राहू दया. जबाबदारी निश्चित होउ दया.

**मा.श्री. उमेश कवडे :-** मा.चेअरमन साहेब बजेट हे अधिकारी व पदाधिकारी यांच्यात समन्वय असणे गरजेचे आहे. अधिकारी यांनी पदाधिकारी यांच्याशी सन्मानाने वागावे. चुकीचे शब्द प्रयोग करू नये .

**मा. सभापती साहेब :-** मा. उपायुक्त परशरामी साहेबांना शेलारचा चार्ज दिल्यानंतर मा. सदस्यांनी जो प्रश्न केला. त्याला परशरामी साहेब उत्तर देउ शकले नाही. मी आयुक्त साहेबांशी बोललो. ते उदया सभेत उपस्थित राहतील आणि कॅफेची रजा योग्य नसेल तर कारवाई करावी. मुख्यलेखाधिकारी श्री. शेलार साहेबांना सुध्दा मा.उपायुक्त डॉ.डोईफोडे साहेब व्यवस्थित विचारून त्यांना हजर रहायला सांगा. तोपर्यत सभा तहकुब करू. उदया दि.२३/०५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा सभा पुढे सुरू होईल.

**दिनांक २३/०५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा मा. स्थायी समिती सभागृह येथे अंदाजपत्रक बाबतच्या सभेस पुन्हा सुरूवात झाली.**

**मा. सभापती साहेब :-** स्थायी समिती सभेचे दुपारी ११.५५ ला सुरू काल आयुक्त साहेब बाहेरगांवी असताना ज्यांनी बजेट तयार केले ते रजेवर गेले त्यांच्या जागेवर ज्यांची नियुक्ती केली त्यांनी समधानकारक उत्तर दिले नाही. उपायुक्त साहेब यांनी शेलार यांची रजा ही खरोखरच आजारपणाची आहे का याची शहानिशा करा.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** शेलार यांचा रजेचा अर्जासोबत मेडिकल सर्टिफिकेट नाही त्यामुळे त्यांना आम्ही शो कॉज नोटीस देणार आहोत काल मी बाहेरगांवी होतो मला काल झालेला प्रकार उपायुक्तांनी सांगितला. ही खेदाची बाब आहे.

**मा.सभापती साहेब :-** खाते प्रमुखांना तुम्ही सांगा की सगळे रेकॉर्ड बरोबर आणले आहे का ? रेकॉर्ड सोबत आणणे ही जबाबादारी आहे. आपण या शहरासाठी काम करतो. आम्ही आणि तुम्ही शहराच्या विकासाठी काम करतो.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** गेल्या ३ दिवसापासून स्थायी समिती सभा चालली सभापती व आयुक्त यांचे धन्यवाद चर्चा करत असताना त्यांच्या रजेच्या अर्जावर तुम्ही कारवाई केली त्याबद्दल आभार नागरिकांनी पाठवलेला प्रतिनिधी म्हणून आमचे कर्तव्य आहे. मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४९ प्रमाणे नगरपालिका उपायुक्त व सहाय्यक आयुक्त यांनी काम केले पाहिजे.आयुक्त,उपायुक्त, सहाय्यक आयुक्त यांच्या पदाच्या जबाबदारी ने पार पाडले पाहिजे ४९च्या अधिकाराने दयायला पाहिजे.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** चार्ज दिला. तो त्यांनी सांभाळायचा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** शेलार हे पालिकेत आल्यापासून ते चुका करतात काकडेच्या वेळी असे झाल्यानंतर त्यांनी ती कार्यवाही केली पण पुढे काय झाले ते कळले नाही. तुम्ही कार्यवाही करत नाही म्हणून त्या व्यक्ती चुकीचे वागत आली त्यांच्याशी माझे काही वैयक्तीक वैर नाही. ३ महिन्यानंतर सिव्हील सर्जन सर्टिफिकेट लागते. केस पेपर जोडून चुकीचे वागतात. कर्मचा-यांना तिथे बोलायचे अधिकार नसतात. जेव्हा पासून रूजू झाले ते एक तासाच्या वर थांबत नाहीत. त्या माणसाची वागणूक हॅरेसमेंट करणारी आहे. लोकांना त्यांचेकडुन न्याय मिळत नसेल तर या वागण्याला कुणीतरी वाचा फोडली पाहिजे. पाहिले त्यांना निलंबित करा तरच पुढचे कामकाज सुरू करू.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** शासकीय अधिका-यांच्या बाबतीत त्यांचे डिपार्टमेंट निर्णय घेत असते त्यांना निलंबित करण्याचा अधिकार मला नाही. मा.स्थायी समिती मध्ये देखील या प्रकारची मागणी कायद्याने करता येत नाही. त्यांचा खुलासा मागवून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** कॅफोवर नियमाप्रमाणे कार्यवाही करा.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** ठिक आहे.

**मा.सभापती साहेब :-** सभा सुरू करा.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** आज नगरपालिका उदया महानगरपालिका झाली तर लगेच नियमात बदल होत नाही जी सिस्टीम चालू आहे त्यात ब-याच त्रुटी असतील.संक्रमण अवस्थेला बदलताना त्यातले कायदे सुसंगत असतील त्यात बदल होत नाही. तोपर्यंत ते तसेच चालू राहतात. आता आपण टप्प्याने जाउ बदल फक्त प्रशासन करेल असे नाही.ज्या सुधारणा करायच्या त्या करू तोपर्यंत जी सिस्टीम चालू आहे ती चालू ठेवावी लागेल.प्रशासन हा अविभाज्य भाग आहे. आपल्या सुचना ज्या कायदयात बसेल ते करू जेव्हा मी चार्ज घेतला२०१२ साली पूर्वीपासून जे चालू आहे तेच चालू राहतात.

**मा.श्री.दिप चव्हाण :-**आयुक्त साहेब आपले म्हणणे बरोबर आहे.२०१२ला चार्ज घेतला ठराव चर्चेच्या माध्यमातून होतात.असे ऑब्जेक्शन निघाल्यानंतर तुम्हाला कळते. ठराव क्र.१ दि.१९/२/२००५,२००४-०५च्या सुधारित दर कर जाहिर केला मनपाचे अंदाजपत्रक सादर करत आहे. अ.ब.क. नगरपालिकेचे बजेटमध्ये मांडले नव्हते बजेटची रचना कशी कसावी हे मांडले २००२-०३ चे बजेट ४८ कोटीच पुर्ण बजेट होते सन२००५-०६चे बजेट७९ कोटी ३४ लाखाच झाले. हया बजेटची आकडेवारी फुगलेली आहे. सन १९९९ पासून जकात बंद होउन जकातीचे उत्पन्न धरले होते. जकात बंद होती तरी २वर्ष मा.शासन अनुदान देणार होते.३१ कोटी मा. शासनाकडे२००५साली बाकी होते ते मिळवण्यासाठी काय प्रयत्न केले.नगरपालिकेच्या वेळी महागाई भत्ता,अनुदान इतर शासकीय देणे ३१ कोटी शासनाने दिले नाही. त्या संदर्भात १% ची कार्यवाही झाली नाही. हा बजेटचा ठराव माझ्याकडे आहे.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** मिनीटस आणि इतिवृत्त आणि ठराव याची गल्लत होते. याच्यावर ठराव काय झाला ते वाचा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मा.सदस्यांनी मांडलेल्या मुद्दयावर कार्यवाही करण्यांत यावी दर आणि कर संदर्भात ७९ पासून संकलीत करासंबंधीत प्रश्न निर्माण झाला. रिव्हीजन संदर्भात प्रश्न उपस्थित झाला.रेटबेल व्हॅल्यु ३०% लावावा.२७ % कमीत कमी रेशो दिला होता त्या वेळी अधिनियम १९३९ /१९६ कलमाप्रमाणे ही आकारणी बेकायदेशीर आहे अशोक मुथ्था यांनी केस केली होती कलम ३० व २९ प्रमाणे बार असोा. हायकोर्टात गेली. हायकोर्टाने सांगितल की नियम फ्रेम करा.

**मा. आयुक्त श्री. कुलकर्णी :-** रूल फ्रेम झाले नाही मा. शासनाच्या स्तरावर कमिटी नेमली पण कमिटी झाली नाही रूल्स फ्रेम करण्याची जबाबदारी शासनाची आहे. नगरची संक्रमण अवस्था आपण म्हणून शकतो.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** नगरविकास खात्याने हायकोर्टाला दिला रूल फ्रेम हे जोपर्यंत करत नाही तोपर्यंत तुम्ही कर लावून शकत नाही शासन म्हणतो माझ्याकडे रूल नाही मुंबई हायकोर्टाचा निकाल तुम्हाला दाखवायच होत की शासनाकडे रूल नाही. मनपा २००३ ला अस्तित्वात आली जोपर्यंत नगरसेवक निवडून येत नाही स्थायी समितीची निवडणूक होत नाही तोपर्यंत संक्रमण अवस्था असते सन २००३-०४ चा पहिला बजेट नगरपालिकेचे मांडले फ्रेमच्या संदर्भात दखल लक्षात घ्या. सन १९९३-९४, ९४-९५, ९५-९६ च्या नंतर कमिटी झाली कमिटीचा निर्णय झाला त्यांना जुन्या प्रॉपटीला तुम्ही ३ पट आकारणी कोणाला लावली.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** कोणताही नियम लागू करण्याचे अधिकार विधीमंडळाला असतात आम्ही बॉयलॉज तयार करतो.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** मी संकलीत करा संबंधीत बोललो.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** चर्चा करायची असेल तर तुम्ही मला आधी बोलू दया. मग तुम्ही बोला नियम तयार करायचे अधिकार राज्य शासनाचा आहे जोपर्यंत आपण सुधारणावर दुरूस्ती करत नाही तोपर्यंत जे चालू आहे, जिथे चुकत असेल ते सुधारणाच्या प्रयत्न करू, ज्या गोष्टींना कम्प्लीशन नाही त्याना २ पटीने आकारणी केली आहे त्याला बेकायदेशीर म्हणणे चुकीचे आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** जर कप्लीशन घेतले नाही तर सहापटी नुसार आकारणी केली जाते .

**मा. सभापती साहेब :-** परमीशन असतांना ६ पट कर आकारणी केली जाते. करआकारणी करणा-या क्लार्कची ताबडतोब बदली करा.

**प्रभाग अधिकारी श्री.साबळे :-** मा.आयुक्तांच्या सुचनेनुसार बांधकाम परवानगी घेतल्यापेक्षा जास्त बांधकाम केले त्या जास्त असलेल्या बांधकामाला दुप्पट आकारणी केली.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** एक्सेस बांधकामाला परवानगी देत नाही. त्याला दुप्पट आकारणी लावली जाते.

**प्रभाग अधिकारी श्री.साबळे :-** दुप्पट कर आकारणीच्या ३५० मिळकती क्लिअर केल्या आहेत.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** आपण आता मोहिम तयार करून काम क्लिअर करून घेवू.

**मा.श्री बाळासाहेब बोराटे :-** ज्यांनी दुप्पट आकारणीने कर भरले त्यांच्या रकमेचे समायोजन करा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आम्हाला सांगु नका झालेल्या चुकाच सुधारणा करू त्याचा तक्ता आम्हाला स्थायी समिती ला सादर करा.

**मा.सभापती साहेब :-** श्री.झीने यांची वागणूक फार आरेरावीची आहे. त्याची ताबडतोब बदली करा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** रिव्हिजन च्या जागेवर पदोन्नतीने दिली का. कोणाला प्रमोशन दिले. ज्याला प्रमोशन दिले त्याला काम शिकवा. रिव्हीजन विभाग हा फार महत्वाचा विभाग असुन तेथे सक्षम अधिका-याची नेमणुक करुन त्याची संरचना नीट करावी. याची इतिवृत्तात नोंद घ्यावी. एका माणसाकडे पाच ते सात चार्ज आहे. मग तो काम क्लार्क कडूनच करून घेणार ना. आकारणी व लोकांना न्याय मिळत नाही. त्या पदावर पदोन्नती दिलेला माणूस देवून काम करायला सांगा. वृक्षकराचे पैसे तुम्ही कसा खर्च करता,आता कितीने बजेट वाढेल पान नं. २६ बघा ५.९३ झाले. विशेष स्वच्छता कर च्या संदर्भात बोलतो.

**प्रभाग अधिकारी श्री.साबळे :-** प्रत्येक सिट ३० प्रमाणे टॅक्स आकारला जातो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** नगरपालिकेच्या वेळी चारचार वर्षा ला रिव्हीजन करत होते. स्वच्छता कर जागेचा घेता का संडासचा घेता. स्वच्छता कर घेता, जागेचा कर पण घेता, हा डबल टॅक्स आहे.

**मा.उपायुक्त (कर)श्री.बेहेरे :-** कारपेट एरिया काउंन्ट करतांना टॉयलेट एरिया पण धरतात, स्वच्छता कर पण घेतात.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- रिव्हीजन ची पध्दत होती. क्षेत्रीय अधिका-यांनी महिती अपडेट केली पाहिजे.

**मा. सभापती साहेब :-** अनेक वॉर्डात हे निदर्शनास आले,बांधकामाची नोंद होत नाही. कर्मचारी जातो व पैसे घेतो.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** कमीटीचा सर्व्हे सुरू झाला, प्रत्येक प्रॉपर्टी साठी त्यांचा एक माणूस व आपला एक माणूस या पध्दतीने काम सुरू केले आहे.सहा महीन्यात हे काम पुर्ण होईल.नविन होणा-या प्रॉपर्टीच्या बाबतीत लक्ष ठेवले पाहीजे.बांधकाम परवानगीची कॉपी घरपटटी विभागाला पाठविली पाहीजे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** डबल झालेल्या एन्ट्रीचे काय करणार.

**मा.आयुक्त श्री.कुलकर्णी :-** या नोंदी तपासुन घेवू आणि ज्या डबल झाल्या त्याच्यात दुरुस्त्या करु.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** बेकायदेशीर घर किती बांधले. त्याच्यावर कुठलीही आकारणी नाही.यामध्ये अर्धनगर येईल.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** दिल्लीच्या लेवलला चर्चा करावी लागेल. पुरातत्व विभागाकडून आपल्याला माहिती मीळाली नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** बेकायदेशीर बांधकामाबाबत त्याला पैसे भरून घेवून रेग्युलर केले तर आपला फायदा होईल. नागरीकांनी त्यात पुढाकार घेतला पाहीजे. जे नियमाने अधीकृत होत नाही ते पाडण्याची जबाबदारी आपली आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** एजन्सीचा सर्व्हे सुरू झाला आहे. प्रत्येक प्रॉपर्टी साठी त्यांचा एक माणूस व आपला एक माणूस या पध्दतीने काम सुरू केले आहे.सहा महीन्यात हे काम पुर्ण होईल. त्यामुळे प्रॉपर्टीची हस्तांतरणची प्रक्रीया वेगाने होवुन मालमत्ता नांव नोंदणी फी च्या उत्पन्नात वाढ होईल म्हणुन मालमत्ता नांव नोंदणी फी मध्ये रु.५० लाखाची वाढ करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** GIS कार्यप्रणालिच्या माध्यमातुन सुरु असलेल्या सर्व्हे व्दारे नविन मालमत्तेची माहिती उपलब्ध होणार आहे त्यादृष्टीने मालमत्ता नांव नोंदणी मध्ये नव्याने दाखल होणा-या प्रकरणांचा ओघ पहाता तरतुद उत्पन्नात रु.५० लाख वाढ करावी.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** जाहीरात छपाई व कर काय आहे.

**मा.सभापती साहेब :-** पान क्र.२६ ,११नं. जमेची बाजु सांगा

**मा.श्री.दिप चव्हाण :-** जाहीराती संबंधात म.न.पा.च्या हददी पर्यन्त ज्या जाहीराती लावतात त्याच्या टॅक्स संबंधी सांगा.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** ३ लाख ९१ हजार.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हा आकडा कशाच्या आधारे काढला.

**मा.सभापती साहेब :-** हा आकडा होर्डीग सहीत आहे का. हा आकडा वेगळा आहे.हा आकडा मॅच होत नाही. होर्डीग डिपार्टमेंन्ट कोणाकडे आहे.माहीती सांगा.

**प्रभाग अधिकारी श्री. साबळे :-** जाहीरात बोर्डची वसुली आहे. जाहीरात बोर्डची संख्या २३९५ इतकी आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण -** साईज आणि बोर्डची संख्या सांगा. एजन्सी कीती व कोणत्या आहेत त्या सांगा.

**मा. सभापती साहेब / मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** नगर - पुणे रोडला एअरटेलचे जाहीरात बोर्ड आहेत ते किती बोर्ड व किती उत्पन्न आहे ते सांगा.

**प्रभाग अधिकारी श्री.साबळे -** एअरटेलचे १२८ बोर्ड आहेत. परवानगी दिली आहे. बील १६०००/- रु. आहे पैसे भरले नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे -** एक वर्ष झाले. पैसे भरले नाही.

**मा.श्री.सचिन जाधव -** ज्यांनी खाजगी जागेत बोर्ड लावले त्यांना आकारणी लावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे -** परवानगी कधी दिली.

**प्रभाग अधिकारी श्री.साबळे -** दिनांक ०७/०३/२०१३ रोजी परवानगी दिली.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे -** एवढे लोक प्रसिध्दीवर खर्च करतात. एअरटेल वाल्याच काय.

**मा.सभापती साहेब:-**महासभेत१०x१०चा बोर्डला परवानगी आहे.त्यापेक्षा जास्त जागेवर बोर्ड लागले.

**प्रभाग अधिकारी श्री.साबळे :-** आपण बिल दिले. पैसे भरले नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** कुणाचा अर्ज होता.

**मा.श्री.दिप चव्हाण ःे-** साबळे साहेबांकडे किती डिपार्टमेंट आहेत. जाहीराती संदर्भात उत्पन्न खुप कमी आहे. हे प्रभाग अधिकारी आहेत. जकात अधिक्षक आहेत. त्यांनी कशा कशाचे उत्तर द्यावे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** परवानगी दिली पैसे भरले नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ज्यांच्याकडे बोर्ड आहे त्या बिल्डींगला दुप्पट आकारणी लावा.

**मा.सभापती साहेब :-** जाहीरात बोर्ड जागा भाडे ही बाब उत्पन्नाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असुन या विभागाकरीता कर्मचारी वर्ग वाढविण्यांत येवून संपुर्ण शहराचा सर्व्हे करुन वसुली केल्यास निश्चितच उत्पन्नात भर पडेल. शहराचा वाढता विस्तार व व्यवसाय लक्षात घेता या माध्यमातुन सुमारे १ कोटी रुपये उत्पन्न मिळू शकेल. यास्तव तशी तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे -** महानगरपालिकेची डिमांड आली तर आम्ही पैसे भरायला तयार आहेत असे ते म्हणतात.

**मा.श्री.दिप चव्हाण -** रस्ता कर कशी आकारणी करता.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** साबळे तुमच्या क्लार्कला सांगा रस्ता कर कसा आकारतो.

**मा.श्री.दिप चव्हाण:-** रस्ता फी मार्केटच्या अंतर्गत येतो. रस्ता कर कशाच्या आधारे आकारता.

**मा. उपायुक्त डॉ.डोईफोडे :-** रेटेबल व्हॅल्यूच्या २ टक्के प्रमाणे आकारतो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मंगल कार्यालयाचे भाडे पा.नं.२९ बाहेरच्या मंगलकार्यालया संबंधी माहिती सुविधा केंद्राकडे नसाव. बांधकाम कडे आहे. ४ तर मंगल कार्यालय आहेत.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** जाहीरात करा संदर्भात स्ट्रीट लाईट संदर्भात प्रभाग अधिका-याला माहित नसते. मार्केट विभागा मार्फत आपण वेगळी यंत्रणा तयार करु. सर्व्हे करावा लागेल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** रक्तपेढी संदर्भात फुलराणी संदर्भात, उद्यान व इतर उत्पन्न पा.नं.२९ .

**उद्यान अधिक्षक श्री.गोयल :-** महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असलेले चिंच फळाबाबत उत्पन्न आहे.फुलराणी सध्या महानगरपालिका चालवते ५/- रु. तिकीट आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण -** त्याच उत्पन्न किती मागच्या वर्षी ३३,२००/-

**उद्यान अधिक्षक श्री.गोयल :-** २५,०००/- होईल.

**मा.सभापती साहेब :-** सिध्दीबाग येथील फुलराणी बीओटी तत्वावर चालविणे बाबत उद्यान विभागाने ऑफिस रिपोर्ट सादर करावा.

**मा.श्री.दिप चव्हाण -** आकडा मेंटेन करा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे -** महालक्ष्मी उद्यान फी, प्रवेश फी आपण घेतो का. गंगा उद्यान वाल्याला ते बांधकाम विभागामार्फत बीओटी तत्वावर दिले का.

**शहर अभियंता श्री.मगर :-** गंगा उद्यानला प्रतिमहा रु.७०,०००/- आपण ठेकेदाराला देतो. आपला एकही कर्मचारी नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** त्याचा रेशो किती.

**मा.श्री.अजिंक्य बोरकर :-** आतमध्ये सगळी खेळणी आहे.

**शहर अभियंता श्री.मगर :-** दुसरा करार ७०,०००/- प्रमाणे मागच्या वर्षी झाला. ते अडीच एकरचे क्षेत्र आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** अडीच एकर जमीन देवून दरमहा ७०,०००/- रुपये आपण देतो. रॅायल्टी नाही. अडीच एकर जमीन तीन वर्ष बीओटी तत्वावर दिलेले आहे. त्याचा बेस माहित नाही. अडीच एकरला रॅायल्टी नाही. परत ७०,०००/- त्याला द्यायचे. गंगा उद्यानला दिलेली वर्क ऑर्डर परत घेवून थांबवा. कायद्याच्या व्यवहाराच्या आधारावर तपासुन पुन्हा प्रस्ताव मागवुन गंगा उद्यान देवू. त्यामुळे उत्पन्न वाढेल. आजची पध्दत योग्य नाही.

**मा.सभापती साहेब :-** त्याला खेळणी बसविण्याची परवानगी नाही. तरी त्याने बसवुन त्याचे पैसे तो वसुल करतो.

**मा.श्री.दिप चव्हाण -** आपलं कंट्रोलींग काही नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे -** ह्याच्यावर ऑडीट ऑब्ज्येक्शन निघालं तर त्याला जबाबदार कोण.

**मा.श्री.दिप चव्हाण -** वर्क ऑर्डरचा अभ्यास करुन वर्क ऑर्डर रद्द करावी.

**मा.सभापती साहेब :-** शहरातील कै.बाळासाहेब देशपांडे उद्यान (सिध्दीबाग) व महालक्ष्मी उद्यान खासगी तत्वावर चालविण्यास देण्याबाबत प्रस्ताव सादर करावा. याबाबतची कार्यवाही त्वरीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच श्री.मगर व श्री.गोयल यांनी यामध्ये विशेष लक्ष देवुन कार्यवाही करावी.

**अर्थ विभाग श्री. लोंढे** :- पान नं. ३० - वाचन सुरु केले.

**मा.श्री. सचिन जाधव :-** अ.क्र. २१ गुंठेवारी संदर्भात आजही गुंठेवारीची प्रकरणे करता येतात का.

**नगररचनाकार श्री.तारळकर :-** गुंठेवारी चालू आहे सन २००१ पूर्वी खरेदी घेतली त्यांचे अर्ज आले तर नियमित करण चालू आहे.

**मा.श्री. सचिन जाधव :-** २० गुंठयात आत जागा पाहिजे. २० गुठयांच्या पुढे क्षेत्र चालू शकत का ? ज्यांचे गेले त्याचे काय ?

**मा. सभापती साहेब :-** मर्यादा २० गुंठयापर्यत आहे. जर त्याच्या पुढे गेले तर त्याच्यावर काय कार्यवाही करा.

**मा. आयुक्त श्री. कुलकर्णी :-** किती एरियापर्यत तुम्ही गुंठेवारी करू शकतात. जर त्याच्या पुढे गेले तर तुम्ही काय कार्यवाही केली.

**मा.सभापती साहेब :-** पुढच्या सभेमध्ये सांगा.

**मा.श्री. सचिन जाधव :-** भरपूर प्रकरण झालेले नाही. प्रोफेसर कॉलनी रोडवरील शरद मुथाच्या जागेवर गुंठेवारी करून बंगले झाले. ४,५ एकर मध्ये भरपूर बंगले आहे.

**मा.सभापती साहेब:-**टी.पी.ला यांनी समक्ष जागा सांगितली ज्यानी परवानगी दिली सगळे जातील. पुढच्या सभेमध्ये सगळी माहिती सांगावी.जो जबाबदार असेल त्याच्यावर कार्यवाही केली जाईल.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** महानगरपालिकेचे शाळेचे उत्पन्न किती किती भाडे आहे सगळी डिटेल दया.

**मार्केट विभाग श्री . वखारे :-** ८८ खोल्या भाडयाने दिल्यात किती शाळांना

**मा.श्री. दिप चव्हाण :-** एकूण शाळा किती, बाकीच वर्गीकरण किती

**मार्केट विभाग श्री. वखारे :-** २३ शाळा

**मा.श्री. दिप चव्हाण :-** शिक्षण मंडळाच कंट्रोलिंग का मनपाचे

**मार्केट विभाग श्री. वखारे :-** प्रोगोसिव्ह एज्यु. सोसा. शाळा नं. १ , ३ रूम दि.१६/५/२०००ला दिली.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** किती वर्षासाठी दिली.

**मार्केट विभाग श्री. माने :-** शिक्षण मंडळाना दिली. त्याचा करारनामा नाही. शिक्षण मंडळाकडे होते. मार्केट विभागाकडे सन २००५-०६ ला आली.

**मा. उपायुक्त डॉ. डोईफोडे :-** पठाण किंवा क्लार्क दोघांनाही सांगावी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** बेस पाहिजे ना साहेब आपण विषय काढल्यामुळे वास्ताविकता कळली खुप वेळा वेगळया पध्दतीने कामे झाली आहेत. त्यामुळे या खोल्यांचे करार न करता ताब्यात घ्या व फ्रेश देवुन त्यामुळे उत्पन्न वाढेल.

**मा.उपायुक्त डॉ. डोईफोडे :-** अधिकार स्थायी समिती ला आहे भाडे ठरवून करार करून घ्या.

**मार्केट विभाग श्री. गोसावी व श्री.माने :-** पद्मशाली विदया प्रसारक- ८ खोल्या , मुळे ३ रूम, सेवाशिक्षण प्रसारक-१ रूम, शाळा नं. ३,४ रूम, शेकटकर- , सेवाशिक्षण प्रसारक- ७ रूम, पटवर्धन चौक मित्र मंडळ-२ रूम, सतिश धाडगे-१ रूम, बॉक्सींग संघ -२ रूम, गौरीशंकर मित्र मंडळ-१ रूम, शाळा नं. १४-४ रूम, मनपा शिक्षण मंडळ-१ रूम, प्रोव्हीजन सोसा. ४ रूम, स्नेहालय- ४ रूम , माणिकराव विधाते- २ रूम, शिशु संगोपन-११ रूम

**मा. सभापती साहेब :-** शिशु संगोपन ही पुर्ण जागा आपली आहे. आपली जागा यांनी नावावर करून घेतली व नंतर परवानगी घेतली.

**मा.श्री. सचिन जाधव :-** त्याची आपली काही कोर्ट केस चालू आहे का ?

**मा.सभापती साहेब :-** त्याचे रेकॉर्ड तर सगळे काढा.

**मा.उपायुक्त डॉ. डोईफोडे :-** जिथे रेग्युलर शाळा चालू आहे इतर ॲक्टीव्हिटी साठी आहे. त्याचा माहिति घेवून कार्यवाही करू.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** प्रत्येक गोष्टीवर चर्चा झाली तरच वस्तुस्थिती कळते.

**मा.सभापती साहेब :-** महानगरपालिका शाळा भाडे पासुन मिळणा-या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने थकबाकी वसुली व अन्य उपाययोजना कराव्यात. रु.१० लाखाने उत्पन्नात वाढ दर्शविण्यांत यावी.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं. ३० वाचन

**मा.श्री. दिप चव्हाण :-** बस सेवेला रॉयल्टी कशी देता येतील.

**मा.आयुक्त श्री.कुलकर्णी :-** अशा पध्दतीने सेवेबद्दल कुणाची तक्रार नव्हती. महासभेने निर्णय घेतला महासभेत चर्चा घडवून आणली होती. ६९ बसेसचा प्रस्ताव आहे. तो. राज्य शासनाकडे मंजूरीला आहे त्याचा फॉलोअप करून ते लवकरात लवकर पूर्ण करू.

**मा.सौ.उषा ठाणगे :-** मांडव भाडे व जागा भाडे बाबत किती तरतुद करण्यांत आली आहे.

**अर्थ विभाग श्री.लोंढे :-** रक्कम रु.२ लाख.

**मा.सभापती साहेब :-** गणेशोत्सव, मोहरम, नाताळ, नवरात्र उत्सव या धार्मिक उत्सवाच्या आयोजनासह राष्ट्रपुरुषांची जयंती तसेच पुण्यतिथी या निमित्ताने शहरामध्ये विविध सामाजिक संस्था मांडव टाकतात, त्यासाठी महानगरपालिका भाडे आकारणी करीत असते. त्यास माफी देणे बाबत ही सभा शिफारस करीत आहे. उत्पन्नाच्या तरतुदीमधुन रु.१ लाख उत्पन्न कमी दर्शविण्यांत यावे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पे- ॲण्ड पार्क चे काय.

**मार्केट प्रमुख श्री.गोसावी :-** गांधी मैदान, आपला कर्मचारी चालवतो. त्याच्यावर गुंड नावाचा कर्मचारी म्हणून आहे त्याची नेमणूक आहे पावती देतो.

**मा.सभापती साहेब :-** आणखी कुठे कुठे आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आपले ओपन स्पेस शहरामध्ये कुठे कुठे आहे. ट्रॅफीकचा प्रश्न सुटेल. शहरात कोणते-कोणते ओपन स्पेस आहेत ते पाहुन नगररचना विभागाने त्याचे एकत्र टेंडर करावे.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** जागा शॅापींग ॲण्ड पार्कींग यावर चर्चा झाली. ते म्हटले की पूर्ण पार्कीग करा. १ ते दिड हजार पार्कींग बसेल असा प्रस्ताव १ ते दिड वर्षापुर्वी पाठवला.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** जमा बाजू मध्ये टॅावरपासून उत्पन्न दाखवले नाही मागच्या बजेटमध्ये आहे. रेट काय लावले संकलीत करात कुणी वर्ग केला सर्व्हे केला होता सिल केले होते. त्याच्यावर किती दंड झाला.

**अतिक्रमण विभाग श्री. इथापे :-** ५४ टॉवर सिल केले होते. दीड लाख ५२ टॉवर दंड केला होता. काही कंपन्या हायकोर्टात गेले होतो. कोर्टाने सांगातीले दीड लाख भरून सेवा सुरळीत करून रेग्युलाईज करा.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** संकलीत करामध्ये उल्लेख करा.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** संकलीत करामध्ये उल्लेख करणे बरोबर आहे. ती जी पॉलिसी आहे ती सांगतो बरेचसे नियम घातले होते.

**मा.श्री.अजिंक्य बोरकर :-** पॉलिसी नंतर आपण ठरवू. मोबाईल टॉवर वर टॅक्स आकारणी मुळे उत्पन्न मोठया प्रमाणात वाढेल. त्यामुळे येणारे उत्पन्न रु.१ कोटी इतके धरण्यांत यावे. याकरीता स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करणे आवश्यक आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** साहेब विनापरवाना नागरीक, कंपन्या रस्ते फोडतात. पान नंबर ३४ वरील संकिर्ण मध्ये क्रमांक ११ रस्ता फोडणे, जोडणे, वसुली व बांधकाम इतर यामध्ये रु.३० लाखांनी वाढ करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** महानगरपालिकेस असणा-या सुट्टीच्या दिवशी किंवा विनापरवाना शहरामध्ये ब-याच ठिकाणी रस्ते फोडणे, ड्रेनेज व पिण्याच्या पाण्याची लाईन जोडणे असे प्रकार घडल्याचे निदर्शनास येत आहे याकरीता सदर बाबत बारकाईने लक्ष देवुन अशा प्रकारच्या कामाची फी वसुल केल्यास निश्चितच उत्पन्नात भर पडेल. यादृष्टीने उपाय योजना करण्यांत यावी. यामध्ये ३० लाख रुपयांनी तरतुदीमध्ये वाढ दर्शविण्यांत यावी.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महाराष्ट्र महानगरपालिका कायदा कलम ४५७ च्या ६ ब च्या लेखाशिर्षा बाबतच्या तरतुदींना अधिन राहुन आम्ही मान्यता देत आहोत. अशी नोंद इतिवृत्तात घ्या.

**मा.श्री. उमेश कवडे :-** दाट लोकवस्ती असलेल्या ठिकाणी मोबाईल टॉवर परवानगी देउ नये.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ज्या बिल्डींगला मोबाईल टॉवर आहे त्यांना दुप्पट आकारणी करा. आकारणी नंतर झाल्या व पैसे यायला लागले. आपण म्हणतो आपली आर्थिक परिस्थिती नाही. आपण परवानगी दिली एक वर्ष झाले पण पैसे भरले नाही. त्याच काय करणार.

**प्रभाग अधिकारी श्री.साबळे :-** परवानगी काढुन घेवू.

**मा.सभापती साहेब :-** विनापरवाना मोबाईल टॉवरचा शोध घेवून याबाबत नियमानुसार कार्यवाही करुन दंडनिय कारवाईच्या माध्यमातुन उत्पन्न मिळविणे बाबत यापुर्वी मा.महासभेने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यांत यावी. या कारवाईमुळे सुमारे १ कोटी रुपये रक्कम महानगरपालिकेस उपलब्ध होवू शकेल त्यानुसार अंदाजपत्रकामध्ये मोबाईल टॉवर दंड कारवाई करणे असे नवीन लेखाशिर्ष तयार करण्यांत येवून त्यामध्ये सदरची तरतुद दर्शविण्यांत यावी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** ४५७ च्या अधिन राहून ९५,९६,१०६ च्या अधीन राहून हे बजेट करा तुम्ही आम्हाला ६७ च्या अधीन राहून सुचना करा. ४५७ ला अधिन राहून जमा बाजूला मंजुरी देत आहोत. सोमवारी खर्चाच्या बाजूला बसू.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं .३७ अ.क्र.१२ वाचन

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आस्थापना संदर्भात प्रमोशन संदर्भातला १ प्रश्न ज्या लोकांकडे ४,५ चार्ज आहे तो प्रश्न ज्या लोकांना तुम्ही २५०० वर नेमणूक वारस हक्काच्या नेमणूकबाबत कमाल आणि किमान दराने कसे देता मानधन त्यांना लागू होत नाही. दोन ते अडीच वर्षापासून बोलतो १९७४ चे बुकलेट दिलेले आहे. एकदा ठराव झाल्यानंतर नेहमी ठराव करण्याची गरज नाही. अन्याय दूर करा. प्रमोशनच काय करणार.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** एक महिन्यात होईल प्रमोशन दयायला सिस्टीम लावावी लागेल.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पान नं. ४२ पैकी ७ कर्मचारी विमा याच्या संदर्भात निर्णय घ्या. पॉलीसी ठरवावी लागेल.

**मा.उपायुक्त डॉ. डोईफोडे :-** कर्मचारी युनियनशी बोलणे झाले ते पूर्ण कुंटुंबासाठी आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** केंद्र आणि राज्य शासनाच्या ज्या योजना आहे त्याची माहिती दया.

**मा.उपायुक्त डॉ. डोईफोडे :-** महसुली बाबत बोलतो.

**मा. श्री. दिप चव्हाण :-** निवडणूक खर्च हा यावर्षी करावयाचा आहे का.

**मा.श्री. अजिंक्य बोरकर :-** नविन संगणक खरेदी करणेपेक्षा जुन्या संगणकात दुरुस्ती करुन अपग्रेड करुन ते वापरण्यांत यावेत. याकरीता पान नं.३७ वरील नविन संगणक खरेदी रु.२० लाख तरतुद आहे ती ४ लाखाने कमी करुन संगणक साहित्य हार्डवेअर सॉफ्टवेअर खरेदी या हेडमध्ये ४ लाखाने वाढ करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** नविन संगणक खरेदी रु.२० लाख तरतुद आहे ती ४ लाखाने कमी करुन संगणक साहित्य हार्डवेअर सॉफ्टवेअर खरेदी या हेडमध्ये ४ लाखाने वाढ करण्यांत यावी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पान नं .३९ अ.क्र. १ वाचन

**प्र. नगरसचिव :-** रूपये ३ लाख आहे तो रूपये २ लाख वाढवावे अशी सुचना होती मागचा खर्च २,४८,०००/- आहे मागचा खर्च होउन काही बिल थकीत आहे.

**मा. आयुक्त श्री. कुलकर्णी :-** मासिक खर्च कसा होतो.

**प्र. नगरसचिव :-** झेरॉक्सचा खर्च जास्त होतो.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** रूपये ४ लाख करा.

**मा.सभापती साहेब :-** नगरसचिव विभागाचा आकस्मिक खर्च रु.४ लक्ष करणेंत यावा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-**पान नं.४१ अ.क्र. ६, पान नं.४२ वर अ.क्र.१३ वाचन

**मा. आयुक्त श्री. कुलकर्णी :-** रूपये १७ लाख भरले होते. ते त्यांनी नाकारले. सिटी सर्व्हे मा. शासन मोफत करुन देवू शकते. शासन स्तरावर त्याकरीता मागणी केली पाहिजे.

**मा.श्री.अजिंक्य बोरकर :-** जर शासन सिटी सर्व्हेचे काम मोफत करुन देत असेल तर याठिकाणी टोकन रक्कम रु.३ लाख तरतुद ठेवा.

**मा.सभापती साहेब :-** मा.शासनाकडुन सिटी सर्व्हेचे काम मोफत होणेच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यांत यावा तसेच याकामी मनपास खर्च करण्याच्या दृष्टीने रक्कम रु.३ लाख तरतुद ठेवण्यांत यावी.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** हातगाडया , ढकलगाडया, सायकल रिक्षा , दुरूस्ती करता रू. ३ लाख तरतुद आहे.

**मा.सभापती साहेब :-** रिपेअर होत नाही , रिपेअर करण्याकरिता मनुल्यबळ व पैसा जास्त लागतो त्यामुळे नवीनच घेण्यास हरकत नाही.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** हया सगळया गोष्टी कालबाहय झाल्या आहेत.

**मा.सभापती साहेब :-** हातगाडया, ढकलगाडया, सायकल रिक्षा, कचरकुंडया दुरूस्ती करीता रूपये ३ लाखाची तरतुद असुन ती टोकन तरतुद रूपये १ हजार करण्यांत यावी.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं.४३ वाचन

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** उनाड कुत्र्यावर टॅग करून कुत्र लांब नेउन सोडायच एका कुत्र्यामागे तो रूपये ८००/- घेतो.

**मा.सभापती साहेब :-** त्यांना पैसे दिले नाही .दयायची वेळ आल्यावर तुमच्याशी चर्चा करू.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पान नं.४२ अ.क्र.३ , पान न.४२ अ.क्र.१३ वाचन

**मा.सभापती साहेब :-** उनाड कुत्र्याचे काय करायच.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** पूर्वी पेढा खाउ घालून तो मारायच त्याला उचलायची जबाबदारी आपली

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पान नं.४४ अ.क्र.२ विदयुत साहित्य खरेदी ४० लाख मध्ये L.A.D. वगैरे सोडुन बाकीची व्यवस्था काय उपनगर वाढले त्याच काम आहे.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** आपल्याकडे बल्ब पण शिल्लक नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** L.A.D. लागेल त्याला टाइमर बसवले का ? त्यामुळे टाइमरच बिल निघाल तर त्याची जबाबदारी कोणाची ठेकेदाराला किती बील दिले. ४ कोटी पैकी त्याला ३ कोटी २० लाख गेले त्यानी त्याची मुळ रक्कम + नफा घेउन गेला एजन्सी कोणती.

**इलेक्ट्रीक विभाग श्री. सावळे :-** अमित एजन्सी औरंगाबाद

**मा.श्री. दिप चव्हाण :-** किती काम बाकी मुदत किती

**इलेक्ट्रीक विभाग श्री. सावळे :-** ८० लाखाचे काम बाकी, मुदत संपली.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** ६५ वॉर्डापैकी किती वॉर्डात लावले.

**इलेक्ट्रीक विभाग श्री. सावळे :-** १७८० शहरात लावायचे होते पैकी १६०० लावले शहरामध्ये विविध ठिकाणी शिवजयंती मार्ग, माहेरम मार्ग

**मा.सभापती साहेब व मा.श्री. दिप चव्हाण :-** कसे बसवले त्याची लिस्ट दया. मनपाने ५० टक्के टाकले रूपये ८० लाख काम तो का ठेवतो.

**मा. आयुक्त श्री. कुलकर्णी :-** यादी दया.

**मा.सभापती साहेब :-** किती बसवायचे राहिले.

**इलेक्ट्रीक विभाग श्री. सावळे :-** १७८० पैकी १६०० बसवले पैकी १८० बाकी

**मा.श्री. दिप चव्हाण :-** त्या एजन्सीबद्दल तक्रारी किती आल्या.

**इलेक्ट्रीक विभाग श्री. सावळे :-** शाकीर शेख या सामाजिक कार्यकर्त्याची ,युगंधर प्रतिष्ठान यांची

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** विदयुत करणाचे कामाबाबत अधिकारात किती अर्ज आले ?

**इलेक्ट्रीक विभाग श्री. सावळे :-** ५ ते ७ अर्ज आले.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** एकही ठेकेदार काम करत नाही.

**मा. आयुक्त श्री. कुलकर्णी :-** P.W.D. चे इले. डिपार्टमेंटला आपण ऑडीट करण्यासाठी पाठवले २०% बिल आपण सरसकट सगळयांचे ठेवले जो जबाबदार व्यक्ती असेल त्याच्यावर कार्यवाही करू.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** मे.अमित इलेक्ट्रीकल औरंगाबाद गुन्हा दाखल करा.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** आपण आधी रिपोर्ट घेउ,करारनामा पाहून त्याप्रमाणे काम केले की नाही ते पाहून घेउ आणि कारवाई करू.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** इलेक्ट्रीक संबंधीत नगरसेवक हैरान झालेले

**मा.सभापती साहेब :-** पुढील स्थायी समितीच्या बैठकीमध्ये याबाबत सविस्तर अहवाल सादर करावा. तसेच जर अमीत इलेक्ट्रीकल वाला दोषी असेल तर त्याच्यावर लगेच योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

**मा.श्री. उमेश कवडे :-** विदयुत साहित्य ३ ते ४ महिने झाले मिळत नाही आम्हाला खिशातून पैसे देतो. स्थायी समिती इर्मजंसी तरतूद काही नाही का ? नगरसेवकांनी खिशातून पैसे घालायचे का ?

**मा.सभापती साहेब :-** पुढ सभा सोमवार दिनांक २६/०५/२०१४ रोजी सकाळी १०.३० वा. ला सुरूवात करू प्रत्येक कडेने माहिती व्यवस्थीत घेउन या.

**दिनांक २३/५/२०१४ ची सभा झालेल्या व दिनांक २६/०५/२०१४ रोजी सकाळी १०.३० वा मा. स्थायी समिती सभागृह येथे अंदाजपत्रक बाबतच्या सभेस पुन्हा सुरूवात झाली**.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** वारूळाच्या मारूतीकडे कुत्र्याचे नसबंदी ऑपरेशन थिएटर आहे.

**आरोग्याधिकारी डॉ.राजुरकर :-** वारूळाच्या मारूतीकडे श्वानप्रकल्प नरसाळे यांना ३ वर्षापुर्वी ठेका दिला होता. त्यांच्याबददल तक्रारी आल्याने,त्यांचे बील रोखले आहे.त्यामुळे ते कोर्टात गेलेआहेत.सदर ठेकेदाराने शेड ठोकली होती.

**मा.श्री. दिप चव्हाण :-**आपण ठेका रदद केला दोन डॉक्टरांना तात्पुरती नेमणुक दया.

**आरोग्याधिकारी डॉ.राजुरकर :-** श्वान बिजनिर्मीती प्रकल्प प्रणीमात्र नियामावलीनुसार मागील वर्षी सहा वेळेला ई निविदा प्रसिध्द केली होती. परंतु काही प्रतीसाद मिळाला नाही.जी इच्छुक संस्था असेल त्यांनी उनाड कुत्रे पकडणे ई निवीदा या वर्षी प्रसिध्द करणार आहोत.आपण म्हणताकी डॉक्टर नेमणूक करून काम करावे. पण आपण हे सर्व करण्यासाठी मॅन पॉवर जास्त लागेल.तक्रारी वाढतील.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** ५० किलोमीटर च्यापुढे जरी कुत्री नेवून सोडली तरी परत येतात.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** चेन्नईची जी संस्थाआहे त्यांना काम करू दयाना.

**आरोग्याधिकारी डॉ.राजुरकर:-** आपल्याला सक्षम संस्था पाहिजे.मागच्या संस्थेला रजिस्ट्रेशन नव्हते.

**मा.सभापती साहेब :-** मा.आयुक्त सांगतात तसे चेन्नईशी पत्रव्यवहार करा.

**आरोग्याधिकारी डॉ.राजुरकर :-** बाहेरच्या संस्था यायला तयार नाही.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** मागच्यावर्षी आपण प्रयत्न करून संस्था आल्या नाही.

**मा.श्री.उमेश कवडे:-**पा.नं.४५वरील वाहन दुरूस्ती खर्च अ.क्र.४,कचरा गाडीचे बील न मिळाल्यामुळे गेल्या पाच महिण्यापासुन गाडी वॉर्ड मध्ये पाठवित नाहीत.वाहन लवकार दुरूस्त होत नाही.

**मा.उपायुक्त(सा)डॉ.डोईफोडे :-**१५दिवसात यादी करून दया.दुरूस्तीचा खर्च वेगळा ठेवून देवू. पाणीपुरवठयासाठी पण खर्च राखीव करू. जो खर्च राखीव आहे.तो त्याच कामासाठी वापरा.

**मा.आयुक्त श्री.कुलकर्णी :-** किती बिल पेंडींग आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पालिकेकडे किती वाहन आहे.ट्रॉक्टर,कचरागाडी

**मेकॅ. इंजि. श्री. निकम :-** ८९ गाडया आहेत पैकी ७१ गाडया आरोग्य विभागाकडे आहे.
मोटार व्हेईकल विभागाकडे पाच गाडया आहेत.पाणीपुरवठा विभागाकडे ३ गाडया आहेत.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** मागेच्या वर्षी खर्च किती झाला.

**मॅके.इंजि. श्री. निकम :-** रूपये ४९७०००/- खर्च झाला सन २०१३-१४ अखेर रिपेअरींग खर्च झाला.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** अ.क्र. ५ वर रूपये ३ कोटी ५० लाख खाजगी तत्वावर कचरा संकलन करणे ते सांगा.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** डॉ. पैठणकर माहिती सांगा.

**उपआरोग्याधिकारी डॉ. पैठणकर :-** कचराकुंडी व कचरा गाडयाचा कचरा संकलन करणेबाबत कचरा डेपो पर्यत कचरा पोचेवणे साठी ठेका देणेकामी तरतूद आहे. ठेकेदाराला गाडया आपण पुरवणार आहोत.

**मा.सभापती साहेब :-** २ ठेकेदार गेले. तरी आपण एकत्रच ठेका देता. ४ झोनचे ४ ठेकेदार नेमा.कचरा संकलन व वाहतुक प्रभाग निहाय टेंडर काढावे.तसेच हॉटेल वेस्ट, भाजी मार्केट,फळ मार्केट यांचे साठी हॉस्पीटल वेस्टेज च्या प्रमाणे स्वतंत्र टेंडर काढावे.

**मा.सभापती साहेब :-** कंटनेरचा विषय माझ्या माहितीप्रमाणे स्थायी समिती कार्यालयाकडे आहे.

**मा.श्री.अजिंक्य बारेकर** :- कंटनेर खरेदी करिता रू.१ कोटी खर्च आपेक्षीत असताना तरतुद रूपये १ लाखाच केली आहे कसे चालेल.

**मा.सभापती साहेब :-** कंटेनर, कॉम्पॅक्टर, डंपर प्लेसर इ. खरेदी करिता तरतूद रूपये ४९ लाखाची वाढ करण्यात यावी.

**उपआरोग्याधिकारी डॉ. पैठणकर :-** आपण प्रयत्न केला होता पण ते जमल नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण:-**नगरपालिका होती तेव्हा आपणच कचरा गोळा करत होतो. आपल्याकडे लोकही आहेत. हद्दवाढ संदर्भात मुद्दा बाजूला ठेवा. कामगारांची संख्या कमी झाली नाही. कामाची पध्दत बदलली कर्मचा-यांना आपण पगार देतो. आपल्याकडे परमनंट कामगार आहेत. तुम्ही संकलन सकाळी करणार का दुपारी करणार तुम्ही एका बाजूने रूपये ३ कोटी ५० लाखाची तरतूद करता दुस-या बाजूला आपल्याकडे जे परमनंट कर्मचारी आहे त्यांच्या पगारावर पण आपण खर्च करतो.

**उपआरोग्याधिकारी डॉ.पैठणकार :-** आपल्याकडे ड्राइव्हर कमी आहे. आपले बिगारी ड्राइव्हरचे काम करतात.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** गावठाण आणि हद्दवाढ यामध्ये कामाचा बदल दिसायला पाहिजे ४० लोक काम करतात. ३५० कुंडया नगर शहरात आहे. ३५० पैकी नगर शहरात किती हा प्रश्न सोडवायचा असेल तर त्याचे २ भाग करावे लागतील. त्या जातीच काम करणारे माणूस ठेकेदाराला मिळत नाही. कर्मचा-याच्या पगारावर आस्थापना खर्च वाढतो. तर तुम्ही खाजगी ठेकेदारावर पण खर्च करतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** पान नंबर ४६ वरील खाजगी तत्वावर कचरा संकलन करणे या लेखाशिर्षा अंतर्गत असणारी तरतुद रु.२५ लाख कमी करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** खाजगी तत्वावर कचरा संकलन करणे या लोखाशिर्षा अंतर्गत असणारी तरतुद रु.२५ लाख कमी करण्यांत यावी.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** उपनगरामध्ये काम करायला कर्मचारी कमी पडतात मानधनावर ड्राइव्हर परवडतो हा प्लॅन आहे याच्यावर आपण बसून चर्चा करू.

**मा.श्री.संपत बारस्कर -** पुण्यात लाईट चे काम करण्याकरीता छोटा हत्ती गाडया वापरून काम करतात.

**मा.सभापती साहेब :-** श्री.साबळे श्री.निकम काय आहे.

**मॅके.इंजि.श्री.निकम :-** आपण त्या प्रकारच्या दोन गाडयांची तरतुद केली आहे.

**मा.सभापती साहेब व मा.श्री.दिप चव्हाण :-** ४ गाडया घेउन ४ झोनला ४ गाडया दया. ४ गाडयाची तरतूद करा. नविन वाहन खरेदी करीता रु.१५ लाखाचे ऐवजी रु.३५ लाखाची तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पालिकेचे आस्थापना सुचीवर ड्राइव्हर किती

**मॅके.इंजि. श्री. निकम :-** ३५ ड्राइव्हर आहेत.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** दोन शिफटमध्ये काम चालते ना ? ड्राइव्हरची संख्या कमी नाही ना? फायर फायटरला किती ड्राइव्हर आहे. ड्राइव्हर संबंधी ठेका काढून तो प्रश्न सुटेल ना.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पान नं . ४६ अ.क्र. १२ महापौरच्या यादी आधारे २५ लाखाच लेखाशीर्ष कसे तयार झाले. हा गंभीर गुन्हा झालेले आहे. २५ लाखाची तरतूद ही गुन्हा पात्र आहे लेखाशिर्ष यादीवरून तयार झाले महापौरच्या यादीवरून करता येत का ?

**प्रभारी मुख्यलेखाधिकारी श्री. परशरामी :-** नाही.

**मा.सभापती साहेब :-** करता येत नाही पण तुम्ही केले.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** मा. महासभेची शिफारस होउन आमच्याकडे येते.

**मा.सभापती साहेब :-** डॉ. पैठणकर काम चालू आहे का ?

**उपआरोग्याधिकारी डॉ. पैठणकर :-** वकिलाकडे फाईल मतासाठी पाठवलेली आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** कामगार आयुक्तांनी पत्र पाठवले आहे का ? त्या ठेकेदाराचे आणि आपले रजिस्ट्रेशन व्हायला पाहिजे ते झाले नाही रूपये २५ लाखाची तरतूद कमी करावी लागेल.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** महिलांसाठी शौचालय नाही आहे त्यांना त्यांनी वारंवार मागणी केली आहे. महिलांसाठी स्वच्छतागृह प्रत्येक वॉर्ड वाईज जागा सुचवून करा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** बांधकाम मध्ये आहे ना खाजगी असे हेड तयार करता येत नाही. साहेब हा लेखाशिर्ष उडवुन टाका.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-**त्यापेक्षा महिलांसाठी स्वछतागृह तयार करा. ही मॅनेज झालेली तरतुद आहे

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आयुक्त साहेब कॅफोनी तुमच मत घ्यायला हवे होत ना ?

**मा.सभापती साहेब :-** आयुक्त साहेब तुम्ही टी.पी.च्या लोकांना जागा दयायला सांगितले होत कुठे आहे जागेची यादी माहिती मागावा नाही कुणी आले पुढे तर पालिके मार्फत करा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** महिला स्वच्छतागृहासाठी किती तरतूद आहे.

**शहर अभियंता श्री. मगर :-** मुतारी साठी आहे शौचालयासाठी नाही.

**मा.सभापती साहेब :-** खाजगी तत्वावर शौचालय देखभाल दुरूस्ती करीता रक्कम रूपये २५ लाखा ऐवजी ६ लाख करण्यात यावी.

**मा.श्री.दिप चव्हाण:-**बी.ओ.टी. तत्वावर काम झालेले आहे.पण घनकचरा बी.ओ.टी.तत्वावर देणेबाबत मा. शासनाचे परिपत्रक आणा. घनकचरा प्रकल्पावर खर्च किती झाला.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** बुरूडगावच्या काही नागरिकांनी हायकोर्टात आपल्या विरोधात रिट दाखल केली होती भिंत पडली होती त्यावेळी आपण कपौंड वॉलचे काम करून घेतल २० एकरच कचरा डेपो जी जागा आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** तुम्ही म्हणतो ते बरोबर आहे ओला कचरा व सुका कचरा वेगळा ठेवणे बाबत त्याच्यावर कोटेशन मार्फत किती खर्च केला.

**प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :-** साडेतीन लाख टन कचरा पॅकींग करायचा रू. ३० लाखाची तरतुद आहे ठेकेदाराला रू.१४ लाखच पेमेंट केले.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** इर्मजंसी मध्ये आयुक्तांना रू.६४ लाखाची अधिकार आहे. बुरूडगाव येथे लोकांना कचराडेपोच्या बाजूला जे रहातात त्यांना फार त्रास झाला स्थायी समिती प्रस्तावीत नव्हती तेव्हा आयुक्तांच्या अधिकारात ते काम केले जानेवारी पासून टेंडरला कुणीही प्रतीसाद दिला नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** ३ कोटी रूपयाच्या तरतुदीबाबत याच्या तुम्ही काय काय धरले ३ कोटीवर खर्च करून मनपाच्या मालकीचे मशीनरी होणार नाही.

**प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :-** सगळया आपल्या मालकीच असणार आहे प्लीथपर्यतचे बांधकाम व आर.सी.सी. चे काम त्यातून डिलीट केले. ५५ लाख रूपयचे काम झाले तो सोडून गेला.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** तो सोडून गेला पण त्याची प्रोसीजर काम केली मागेचा जो गेला त्याच काय ?

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** आपण त्याला ७ वेळा नोटीसा देउनही तो आला नाही त्याच सामानही आपल्या ताब्यात आहे तो कही पैसे घ्यायला येणार नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** प्रॅक्टीकली काम भिंगारच काळे करतो तो कोण.

**प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :-** काळे हा बोराचा मॅनेजर आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** बोराची नेमणूक अजून झाली नाही.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** प्रस्ताव तुमच्याकडे येणार आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** विषय सोडुन चर्चा झाली नाही पण विषयाच्या अनुषंगानेच आम्ही बोलतो

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं. ४७ अत्यंविधी खर्च वाचन

**मा.श्री. उमेश कवडे :-** विदयुत दहिनीचे बिल न भरल्यामुळे विदयुत दाहिनी बंद आहे त्यासंबंधी संख्या म्हणते की बिल मनपाने भरावे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** अंत्यविधीसबंधी लाकूड व जनतेचे पैसे माफ करून त्याचा खर्च मनपा देते विदयुत दाहिनी संदर्भात पत्र कुणी दिले त्याला जागा आपण फुकट दिल. त्याच्या करारामध्ये लाईट बिलाच खर्च ती संस्था करत होती तो प्रोजेक्ट बी.ओ.टी. तत्वावर आहे मनपाने खर्च दयायचे या विषयावर बोला.

**आरोग्याधिकारी डॉ.राजुरकर :-** अंत्यविधी योजना मागील सभेमध्ये गणेश भोसले व संजय चोपडा यांनी पत्र देउन मोफत अंत्यविधी संबंधी पत्र दिल होते. विदयुत दाहिनीमध्ये अंत्यविधी मोफत करावी. बोरा ट्रस्ट रू.१२००/- शुल्क आकारत होती. ट्रस्टने पत्र दिले की आम्हाला चेकने पैसे घेता येत नाही.

तर त्याबद्दल्यात लाईटचे बिल मनपाने अदा करावे. ५०% बिल मनपाने अदा करावे. साडेतीन बील अदा केले. मागील आकडेवारी पहाता ४६९ मयताचे दहन झालेले आहे. ४७२x१२=४,५९,०००/- रूपये होत प्रस्ताव असा आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** जर ठरल होत तर देगणीदाराने देणगी दिली का ? नगरसेवकाच्या मागणी नुसार मोफत का केली ?

**मा.श्री. उमेश कवडे :-** आपल्या हिंदू धर्मात जर मयतीचा खर्च केला तर आपण त्याचे पैसे ठेवू शकत नाही गरीबातला गरीब सुध्दा मयतीचा खर्च व्यवस्थित करतो.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** लाईट बिला संबंधी बोलू.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** आपण जो ठराव केला त्यानंतर त्यांनी पत्र दिले. आपण जो मोफतचा ठराव केला त्यानंतर ही मागणी झाली.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** जेव्हा ठराव झाला नव्हता. महासभा ठरावानंतर मिटींग झाली तेव्हा ५०% बिल आपण दयावे हा महासभेचा ठराव आहे.त्यामुळे महासभेत निर्णय व्हायला पाहिजेत.

**मा.सभापती साहेब :-** ठिकआहे .महासभेपुढे घ्या.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** उपनगरासाठी अमरधामची व्यवस्था पाहिजे. कारण उपनगरामधून नालेगांव अमरधामाला येणे सोपे नाही फार त्रास होतो.

**मा.श्री. अजिंक्य बारेकर व मा.श्री. कुमार वाकळे :-** जर प्रेत आणले जर नंबरला थांबाव लागत ही अवस्था वाईट आहे.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** एखादा TDR देत नसलो तर

**मा. श्री. दिप चव्हाण :-** शिरसाठ मळयातील TDR बाबत बोला.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** ते आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे. जोशींना माहिती नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** स्मशानभूमी बाबत उपनगरासाठी व्हायला पाहिजे.

**मा.सभापती साहेब :-** आराखडा फायनल व्हायला पाहिजे. नागापूर, बोल्हेगांव, सावेडी परिसरातील नागरिकांना अमरधाम हे लांब अंतरावर असल्याने खर्चिक आहे. सद्यस्थितीत वरील उपनगरामध्ये अमरधामची व्यवस्था नसल्याने शव पायी नेणे शक्य होत नाही. गरीब व गरजू नागरिकांसाठी ॲम्ब्युलन्स मधुन शव नेणे आर्थिक दृष्टया न परवडणारे असल्याने शववाहिका (रथ) व ॲम्ब्युलन्स करीता रक्कम रु.८ लाखाने तरतुद वाढविण्यांत यावी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** रक्तपेढीसाठी उपकरण खरेदी व खर्च

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** खरेदी झाली नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** औषध खरेदी अ.क्र. ७ व ८ बाबत. वाचन

**मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :-** ब्लड मधून ३ घटक वेगळे केले जातात. त्यासाठी जे मशीन लागतात ते घेण्यासाठी रू.५००००/- ची तरतूद आहे.

**मा.सभापती साहेब :-** रक्तसंकलन करणेसाठी नविन वाहन खरेदी करणेची ही सभा शिफारस करीत आहे. रक्कम रु.१५ लक्षची तरतुद करण्यांत यावी. नविन लेखाशिर्ष निर्माण करण्यांत यावे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-**८ नंबरचा खरेदीचा विषय आहे.आपले औषध वापरणारे लोक कमी आहेत. सप्लायर मार्फत खरेदी करतो. खर्चामध्ये काटकसर करा खाजगी सप्लायर कडून खरेदी करू नका. जेनेरिक नाव टाकून खरेदी करा.टेंडर प्रोसेस पण कमी होईल.रु.१०लाखाने तरतुद कमी करण्यांत यावी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** एकूण बजेटच्या ३ % तरतूद अपंगासाठी ठेवयायला पाहिजे.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं. ८६ वाचन

**मा.श्री. दिप चव्हाण :-** तुम्ही तरतूद शून्य दाखवली आहे व बंधनकारक असल्याची टिप ही टाकली आहे. तेथे तरतुद करा. सुरूवातेतर करा जी रक्कम येईल ती तेथे दाखवा या नियमावली करा.शून्य उडवून बजेटप्रमाणे तरतुद दाखवा.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** १८ कोटी ९८ लाख मधुन तीन टक्के येथे दाखवणार.रू.२ लाख तरतूद आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण** :-फिरत्या दवाखाण्याची किती तरतुद आहे

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** दोन लाख तरतुद केली आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** रू. २ लाख कशाला लागतात.कशाच्या आधारे केली.

**आरोग्याधिकारी डॉ.राजुरकर :-** मेडिकल ऑफिसरच पेमेंट, औषध खरेदी , गाडीचा मेटनर्स

**मा.श्री. दिप चव्हाण :-** तुमच्या रेग्युलर मधील पार्ट आहे. मग तरतुद कशासाठी याला खर्चाच नाही.

**मा.सभापती साहेब व मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** शववाहिनी व ॲम्प्युलन्स घ्यायला पाहिजे. बेवारस साठी आपण काय करतो.

**मॅके.इंजि. श्री. निकम :-** शववाहिनी आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** शववाहिनी व ॲम्प्युलन्स घ्या. त्यासाठी रू. ५ लाखाची तरतूद वाढवा.

**मा.सभापती साहेब :-** रक्कम रूपये ५ लाख वाढवा.

**मा.श्री.दिपचव्हाण:-**आपण कुत्र्यांवर खर्च करतो.फिरत्या दवाखान्यावर फिरतो तर वेडे व कुपणरोग्या वर खर्च करा.त्याचा प्रस्ताव करा.स्मशान सुधारणा बजेट शुन्य आहे स्मरशान भुमीवर शुन्य आहे.

**शहर अभियंता श्री. मगर :-** पान नं. ६४ वर रू.१८ लाखाची तरतूद आहे.

**मा.श्री. उमेश कवडे :-** पिंजरे खरेदी रू. १ लाखाची तरतूद आहे.

**मा.सभापती साहेब :-** पिंजरे खरेदी टोकन रु.१ हजार करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** आता पान नं. ५० वर कोंडवाडयावर चर्चा करा. फक्त २ माणसे काय काय करणार कुठे कोंडवाडा बांधणार वारूळाच्या मारूतीला जागा आहे. तिथे कोंडवाडा बांधा लोक त्याला विरोधी करणार नाही. रू.४ लाखात बांधकाम होईल का ? पिंपळगावच्या कोंडवाडयाला एकही जनावर नाही. रस्ते , गटारी, तेचतेच करण्यापेक्षा याच्यात लक्ष घाला. दोन लाख कोंडवाडयात वाढवा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हार फुल गुच्छा पहिले आपले बगीच्यातील फुलापासून तयार करायचे

**उदयान अधिक्षक श्री. गोयल :-** पहिल होत होत आता होत नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** नगरपालिका होती तेव्हा होत होत आता मनपा झाली तर होत नाही का ?

**मा.सभापती साहेब व मा.श्री. दिप चव्हाण :-** उदयान व कारंजे संबंधी तरतूद पूर्वी कसे होते. एकूण कांरजे किती

**उदयान अधिक्षक श्री. गोयल :-** १५ कांरजे, ३ कारंजे मिळून एक माणूस

**मा.श्री. दिप चव्हाण :-** वॉचमन कोण आहे.

**उदयान अधिक्षक श्री. गोयल :-** अप्पू हत्तीला रामा हुच्चे वॉचमन आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** अप्पू हत्ती आपण खाजगी संस्थेला दिला आहे.

**मा.सभापती साहेब :-** तिथे वॉचमन बसून राहतो का ?

**उदयान अधिक्षक श्री. गोयल :-** नाही.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** गार्डन विभागाला १०० लोक असे आहे जे कधीच कामावर येत नाही काहीतरी बदल करा ना ? बालभुवन ला वॉचमन नाही जिथे दुरूउपयोग चालले तिथे वॉचमन नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** उपनगरामध्ये कुठेच उद्यान, बागा दिसत नाहीत. उद्यानासाठी आरक्षीत जागा भरपुर आहेत. उपनगरामध्ये उद्यान होणेकरीता बजेटमध्ये तरतुद करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** बुरुडगांव रोड व केडगांव या भागात उद्यान विकसीत करणे तरतुदीमध्ये प्रत्येकी ५ लाखाने वाढ करावी. तसेच सारसनगर, बोल्हेगाव परिसर, कॉटेज कॉर्नर जवळ,मुकुंदनगर, येथे उद्याने विकसीत करणेकामी शिफारस करण्यांत येत आहे. याकामी प्रत्येकी १० लाख रक्कमेची तसेच कल्याण रोड (शिवाजी नगर) येथील नालेगांव स.नं.३३/१,३४ या भागास रु.१५लाख तसेच नालेगाव स.नं.५/२ संभाजीनगर रू. ५ लाख अशी तरतुद करण्यांत यावी. तसेच यासह नव्याने येणा-या प्रस्तावाबाबत देखिल योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.श्री.सचिन जाधव :-** उपनगरातील ओपन स्पेस किती आहेत.

**सहा. नगररचनाकार श्री.जोशी :-** सध्या माहिती नाही. रेकॉर्ड पाहुन सांगतो.

**मा.सभापती साहेब :-** आपल्या बुरुडगांव कार्यालयाच्या लगत एक चांगला ओपन स्पेस आहे. तो विकसीत केला तर तेथे येणारांना सोईचे होईल. ओपन स्पेस विकसित करणेकरीता प्रभाग समिती क्र.४ कार्यालय लगत ओपन स्पेस विकसित करणे या नावाचे नविन लेखाशिर्ष तयार करुन रक्कम रु.१४ लक्षची तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.उमेश कवडे :-** मनपा शाळांची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. रिमांड होम मधील मनपा शाळेची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. शाळा दुरुस्ती करीता निधीची तरतुद वाढविण्यांत यावी.

**मा.सभापती साहेबः-** शिक्षण मंडळाच्या शाळा दुरुस्तीकरीता रु.२ लाखाची तरतुद वाढविण्यांत यावी.

**मा.श्री.दिप चव्हाणः-** पान नं.५१वर आयुक्त साहेब म्हणाले होते की, मनपा जुने सभागृह दुरूस्त करू.

**मा.सभापती साहेब :-** ते ऐतिहासिक सभागृह आहे. ते दुरूस्त व्हायलाच पाहिजे पैसे जास्त लागेल तरी चालेल.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** दुरूस्ती संबंधी प्रोसेस व्हायला पाहिजे होत. २ वर्षापासून काहीच केले नाही रू.६ लाखाची तरतूद आम्ही वाढवतो पण ते दुरूस्त करा. कारण तिथे कार्यक्रम होत होते रू. ६ लाखात काय होणार आहे.

**मा.सभापती साहेब :-** नगरकरांच्या भावनांचा प्रश्न आहे.महासभेपर्यत खर्चाचा आकडा काढा व त्या खर्चाच्या तरतुदीला मान्यता देवू.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** मंगल कार्यालयात सेवाकर म्हणजे काय कोणत्या मंगल कार्यालयाचे चालू अवस्थेतीस ३ मंगल कार्यालय

**शहर अभियंता श्री. मगर :-** मंगल कार्यालयाच्या आपण खाजगी तत्वावर दिले. १ मंगल कार्यालय चालवायला दिले. ३ आपण चालवतो.

**मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :-** सर्व्हिस टॅक्स आपल्या नावावर येतो त्यामुळे ते आपले हेड आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** जमा- बाजू रू. २ कोटी होती. जी काम दयायची त्या संदर्भात ही तरतूद आहे. आपण डेव्हलपमेंट प्लॅनची तरतूद आहे. त्याल्या मार्कींगला सुध्दा खर्च केला नाही.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** ७५ टक्के ही रक्कम ठेवावी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** दाळमंडई, भुसंपादन करण्यासाठी जी तरतूद आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** विकासभार निधीतून खर्च रू. ५० लाख तो कुठे खर्च करणार त्यात रस्ते, गटारी , वगैरे, हा निधी कुणाकडे जातो. विकासभारातून कुठे खर्च झाला.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** बरेच खर्च झाला यादी देता येईल.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** विकासभार निधीतून काम करायच तर ते कुणाकडे सुचवायच.

**शहर अभियंता श्री. मगर :-** विकासभार योजनेतील काम आपण घेवू शकतो.

**मा.सभापती साहेब :-** मगर साहेब तुम्ही सिटी इंजिनिअर असताना गावठाणात खर्च झालेले आहे. याच्यात भष्ट्राचार झालेला आहे मी तुम्हा दाखवुन देईन.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** नवीन नगरसेवक निवडून आल्यानंतर त्यांना नगरसेवक निधी सोडून दुस-या योजनेची माहिती नसेत.

**मा.श्री. सचिव जाधव :-** आयुक्त साहेब आम्हाला माहिती सांगा. प्रत्येक वॉर्डला वाटून दया.

**मा. सभापती साहेब :-** मगर साहेब निट ऐका महत्वाचा मुद्दा आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** महानगरपालिकेची तरतूद १ व खर्च वेगळा जेवढया डेव्हलमेंट प्लॅनल बाबत सांगतो नेहरू पुतळया मागचा रस्ता आपण त्याला मार्कींग केली नाही तर लोक तिथे अतिक्रमण करणार नाही. विकास निधी करताना यादी कोण नाही.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** आजपर्यंत झालेले काम बेकायदेशीर आहे.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** आपण पहिल्यांदा पैसे भरून घेतो लवकर काम झाले नाही. ४ ते ५ वर्षाचा गॅप पडतो नगरसेवकांना कुठेल्या कुठेल्या योजने अंतर्गत निधी आहे. याची माहिती देता येईल. रस्ता कधी बांधला त्यासाठी किती खर्च झाला. त्याची लेवलींग करायला सांगीतले म्हणजे तक्रारी रहाणार नाही. आपल्याकडे दलित वस्तीला पैसे असतात. शहराचा सर्वागीण विकास करायचा असेल तर मागे काय झाले हे पहाण्यापेक्षा आपल्याला पुढे काय करायच ते पाहिल तर आपल्या काही सुधारणा करता येईल.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** विकासभाराबाबत प्लॅन महासभेपुर्वी करा.

**मा.सभापती साहेब :-** आता कामात बदल करा. रजिष्टर करून फेडरेशनला दया. तुमच्या कामात बदलच पाहिजे जे पूर्वी होत होते ते आता चालणार नाही.विकास भाराची कामे कराल त्यावेळी स्टॅंडींग कमिटीला सादर करा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** याची प्रोसीडींगला नोंद घ्या. या कामाचे रजिस्टर पण नाही.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** माझा प्रभाग १ आहे त्यात जास्त सुधारणा करणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** उपनगरामध्ये रस्ते नाही.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** डॉ. आठरे पाटील पब्लिक स्कुल कडे रस्ता बरोबर नाही. पावसाळयात जास्त त्रास होतो.

**उपआरोग्याधिकारी डॉ. पैठणकर :-** लिस्ट मागवून माहिती सांगतो.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** सावेडी ओढयाच्या दोन्ही बाजूला घरे आहेत तर तो याला आपल्याला साफ करता येते का ?

**अतिक्रमण प्रमुख श्री. इथापे :-** हो करता येतो जिथे मशीन जात नाही तिथे मॅन्युअली करतो.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** गाळ काढायचे टेंडर आहे का वाहून नेण्याचे आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पांरपारिक काम आहे.

**मा.सभापती साहेब :-** तुम्ही पदाधिका-यांना बोलवत नाही फक्त अतिक्रमण प्रमुख इथापे, उपआरोग्याधिकारी पैठणकार व उपायुक्त (कर) श्री. बेहेरे यांनाचे माहिती आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** श्री. बेहेरे नवीन आहेत.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** जिथे काम चालू आहे. तिथे संबंधीत नगरसेवकांना बोलवत जा.

**उपआरोग्याधिकारी डॉ. पैठणकार :-** इतर कॉलनी भागात जे काम आहे ते अतिक्रमण जास्त आहे तिथे गाळ मॅन्युअली काढावा लागेल.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** सिना नदी पात्रातील अतिक्रमण बाबत बोला.

**मा.श्री. उमेश कवडे :-** तिथे रू. १० लाख खर्च दाखवला पण कुठे अतिक्रमण काढले.

**अतिक्रमण प्रमुख श्री. इथापे :-** सिना नदी मध्ये काटे, गाळे जो आहे तो काढतो अतिक्रमण नाही.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** सिना नदी सुशोभिकरणाबाबत रू.५५ लाख भरा असे सांगितले आपण ही बाब कलेक्टर साहेबांच्या कानावर घातली जोपर्यत पुरेशा ठरत नाही तोपर्यत अतिक्रमण काढण्याचा प्रश्न येत नाही. पुररेशा ठरेपर्यत आपल्याला काम करता येत नाही हा मा. शासनाच्या निधी असतो.

**मा.सभापती साहेब :-** सीना नदी प्रदुषण प्रतिबंधा बाबत तात्पुरती उपाययोजना या कामाकरीता मा.राज्य शासन,केंद्र शासन यांचेकडून अर्थसहाय्य मिळण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करणेबाबत ही सभा शिफारस करीत आहे. सीना नदी प्रदुषण प्रतिबंधा बाबत तात्पुरती उपाययोजना या कामाकरीता १० लाख इतकी तरतुद ठेवण्यात यावी.

**मा.श्री. उमेश कवडे :-** सिना नदी मुळ पात्रात गाळपेर आहे त्याविषयी माहिती पाहिजे.

**मा.सभापती साहेब :-** पुरनियंत्रण रेशा ठरल्याशिवाय काहीच करता येणार नाही का ?

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** जागा कुणाची आहे यापेक्षा महत्वाचे अतिक्रमण आहे.

**मा.श्री. उमेश कवडे :-** पावसाळा जवळ आला आहे. आपण सगळे कलेक्टर साहेबांना भेटू तुम्ही कुणालाही घाबरू नका ग्रीन बेल्ट मध्ये किती बांधकाम झाले.

**मा.सभापती साहेब :-** ग्रीन बेल्ट मध्ये बांधकाम करू शकतो का ?

**नगररचनाकार श्री. तारळेकर :-** करता येत नाही.

**मा.श्री. उमेश कवडे :-** कल्याण रोडला मोठे मोठे बांधकाम ग्रीन बेल्ट वर झालेले आहे.

**मा.सभापती साहेब :-** पान नं. ५५ शिक्षण मंडळाचे बजेट वाचन

**मा.श्री. दिप चव्हाण :-** शिक्षण मंडळाच्या बजेटच दुसरे पान कुठे आहे.

**श्री. पठाण :-** पुर्ण दिलेले आहे साहेब

**मा.श्री. दिप चव्हाण :-** कॅफोची चूक आहे.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** ५० टक्के आहे ते बरोबर आहे ५०टक्के, १०० टक्के त्यांनी आपल्याला दाखवल पाहिजे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आमच्या बजेट बरोबर तुमचे दोन बजेट पाहिजे.

**श्री.पठाण :-**११८० विदयार्थी संख्या ३६ शिक्षक संख्या शाळा १२आहेत.उर्दू शाळेला ४ शिक्षक आहे. तुकडी १,१ मराठी शाळा १०चालू आहे.२०च्या पुढे पट पाहिजे म्हणजे शाळा चालू राहते शिक्षक ४९ पाहिजे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** अतिरिक्त शिक्षक किती.

**श्री. पठाण :-** आपल्याकडे अतिरिक्त नाही ५० शिक्षक कमी आहे. मा. शासनाकडून शिक्षण योजने अंतर्गत योजना आहे ती संबोधी विदयालयात भरते.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** या योजनेवर खर्च किती झाला.

**श्री. पठाण :-** अपंग विदयार्थीसाठी शिक्षक घरी जाउन दोन तास शिक्षण देतात.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** सभापती दूरध्वनी खर्च व वाहन खर्च

**श्री. पठाण :-** सभापतीचे वाहन, वाहनावर खर्च झाला. प्रतीपूर्ती योजना आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** दि.१/४/२०१२ ला मा. शासनाने वाहन प्रतिपूर्ती बंद केलेली आहे.

**श्री. पठाण :-** सन २००७ च्या मा. शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद कडे सर्व अधिकार केले आहेत.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** मा. शासनाचा नियम असा आहे की, १ कि.मी. आत राहणारे नागरिकांना ॲडमिशन साठी प्राधान्य दयावे असे आहे.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** लेखी तक्रार आल्यानंतर हियरींग घ्यायचे अधिकार आहे.

**मा.श्री. सचिन जाधव :-** डोनेशन घेणे जरूरी आहे का ?

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** आता सिस्टीम आली आता आपल्याकडे अधिकार आले उपायुक्त , प्रभाग अधिकारी , जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी यांची कमिटी नेमली आहे लेखी तक्रार आल्यानंतर हेरींग साठी बोलावल तक्रार ऐकून घेतल्यानंतर निर्णय होईल.

**मा.श्री. सचिन जाधव :-**ज्यांच्याकडे पिवळ कुपन आहे त्यांच्याकडून सुध्दा डोनेशन घेतल आहे.

**मा. सभापती साहेब :-** आयुक्त साहेब तुमच्याकडे जे अधिकार आले. सगळे सदस्यांना माहिती दया.

**मा.आयुक्त श्री. कुललकर्णी :-** मा. शासनाच्या नियमाबाहेर जाउन मी काही करू शकत नाही.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** आता शाळांचे नियंत्रण ,तपासणी कोणाकडे आहे ते सांगा.शाळेच्या १ कि.मी.अंतरावर राहणा-या लोकांना ॲडमिशन मिळाली पाहिजे नंतर बाहेरील लोकांना ॲडमिशन दया.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** शिक्षण मंडळाने १०० टक्के बजेट मांडाव एवढी विनंती आहे मनपाच्या शिक्षण मंडळाने किती शिष्युवत्त्या दिल्या.

**मा.श्री. उमेश कवडे :-** शिक्षण मंडळात भरती प्रक्रिया झाली त्याची डिटेल दया. माध्यमिक शिक्षकांची झाली त्याबाबत माहिती दया.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** शिक्षण मंडळाने महासभेत १०० टक्के बजेट मांडावे .

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-**पा.नं ९० वर अ.क्र.१ कर्ज ३५ लाख घेतले त्यात ली मुद्दाल रू २लाख ६६८

**मा.श्री. दिप चव्हाण :-** प्रदूषण संबंधीत मंडळ आहे त्यातील निकष काय

**प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :-** पाणी तपासणी शुल्क, सिनानदी पाणी , गणपती विर्सजन , विहीर तपासणी चे शुल्क आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** महसुल खर्च, सामान्य प्रशासन विभाग इथे सुधारणा करायला पाहिजे. शिल्लक तुम्ही दाखवता हा बँकेचे सर्टिफिकेट पाहिजे कशाच्या आधारे, बॅंकेचे चार्ट पाहिजे. वॉटर ऑडीटचे संबंधी माहिती दया.

**मॅके.इंजि. श्री. निकम :-** वॉटर ऑडीट आपण केले नाही कारण फेज-२ चे काम चालू आहे.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** रॉ. वॉटर उचलताना किती खर्च होतो. मा. शासन स्तरावर आम्ही मुद्दा मांडला कारण आपले काम अपूर्ण आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** D.B. प्लॅन सॅक्शन करताना सन २०१० पासून उत्पन्न वाढीच काय

**मॅके.इंजि. श्री. निकम :-** वॉटर ऑडीट म्हणजे मुळ डॅम मधून किती पाणी उचलतो. शहराला किती पाणी पुरवठा होतो. किती पाणी वाया जातो पाणीपुरवठा योजना फेज-२ पुर्ण झाल्यानंतर १ वर्षांनी त्याच ऑडीट करायचे त्याच्या नंतर दर ३ वर्षांनी ऑडीट करण गरजेचे आहे.

**मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :-** नळाचा पण सर्व्हे होणार आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** पान नं. ५८ वर जमा पाणीपट्टी २१ कोटी धरली मागच्या वर्षी १६ कोटी पैकी वसुल ८ कोटी ५० टक्के वसुली झाली.

**मा.श्री.दिप चव्हाण:-** बेकायदेशीर नळाबाबत मॅन्युअल सर्व्हे संदर्भात किती रेग्युलाईज झाले २००४-०५ मध्ये ५६००कनेक्शन बेकायदेशीर सापडत होते.आता त्याच्यात अनाधिकृत किती वाढ झाली.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** प्रभाग अधिका-यामार्फत रेग्युलाईज नळ कनेक्शन करण्याचे काम चालू आहे.

**मा.उपायुक्तश्री. बेहेरे:-** नियमीत प्रोसेसचा भाग आहे सन२०१२-१३ मध्ये रू.३८ लाख वसुल केले.

**मॅके.इंजि. श्री. निकम :-** सर्व्हेचे काम चालू आहे.GIS अंतर्गत काम चालू आहे.

**मा.सभापती साहेब / मा.श्री. दिप चव्हाण :-** GIS संबंधी माहिती सांगा केडगाव मध्ये योजना झाल्यावर नळ कनेक्शन वाढणार ना.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ८.२५ आली होती ८ कोटीचया ८० टक्के बंद कनेक्शनचा काय सर्व्हे केला अनेक लोकांचे अर्ज आहे.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं. २८ वर सर्वसाधारक कर वाचन

**मा.श्री.उमेश कवडे :-** जी.आय.एस.च्या माध्यमातून शहराचे सर्व्हेक्षण काम होणार असल्याने मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्या महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टी निर्दशनास येउन घरपट्टी उत्पन्नात वाढ होईल. त्यामुळे घरपट्टीच्या सर्व साधारण करात २०% वाढ करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब:-** जी.आय.एस.च्या माध्यमातून शहराचे सर्व्हेक्षण काम होणार असल्याने मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्या महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टी निर्दशनास येउन घरपट्टी उत्पन्नात वाढ होईल. शहरातील ४ झोनच्या अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता मा.उपायुक्त (कर) यांनी वसुली करता उपाययोजना आखल्या आहेत. त्या उपाययोजनांची अंमलबजावणी केल्यासही घरपट्टी उत्पन्नात वाढ होईल. मागील २ वर्षापासून कर विभागाकडे सक्षम अधिकारी नव्हते. अधिकारी रजेवर व प्रभारी कार्यभार असल्याने मागील २ वर्षापासून कर संकलन करणे पुर्ण सक्षमतेने झालेले नाही. आता कर विभागाकडे सक्षम अधिकारी आल्याने करामध्ये वाढ होईल. सर्वसाधारण करामध्ये २० टक्के वाढ व त्यावर आधारीत करामध्ये ही वाढ करण्यात यावी.

**मा.श्री.दिप चव्हाण:-** रू.४ कोटी पाणी वाटपाबाबत जो खर्च होतो तो कमी करण्याबाबत उपाययोजना करा करा टँकरवर रू. ५ कोटी खर्च झाला आणि आपल्या हातात काही नाही आपण काहीच काटकसर करायला तयार नाही.

**मॅके.इंजि. श्री. निकम :-** आपल्याकडे १० टँकर आहेत.

**मा.सभापती साहेब :-** दरवर्षी २ टँकर घ्या.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** अपेक्षेपेक्ष योजनेला वेळ जास्त लागला.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** व्हॉलमन, फिटर कमी व्हायला लागले. त्यासंबंधी काय करणार हेड वॉलमन किती आहे.

**मॅके.इंजि. श्री. निकम :-** हेड वॉलमन १ आहे ते पद रिक्त आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** फेज-२ ची माहिती दया योजनाबाबत किती कि.मी. होती.

**अर्थ विभाग श्री. लोंढे** - पान नं.६४ वर भांडवली खर्च वाचन

**मा.श्री.दिप चव्हाण :-** रस्ते खडीकरण, किती रस्ते , कोणते रस्ते यांचे यादया जोडल्या नाही.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** मागच्या वर्षी जे झाले त्याच्या अबॉव

**मा.श्री. दिप चव्हाण :-** मागील वर्षात एकूण किती मंजूर झाले, खर्च झाला.

**शहर अभियंता श्री. मगर :-** ४२१ काम मंजूर केले रू. ४ लाख ३४ हजार ३६ खर्च झाले. रू.१५ लाखाची तरतुद आहे. मागील वर्षी २० लाखाची तरतुद होती.
**मा.श्री. दिप चव्हाण :-** रस्ते खडीकरण रू. १५ लाख सन २०१३-१४ ला होते. संपुर्ण तरतुद तुमच्यासाठी मंजूर नव्हती. या हेडला किती तरतुद द्यायला हवी.
**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** सर्व हेड मिळुन २५ कोटी करणे आवश्यक आहे.
**शहर अभियंता श्री. मगर :-** बिल अकौंटला जाते ते अदा केल्याशिवाय खर्ची पडत नाही.
**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** १२-१३ चे बिल पेंडीग आहे का ?
**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** लोंढे तुमच्या क्लासीफाईडला आकडा असेल ना ?
**मा.सभापती साहेब :-** तुम्ही तुमचे बजेट रजिष्टर आणा म्हणजे तुम्हाला सांगता येईल.
**मा.श्री. दिप चव्हाण :-** टेंडर मधली मंजूर काम, तातडीचे कामाचे रू.३कोटीचे काम निघू लागेल मॅन्युअल पेक्षा कोटेशनची काम जास्त झाली. थकीत बिलांमुळे नगरसेवक निधीची कामे थांबली आहेत. नगरसेवक निधीतील कामांची बीले लगेच त्यावर्षी कशी अदा होतील हे सांगा.
**मा.आयुक्त श्री.कुलकर्णी :-** रक्कम रु.२५ कोटी मागील थकीत द्यावी लागेल. उत्पन्नाची साधणे वाढवावी लागतील.
**मा.श्री.संपत बारस्कर :-** उपनगरात रस्ते विकास वर रक्कम रु.३० लाख दर्शविले आहेत. हे तर एका वॉर्डला पुरणार नाहीत. उपनगरातील रस्ते नसलेल्या ठिकाणी रस्ते विकास या हेडमध्ये रु.४० लाखाने वाढ करण्यांत यावी.
**मा.सभापती साहेब :-** वाढत्या नागरी वसाहतीच्या दृष्टीने नागरीकांची मागणी विचारात घेवुन आशा ठिकाणी रस्ते करणे क्रमप्राप्त आहे. त्यादृष्टीने उपनगरात रस्ते नसलेल्या ठिकाणी रस्ते करणे, या लेखाशिर्षात ४० लाखाने वाढ करण्यांत यावी.
**मा.श्री.उमेश कवडे:-** उपनगराचे झाले शहराचे काय. शहरात परिस्थिती बिकट आहे. शहर, उपनगर, हद्दवाढीतील परिसर नागरी सुविधा कार्यक्रम या लेखाशिर्षात वाढ करण्यात यावी.
**मा.सभापती साहेब :-** शहर, उपनगर हद्दवाढीतील परिसर नागरी सुविधा कार्यक्रम तरतुद रु.२० लाखाने वाढ करण्यांत यावी.
**मा.श्री. दिप चव्हाण :-** बांधकाम संदर्भात नगरसेवक निधीमध्ये ठेकेदार काम करत नाही कारण त्यांना सिक्युरिटी नाही पैसे निघत नाही. नगरसेवक निधीची बिले निघायची असतील तर रस्ते खडीकरण, मजबुतीकरण ही तरतुद ० ठेवा.
**मा.श्री.संपत बारस्कर :-** असे तुम्ही पेपरला द्याल का. नागरिकांना तोंड द्यावे लागेल.
**मा.श्री.सचिन जाधव :-** सगळा लोड एकाच वर्षी का घेता. टप्प्या टप्प्याने घ्या.
**मा.सभापती साहेब :-** नगरसेवक निधीतील थकलेली यादी निघुन जाईल.
**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** माझा विरोध नोंदवुन घ्या.
**मा.सभापती साहेब :-** ही चर्चा चालू आहे.
**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या पुतळयावर रक्कम रु.१० लाख तरतुद आहे. या पुतळयाला परवानगी मिळेल का.
**मा.श्री.दिप चव्हाण :-** हा पुतळयाचा प्रश्न सोडवा तर हेडस कमी होतील.
**मा.उपायुक्त(सा)डॉ.डोईफोडे :-** पुढे पान नंबर ३२ वर नविन रस्त्यांकरीता ३२ कोटी तरतुद आहे.
**मा.श्री.संपत बारस्कर :-** उपनगराकरीता जेवढी मागची तरतुद आहे तेवढीच ठेवा.
**मा.उपायुक्त श्री.डोईफोडे :-** दोन्हीची पुर्वीचीच तरतुद ठेवा.
**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** पैसे असले तर लगेच बिल निघतात.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** बांधकाम हेड सन२०११-२०१२ दोनदा बदलले व देणे आहे लोकांचे उपोषण सुरू झाले देणे वाढतच चालले रू.२ कोटी ६० लाख देत गेले.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** रू.२० कोटी देणे होते. ते क्लिअर होत नाही काम वाढली परत.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** बजेटची परिस्थिती बांधकामाची थकीत बिल व कामे मागच्या वर्षी रू.१० लाख आले त्यातील काम किती झाले ते सांगा सन २०१३-१४ ला नगरसेवक निधी किती

**शहर अभियंता श्री. मगर :-** रू.७ लाख निधी ६५ नगरसेवक होतो. सगळे मिळून रूपये सव्वा चार कोटीची काम पेंडीग आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ठेकेदार काम करायला तयार नाही. नगरसेवकांच्या निधीतून होणारी कामे करायला कोणी तयार होत नाही.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** उत्पन्नाची साधनाची चर्चा केली त्यावर जास्त काम करावी लागेल आपल्याला येणारी रक्कम आहे कडक उपाययोजना करावी लागेल.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** येणे फार कमी आहे उत्पन्न जमा होत नाही.

**मा.सौ.सुनिता कांबळे :-**पा.नं.६४अ.क्र.४वर वॉर्ड विकास निधी ० दिसतो.वॉर्ड रचना मोठी झाली आहे.नगरसेवकांकडुन प्रभागातील कामांबाबत नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.जास्त तरतुद करा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** वॉर्ड विकास निधी घ्या.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं.६४ अ.क्र.४ वर वाचन

**मा.श्री. दिप चव्हाण :-** वॉर्ड निधी मध्ये काम काय व खर्च किती.

**मा.उपायुक्त श्री.डोईफोडे :-** मागील वर्षी रक्कम रूपये ३ कोटीने तरतुद करण्यांत आली होती.

**मा.सभापती साहेब :-** वॉर्ड विकास निधीमध्ये रक्कम रु.३ कोटी ६५ लाखाची तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** जाहिरात कर , टॉवर याकडे लक्ष दया गाळा भाडे

**मा.श्री. दिप चव्हाण :-** यश पॅलेस ते कोठी रस्ता

**मा.श्री. संपत बारस्कर :-** माझ्या वॉर्डात उपनगरात रस्त्यासाठी फार खर्च लागणार आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** मेटंनस करा. मा. महासभेमध्ये तुम्ही सांगा आम्ही तुम्हाला सपोर्ट करू आम्ही म्हणतो २०,२० दया.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** खडीकरण, मजबुतीकरण एक वर्षा काम थांबवायच

**मा.सभापती साहेब :-** उत्पन्न वाढीसाठी तुम्ही काय करणार.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** १ वर्ष काम थांबवू रू.३० लाख खर्च रस्ते कुठेचे नाही.

**मा.श्री. सचिन जाधव :-** त्याने काम करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** शहर, उपनगर हद्दवाढीतील परिसर नागरी सुविधा कार्यक्रम तरतुद रु.२० लाखाने वाढ करण्यांत यावी.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** बाबासाहेब आंबडेकर पुतळा रू.१० लाख तरतूद,व म.फुले पुतळा तरतूद१० लाख आहे. त्यामधून प्रत्येकी ५ लाख प्रमाणे एकूण रू.१० लाख तरतूद कमी करा.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** रूपये ७१ लाख तरतूद आहे ती तेवढीच ठेवा ३२ नंबरवर रस्तेसाठी रू.५० लाखाची आहे ती ठेवा वाढवू नका पण ती पूर्वीची आहे तेवढीच ठेवा.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** रू. १५ लाखाचे करा अतिक्रमण काढलेल्या रस्त्या संबंधी

**मा.श्री.संपत बारस्कर :-** उदयान व तार कंपौड संबधी रू. १५ लाख आहे ती वाढवा कमी करू नका.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** मागील वर्षी ५० लाख होते त्यामधील फक्त २० लाख रुपयेच खर्च झाले.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** जेवढे खर्च होतील तेवढे होवू द्या.

**मा. सभापती साहेब :-** युआयडीएसएसएमटी योजना प्रकल्प अहवाल मनपा हिस्सा तरतुद रु.५ लाखाने कमी करण्यांत यावी.

**मा.श्री.अजिंक्य बोरकर :-** या अर्थसंकल्पात पर्यटन विकासाच्या दृष्टीने काहीच तरतुद नाही. शहराला मोठा ऐतिहासिक व धार्मिक वारसा आहे त्यासाठी तरतुद करा. आज तरतुद केली तर पुढे पर्यटनात वाढ होईल त्यातुन उत्पन्नही मिळू शकेल.

**मा.सभापती साहेब :-** अहमदनगर शहर व नजीकच्या परिसरामध्ये ऐतीहासीक,धार्मीक व सांस्कृतीक अशा विविध महत्वपूर्ण बाबी असून या महत्त्वपूर्ण स्थळांची महिती होण्याच्या दृष्टिने पर्यटन विकासास चालना देणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने नवीन लेखशिर्ष निर्माण करण्यात येउन त्यामध्ये १५ लाख रकमेची तरतूद करण्यात यावी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** वॉर्ड विकास निधी लेखाशिर्ष कसे आले.

**अर्थ विभाग श्री.लोंढे :-**वॉर्ड विकास निधी सन २०१२-१३ बजेट सादर केले त्यावेळी स्थायी समितीने शिफारस केली होती.या लेखाशिर्षाखाली तरतूद करा म्हणून महासभेने मान्यता देउन निधी खर्ची पडला.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** कॅफोनी नियमावली तयार करून हा लेखाशिर्ष तयार केला रिकव्हरी निघाल्यास ते जबाबदार राहतील. या वॉर्ड विकास निधी बाबत कायदेशीर तरतुद पाहुन कार्यवाही करा.

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** पान नं.६४ अ.क्र. ११ वर वाचन.

**मा.सौ.सुनिता कांबळे :-** केडगाव अमरधारम येथील दहन जाळया तुटलेल्या आहेत तर काही जाळयांची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. अंत्यविधीस आलेल्या नागरिकांना बसण्याची जागा अपुरी पडत आहे तसेच दहन ओटयांची संख्या कमी आहे. अंत्यविधीस बाहेरगांवचे येणारे नागरिक अमरधाममध्ये असलेल्या अपु-या सुविधेबाबत उपहासात्मक चर्चा करीत असतात. याकरीता दहन ओटयांची संख्या एकने वाढवावी व त्यावरती पत्र्याची शेड बांधावे तसेच नागरिकांना बसण्यासाठी ओटे बांधण्यात यावे. केडगाव अरमधाम दुरूस्ती व नुतनीकरणासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात यावी.

भाग्योदय मंगल कार्यालय हे सुमारे १५ ते २० वर्षापुर्वी बांधलेले आहे. या कार्यालयाचा वापर नागरिक, लग्नकार्यासाठी करीत असतात. मंगलकार्यालयाची सांडपाणी वाहुन नेण्याची व्यवस्था, लाईट व्यवस्था, पाण्याच्या पाईप लाईन, नळ कनेक्शन, फर्शी , प्लास्टर,रंगरंगोटी, शौचालयाची मोठया प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. मंगलकार्यालयाचे भाडे भरूनही नागरिकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध होत नाहीत. मंगलकार्यालय हे महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नाची बाब असुनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे. भाग्योदय मंगलकार्यालय दुरूस्ती व नुतनीकरणासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात यावी.

केडगाव अंबिकानगर येथील शिवाजी मंगल कार्यालयाच्या सामोरील रहदारीच्या रस्त्यावर भाजी विक्रेते भाजी विकण्यासाठी बसत असतात. या रस्त्यावर नेहमी नागरिकांची वर्दळ असते. रस्त्याच्या कडेला असलेल्या घरासमोरच भाजी विक्रेते बसत असल्यामुळे घरमालकांना जाण्या येण्यास अडथळे येत असुन त्यांच्यामध्ये नेहमी वादविवाद होत असतात. त्याकरीता बालाजी कॉलनी, नवीन गावठाण, भाग्योदय शॉपींग कॉम्पलेक्स, केडगाव येथे महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या ओपन स्पेसमध्ये भाजी विक्रेत्यासाठी ओटे बांधल्यास भाजी विक्रेत्यांचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल. भाजी विक्रेत्यांसाठी ओटे बांधण्यासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात यावी.

**मा.श्री. शेख फाय्याज / मा.सौ. सुनिता कांबळे :-** उपमहापौर निधीसाठी किती तरतूद करणार ? इतर सर्व तरतुदीत वाढ होत असताना यामध्ये का नाही ? शहरातील नागरिक, विविध सामाजिक संघटना, महिला संघटना मा. उपमहापौर यांचेकडे विविध प्रकारच्या नागरी समस्या घेवून येत असतात. त्यांचे काम होईल. नक्की मार्गी लागेल अशी अपेक्षा असल्यानेच ते येत असतात वेळप्रसंगी रोजच्या जिवनाशी निगडीत गटर, ड्रेनेज लाईट, पाणी समस्या सोडविण्यासाकरिता सुविधेची मागणी करतात अशा वेळेस निधी उपलब्ध होत

नसल्याने कामे मार्गी लागत नाही. यामुळे नागरिकांच्या मनामध्ये विनाकारण त्यांच्या विषयी नाराजीची भावना निर्माण होते. हे टाळणेकरीता व महानगरपालिकेविषयी जनतेत कामाबाबत चांगला संदेश जाणे महत्वाचे आहे याकरीता उमहापौर निधी हा रूपये एक कोटी करण्यात यावा. बोल्हेगांव, सावेडी , नागापुर, केडगांव , फकिरवाडा, मुंकुंदनगर व अन्य उपनगरे विकसीत होत असल्याने त्यांना सक्षम नागरी सुविधा पुरविणे व शहर विकासास चालना देणे करीता या भागामध्ये नागरी सुविधा देणे करीता विशेष तरतूद तयार करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब /मा.श्री.सचिन जाधव :-** कत्तलखाना विकसित करणे मनपा हिस्सा रु.५ लाखाने तरतुद कमी करण्यांत यावी.

**मा.सौ. सुनिता कांबळे :-**स्मशानभुमी साठी रू. २० लाख तरतुद केली आहे ती वाढवावी.

**मा.सभापती साहेब :-** शहरातील अमरधाम व केडगांव अमरधाम येथील कामे करण्याच्या दृष्टीने तसेच नविन स्मशानभुमी विकसीत करण्यासाठी शिफारस करण्यांत येत असुन सदरची तरतुद १२ लाख रुपयांनी वाढविण्यांत यावी.

**नगररचनाकार श्री. तारळकर :-** अ.क्र. ५९, नागापूर ,अ.क्र.५८ नागपूर,४२,४३ नागापूर आ.क्र.५१ सावेडी , शिरसाठ मळा , पाउुलबुधे शाळे जवळ,

**मा. सभापती साहेब :-** उपनगरातील फायनल झालेले आराखडया बाबत जे नगरसेवक आहे ते एकत्र बसवून मिटींग घ्या. ताब्यात जागा घेतली का ?

**मा.श्री. दिप चव्हाण :-** महानगरपालिकेचे आरक्षण कायम झाले का ? ताब्यात घ्यायची असेल तर भूसंपादन करायला टाकी पाहिजे काम सुरू करा.

**मा.आयुक्त श्री. कुलकर्णी :-** दरवर्षी एक यादी प्रॉयॉरीटी असते पॅरलेले रोड कुठे येतात या व्यक्तीरिक्त आरक्षण असेल.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** आरक्षण किती साली पडल.

**अतिक्रमण वि. श्री.इथापे :-**आरक्षण क्र.५१, निर्मलनगररोड, वडगांवगुप्तारोड संपते तिथे १ आहे.

**मा.श्री.उमेश कवडे :-** आरक्षण असताना आपण जर ताब्यात जागा घेतली नाही. तर परत मालकाच्या ताब्यात जागा जाते का ?

**नगररचनाकार श्री. तारळकर:-** अंमलात आलेल्या तारखापासून १० वर्षापर्यत

**मा.श्री. सचिन जाधव :-** जेव्हा आपण जागा ताब्यात घेतली नाही तर त्याच्यावर पैसे टाकून उपयोग काय.

**नगररचनाकारश्री.तारळकर :-**आरक्षण ताब्यात घ्यायचे म्हटले तर भूसंपादनासाठी बजेटमध्ये तरतूद करावी.

**मा.श्री.आयुक्त श्री. कुलकर्णी :-**भुसंपादनापेक्षा आरक्षणासाठी T.D.R च्या माध्यमातून घेणे सोयीचे होईल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महानगरपालिकेचे कर्मचारी यांच्या करिता घरकुल योजना राबविणेबाबत कर्मचारी यांनी ब-याच वेळा अर्ज दिले आहेत. त्यांच्या घराबाबत निर्णय घ्यावा.

**मा.श्री. उमेश कवडे :-** सफाई कामगारांना घरकुल योजना सध्या चालू आहे. परंतू इतर कर्मचा-यांना घरकुल योजना नसल्याचे दिसुन येते.

**मा.सभापती साहेब :-** महानगरपालिका कर्मचारी घरकुल योजना राबविणेकरीता रक्कम रु.१० लक्षची प्राथमिक तरतुद करण्यांत यावी. यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करण्यांत यावे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** महापौर विकास निधी पूर्वी आहे तेवढा ठेवा.

**मा.श्री. उमेश कवडे :-** नेप्ती नाक चौक सुधारणा करा.

**मा.सभापती साहेब :-** चौक सुधारणा व रुंदीकरण रूपये ५ लाखात काय होणार आहे. आणखी रु.५ लाख वाढविण्यांत यावेत.

**मा.आयुक्त श्री.कुलकर्णी :-** चौक सुधारणेसाठी स्पॉन्सर जे आहे त्यातून फायदाचे होईल.

**मा.सौ. सुनिता कांबळे :-** महापौर शहर विकास निधी, उपमहापौर शहर विकास निधी, स्थायी समिती सभापती शहर विकास निधीत वाढ करा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** महापौर शहर विकास निधी पुर्वी आहे तेवढाच ठेवा. उपमहापौर शहर विकास निधी रु.५० लाख व स्थायी समिती सभापती शहर विकास निधीमध्ये ५० लाख रुपयांची तरतुद करण्यांत यावी. तसेच सभापती महिला व बालविकास निधी १५ लाख, उप सभापती महिला व बालविकास निधी १० लाख इतकी तरतुद करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पदाधिकारी यांचेकडे नागरी सुविधेची मागणी करणेकामी नागरीकांचे शिष्टमंडळे येतात. तसेच इतरही मा.सदस्य सुचना करतात या सर्व बाबींचा विचार करुन पुढील प्रमाणे लेखाशिर्ष निहाय तरतुदी करण्यांस ही सभा शिफारस करीत आहे. महापौर शहर विकास निधी ३ कोटी २५ लाख. उपमहापौर शहर विकास निधी रु.५० लाख व स्थायी समिती सभापती शहर विकास निधीमध्ये ५० लाख रुपयांची तरतुद करण्यांत यावी. तसेच सभापती महिला व बालकल्याण समिती, विकास निधी १५ लाख, उपसभापती महिला व बाल कल्याण विकास निधी १० लाख इतकी तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** थकीत देयक महत्वाचा विषय

**अर्थ विभाग श्री. लोंढे :-** रूपये २६ कोटी बांधकाम विषयी

**मा.श्री. दिप चव्हाण :-** देणे बंधनकारक आहे.

**मा.सभापती साहेब :-** आपल्याकडे कुणी कोर्टात गेले नाही ही जमेची बाजू आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** अंदाजपत्रकीय सभेत झालेली चर्चा तसेच प्रस्तावातील दुरूस्ती व फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

**मा.श्री.अजिंक्य बोरकर :-** अंदाजपत्रकीय सभेत झालेली चर्चा तसेच प्रस्तावातील दुरूस्ती व फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

**मा.सभापती साहेब :-** विविध विभागांचे कर दर वाढवणे बाबत बजेटमध्ये आलेले प्रस्ताव हे दि.२० फेब्रुवारी पुर्वी मनपाने मंजूरी दिल्यास वाढवता किंवा कमी करता येतात. अशी तरतूद कायदयात आहे. याबाबत मा. शासनाकडून प्रशासनाने मागविलेले मार्गदर्शन अद्याप आले नाही, असे उपायुक्त यांनी सांगीतले त्यामुळे कायदयातील तरतुदीनुसार पुढील प्रस्ताव क्र. १ ते ९ स्थायी समिती विचारात घेउ शकत नाही.

मा.आयुक्त साहेब यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सभेमध्ये चर्चा करून शिफारशी केल्या असुन त्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये दुरूस्त्या, फेरफार व शिफारशीसह सन २०१३-२०१४ सालचे सुधारित सन २०१४-२०१५ सालचे बाबवार अंदाजपत्रक मनपाचे स्कुल बोर्डाचे शेअर्ससह महानगरपालिका सभे पुढे सर्वानुमते सादर करण्यांत यावे.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सर्व मा.स्थायी समिती सदस्य,अधिकारी,कर्मचारी यांनी सभा पार पाडणे कामी केलेल्या सहाकार्याबद्दल सर्वांचे आभार मानतो.आजची मा.स्थायी समिती बजेटवरील बैठक संपल्याचे जाहिर करतो.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५ अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१३-२०१४ चे सुधारित व सन २०१४-२०१५चे मा.आयुक्त सादर करणार असलेले मुळ उत्पन्न व खर्चाचे अंदाज (म.न.पा.स्कुल बोर्डासह ) विचारार्थ व त्या सोबतचे दरवाढ करणेबाबत सादर केलेले प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर पाहिले.

विविध विभागांचे कर दर वाढवणे बाबत बजेटमध्ये आलेले प्रस्ताव हे दि.२० फेब्रुवारी पुर्वी मनपाने मंजूरी दिल्यास वाढवता किंवा कमी करता येतात. अशी तरतूद कायदयात आहे. याबाबत मा. शासनाकडून प्रशासनाने मागविलेले मार्गदर्शन अद्याप आले नाही, असे उपायुक्त यांनी सांगीतले त्यामुळे कायदयातील तरतुदीनुसार पुढील प्रस्ताव क्र. १ ते ९ स्थायी समिती विचारात घेउ शकत नाही.

**प्रस्ताव क्र.१** :- आरोग्य (दवाखाना) विभाग- दवाखाने व आरोग्य केंद्रामध्ये घेण्यात येणा-या औषधांच्या फी बाबत तसेच नवीपठे दवाखाना येथील एक्स-रे तपासणी च्या शुल्का बाबत.

**प्रस्ताव क्र.२** :- आरोग्य विभाग- महापौर दुर्धर निधी मधून आर्थिक मदतीबाबत.

**प्रस्तावक्र.३**:-आरोग्य विभाग-फिरता दवाखाना वैद्यकीय सेवेचे शुल्क निश्चित करणे

**प्रभाग क्र.**४ :-आरोग्य (जन्म- मृत्यु) विभाग- जन्म- मृत्यू दाखले दुरूस्ती कामी महापालिकेकडून शुल्क आकारणे बाबत.

**प्रस्ताव क्र.५**:- अतिक्रमण विभाग- विविध शुल्कांबाबत.

**प्रस्ताव क्र. ६ :-** अग्निशमन सेवा- सेवा शुल्क फी मध्ये वाढ करणेबाबत

**प्रस्ताव क्र. ७ :-** अग्निशमन विभाग- अग्निशमन कर लावणेबाबत

**प्रस्ताव क्र. ८ :-** अग्निशमन विभाग- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना २००९ अन्वये अग्निशमन सेवा फी बसविणे व फी मध्ये वाढ करणेबाबत.

**प्रस्ताव क्र.९ :-** घनकचरा विभाग घनकचरा संकलन व वाहतुक सेवा शुल्का दराबाबत

अ.नगर महानगरपालिकेचे सन २०१३-२०१४ सालचे सुधारित व सन २०१४-२०१५ सालचे म.न.पा. स्कुल बोर्डासहचे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करित आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१३-२०१४ सालचे सुधारित व सन २०१४-२०१५ सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे. (**सोबत**- सन २०१४-२०१५ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता)

मा.आयुक्त साहेब यांनी मनोगतामध्ये व्यक्त केलेली कामे व सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाययोजना करणेस ही सभा शिफारस करित आहे.

**तसेच**

*GIS प्रणालीच्या माध्यमातून सर्वसाधारण कर वसुलीमध्ये वस्तुनिष्ठपणाच्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढणार असल्याने सर्वसाधारण करामध्ये अपेक्षीत उत्पन्नाची आकडेवारीत २० टक्के ने वाढ सुचविणेस ही सभा मान्यता देत आहे.

*स्थानिक संस्था कराच्या माध्यमातून मिळाणा-या उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीने प्रभावी उपाययोजना करण्यात यावी व उत्पन्नाच्या तरतुदी मध्ये रूपये ५० लाख वाढ दर्शविणेत यावी.

*नवीन वैद्यकीय व्यावसायिकांचा शोध घेवून बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत फी पासुन मिळणा-या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने कार्यवाही करावी. यास्तव रु.१ लाखाने तरतुदीमध्ये वाढ दर्शविण्यांत यावी.

*GIS कार्यप्रणालिच्या माध्यमातुन सुरु असलेल्या सर्व्हे व्दारे नविन मालमत्तेची माहिती उपलब्ध होणार आहे त्यादृष्टीने मालमत्ता नोंदणी फी बाबत नव्याने दाखल होणा-या प्रकरणांचा ओघ पहाता तरतुद उत्पन्नात रु.५० लाख वाढ करावी.

*जाहीरात बोर्ड जागा भाडे ही बाब उत्पन्नाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असुन या विभागाकरीता कर्मचारी वर्ग वाढविण्यांत येवून संपुर्ण शहराचा सर्व्हे करुन वसुली केल्यास निश्चितच उत्पन्नात भर पडेल. शहराचा वाढता विस्तार व व्यवसाय लक्षात घेता या माध्यमातुन सुमारे १ कोटी रुपये उत्पन्न मिळू शकेल. यास्तव तशी तरतुद करण्यांत यावी.

*महानगरपालिका शाळा भाडे पासुन मिळणा-या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने थकबाकी वसुली व अन्य उपाययोजना कराव्यात. रु.१० लाखाने उत्पन्नात वाढ दर्शविण्यांत यावी.

*गणेशोत्सव, मोहरम, नाताळ, नवरात्र उत्सव या धार्मिक उत्सवाच्या आयोजनासह राष्ट्रपुरुषांची जयंती तसेच पुण्यतिथी या निमित्ताने शहरामध्ये विविध सामाजिक संस्था मांडव टाकतात, त्यासाठी महानगरपालिका भाडे आकारणी करीत असते. त्यास माफी देणे बाबत ही सभा शिफारस करीत आहे. उत्पन्नाच्या तरतुदीमधुन रु.१ लाख उत्पन्न कमी दर्शविण्यांत यावे.

*महानगरपालिकेस असणा-या सुट्टीच्या दिवशी किंवा विनापरवाना शहरामध्ये ब-याच ठिकाणी रस्ते फोडणे, ड्रेनेज व पिण्याच्या पाण्याची लाईन जोडणे असे प्रकार घडल्याचे निदर्शनास येत आहे याकरीता सदर बाबत बारकाईने लक्ष देवुन अशा प्रकारच्या कामाची फी वसुल केल्यास निश्चितच उत्पन्नात भर पडेल. यादृष्टीने उपाय योजना करण्यांत यावी. यामध्ये ३० लाख रुपयांनी तरतुदीमध्ये वाढ दर्शविण्यांत यावी.

*विनापरवाना मोबाईल टॉवरचा शोध घेवून याबाबत नियमानुसार कार्यवाही करुन दंडनिय कारवाईच्या माध्यमातुन उत्पन्न मिळविणे बाबत यापुर्वी मा.महासभेने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यांत यावी. या कारवाईमुळे सुमारे १ कोटी रुपये रक्कम महानगरपालिकेस उपलब्ध होवू शकेल त्यानुसार अंदाजपत्रकामध्ये मोबाईल टॉवर दंड कारवाई करणे असे लेखाशिर्ष तयार करण्यांत येवून त्यामध्ये सदरची तरतुद दर्शविण्यांत यावी.

*नगरसचिव विभागाचा आकस्मिक खर्चाची तरतुद रु.१ लाखाने वाढविण्यांत यावी.

*मा.शासनाकडुन सिटी सर्व्हेचे काम मोफत होणेच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यांत यावा तसेच याकामी महानगरपालिकेस खर्च करण्याच्या दृष्टीने रक्कम रु.३ लाख तरतुद ठेवण्यांत यावी.
* हातगाडया, ढकलगाडया, सायकल रीक्षा, कचकुंडया दुरुस्ती याकरीता रु.३ लाखाची तरतुद असुन ती टोकन तरतुद रु.१ हजार करण्यांत यावी.

*खाजगी तत्वावर कचरा संकलन करणे या लेखाशिर्षा अंतर्गत असणारी तरतुद रु.२५ लाख कमी करण्यांत यावी.

*खाजगी तत्वावर शौचालय देखभाल दुरूस्ती करीता रक्कम रूपये २५ लाखा ऐवजी ६ लाख करण्यात यावी.
* अंत्यविधी खर्च योजना रु.१० लाखाने वाढविण्यांत यावी.

*नागापूर, बोल्हेगांव, सावेडी परिसरातील नागरिकांना अमरधाम हे लांब अंतरावर असल्याने खर्चिक आहे. सद्यस्थितीत वरील उपनगरामध्ये अमरधामची व्यवस्था नसल्याने शव पायी नेणे शक्य होत नाही. गरीब व गरजू नागरिकांसाठी ॲम्ब्युलन्स मधुन शव नेणे आर्थिक दृष्टया न परवडणारे असल्याने शववाहिका (रथ) व ॲम्ब्युलन्स करीता रक्कम रु.८ लाखाने तरतुद वाढविण्यांत यावी.

*प्रभाग समिती क्र.४ लगत ओपनस्पेस विकसीत करण्यासाठी रक्कम रु.१४ लाखाची तरतुद करण्यांस ही सभा शिफारस करीत आहे. स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करण्यांत यावे.

*बुरुडगांव रोड व केडगांव या भागात उद्यान विकसीत करणे तरतुदीमध्ये प्रत्येकी ५ लाखाने वाढ करावी. तसेच सारसनगर, बोल्हेगाव परिसर, कॉटेज कॉर्नर जवळ, मुकुंदनगर, येथे उद्याने विकसीत करणेकामी शिफारस करण्यांत येत आहे. याकामी प्रत्येकी १० लाख रक्कमेची तसेच कल्याण रोड येथील नालेगांव स.नं.३३/१,३४ या भागास रु.१५ लाख तसेच नालेगाव स.नं.५/२ संभाजीनगर रू.५ लाख अशी तरतुद करण्यांत यावी. तसेच यासह नव्याने येणा-या प्रस्तावाबाबत देखिल योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

* महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळा दुरुस्ती करीता तरतुद रक्कम रुपये २ लाखाने वाढविण्यांत यावी.

*४ झोनचे ४ ठेकेदार नेमा.कचरा संकलन व वाहतुक प्रभाग निहाय टेंडर काढावे.तसेच हॉटेल वेस्ट, भाजी मार्केट,फळ मार्केट यांचे साठी हॉस्पीटल वेस्टेज च्या प्रमाणे स्वतंत्र टेंडर काढावे.

*वाढत्या नागरी वसाहतीच्या दृष्टीने नागरीकांची मागणी विचारात घेवुन आशा ठिकाणी रस्ते करणे क्रमप्राप्त आहे. त्यादृष्टीने उपनगरात रस्ते नसलेल्या ठिकाणी रस्ते करणे, या लेखाशिर्षात ४० लाखाने वाढ करण्यांत यावी.

*शहर, उपनगर हद्दवाढीतील परिसर नागरी सुविधा कार्यक्रम तरतुद रु.२० लाखाने वाढ करण्यांत यावी.

*बुरुडगांवरोड भागातील राजर्षी शाहु महाराज व्यायाम शाळा दुरुस्ती करण्यासाठी रक्कम रु.१० लाखाची तरतुद व आनंदी बाजार येथील वरदविनायक जीम करीता १५ लक्ष रुपयांची तरतुद करण्यांस ही सभा शिफारस करीत आहे. स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करण्यांत यावे.

* कंटेनर,कॉम्पॅक्टर,डंपर प्लेसर इ.खरेदी करिता तरतुद रूपये ४९लाख वाढ करण्यात यावी.

*वॉर्ड विकास निधीमध्ये रक्कम रु.३ कोटी ६५ लाखाची तरतुद करावी.

*युआयडीएसएसएमटी योजना प्रकल्प अहवाल मनपा हिस्सा तरतुद रु.५ लाखाने कमी करण्यांत यावी.

*सीना नदी प्रदुषण प्रतिबंधा बाबत तात्पुरती उपाययोजना या कामाकरीता मा.राज्य शासन,केंद्र शासन यांचेकडून अर्थसहाय्य मिळण्याच्या दृष्टिने पाठपुरावा करणेबाबत ही सभा शिफारस करीत आहे. सीना नदी प्रदुषण प्रतिबंधा बाबत तात्पुरती उपाययोजना या कामाकरीता १० लाख इतकी तरतुद ठेवण्यात यावी.

*अहमदनगर शहर व नजीकच्या परिसरामध्ये ऐतीहासीक,धार्मीक व सांस्कृतीक अशा विविध महत्वपूर्ण बाबी असून या महत्त्वपूर्ण स्थळांची महिती होण्याच्या दृष्टिने पर्यटन विकासास चालना देण्यो गरजेचे आहे. त्यादृष्टिीने नवीन लेखशिर्ष निर्माण करण्यात येउन त्यामध्ये १५ लाख रकमेची तरतूद करण्यात यावी.

*कत्तलखाना विकसित करणे मनपा हिस्सा रु.५ लाखाने तरतुद कमी करण्यांत यावी.

*शहरातील अमरधाम व केडगांव अमरधाम येथील कामे करण्याच्या दृष्टीने तसेच नविन स्मशानभुमी विकसीत करण्यासाठी शिफारस करण्यांत येत असुन सदरची तरतुद १२ लाख रुपयांनी वाढविण्यांत यावी.

*चौक सुधारणा व रुंदीकरण रूपये ५ लाखात काय होणार आहे. आणखी रु.५ लाख वाढविण्यांत यावेत.

*अहमदनगर महानगरपालिकेचे पदाधिकारी यांचेकडे नागरी सुविधेची मागणी करणेकामी नागरीकांचे शिष्टमंडळे येतात. तसेच इतरही मा.सदस्य सुचना करतात या सर्व बाबींचा विचार करुन पुढील प्रमाणे लेखाशिर्ष निहाय तरतुदी करण्यांस ही सभा शिफारस करीत आहे. महापौर शहर विकास निधी ३ कोटी २५ लाख. उपमहापौर शहर विकास निधी रु.५० लाख व स्थायी समिती सभापती शहर विकास निधीमध्ये ५० लाख रुपयांची तरतुद करण्यांत यावी. तसेच सभापती महिला व बालकल्याण समिती, विकास निधी १५ लाख, उपसभापती महिला व बाल कल्याण विकास निधी १० लाख इतकी तरतुद करण्यांत यावी.

*महानगरपालिका कर्मचारी घरकुल योजना राबविणेकरीता रक्कम रु.१० लक्षची प्राथमिक तरतुद करण्यांत यावी. यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करण्यांत यावे.

* डॉ.बाबासाहेब आंबेडकर आवास योजना मनपा हिस्सा मा.आयुक्त साहेब यांचे दि.२०/५/२०१४ चे पत्रान्वये मा. शासन अनुदान व मनपा हिस्सा मिळुन येणारी रक्कम कमी पडल असल्याने तरतुदी रूपये २५ लाखामध्ये रू. १ कोटीची वाढ करून रू.१ कोटी २५ लाख करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

*नागापूर, बोल्हेगांव , सावेडी या भागातील नागरिकांची सोय व्हावी या दृष्टीने या तिन्ही भागांना मध्यवर्ती,जवळ असेल अशा ठिकाणी महिला व लहान मुले यांच्या करिता कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या धर्तीवर प्रसुतीगृह व बालरूग्णालय उभारण्याच्या दृष्टीने महिला व बाल कल्याण समिती ने पुढाकार घ्यावा.
*सिध्दीबाग येथील फुलराणी खासगी तत्वावर चालविणे बाबत उद्यान विभागाने ऑफिस रिपोर्ट सादर करावा.
*शहरातील कै.बाळासाहेब देशपांडे उद्यान (सिध्दीबाग) व महालक्ष्मी उद्यान खासगी तत्वावर चालविण्यास देण्याबाबत प्रस्ताव सादर करावा. याबाबतची कार्यवाही त्वरीत करावी. श्री.मगर व श्री.गोयल यांनी यामध्ये विशेष लक्ष देवुन कार्यवाही करावी.
*नविन संगणक खरेदी रु.२० लाख तरतुद आहे ती ४ लाखाने कमी करुन संगणक साहित्य हार्डवेअर सॉफ्टवेअर खरेदी या हेडमध्ये ४ लाखाने वाढ करण्यांत
* रक्त संकलन करणेसाठी नविन वाहन खरेदी करणेची ही सभा शिफारस करीत आहे. रक्कम रु. १५ लाखाची तरतुद करण्यांत यावी. नविन लेखाशिर्ष निर्माण करण्यांत यावे.

अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०१४-२०१५ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या स्कुल बोर्डासह शेअर्ससह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अजिंक्य बोरकर सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
(श्री.किशोर आसाराम डागवाले,)
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत** :- सन २०१४-२०१५ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता

**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर.**

**मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २०१४-२०१५चा अर्थसंकल्प**

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१४).................................................... ९३३५०१३१**

**एकुण जमा.......................................................................................... ५९४८९६४०००**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा......................................................... ६०४२३१४१३१**

**एकुण खर्च.......................................................................................... ५९९०४८९०००**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१५).................................................. ५१८२५१३१**

| अ.नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू)** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ३३४५२२००० | ५०१७८००० | | ३८४७००००० |
| २ | वृक्ष कर | ५९३००० | ६२२६००० | | ६८१९००० |
| ३ | विशेष स्वच्छता कर | २७८३००० | ४१७००० | | ३२००००० |
| ४ | जाहिरात कर | ३९१००० | ५८००० | | ४४९००० |
| ५ | शो कर | ४०००० | ६००० | | ४६००० |
| ६ | घनकचरा व्यवस्थापन- सेवा कर | ७२९६३००० | १०९४४००० | | ८३९०७००० |
| ७ | ड्रेनेज कर | १९६०२००० | २९४००० | | १९८९६००० |
| ८ | मललाभ कर | ५८५०००० | ८७७००० | | ६७२७००० |
| ९ | जललाभ कर | ५८५०००० | ८७७००० | | ६७२७००० |
| १० | रस्ता कर | २२८५८००० | ३४२८००० | | २६२८६००० |
| ११ | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईचे उत्पन्न | ० | १००००००० | | १००००००० |
| १२ | **स्थानिक संस्था कर** | **४८०००००००** | **५००००००** | | ४८५०००००० |
| १३ | मुंबई नर्सिंग होम ॲक्ट फी | १५०००० | १००००० | | २५०००० |
| १४ | मालमत्ता नाव नोंदणी फी | २००००००० | ५०००००० | | २५०००००० |
| १५ | जाहिरात बोर्ड जागा भाडे | ३००००० | ९७००००० | | १००००००० |
| १६ | मनपा शाळा भाडेपासुन उत्पन्न | २०००००० | १०००००० | | ३०००००० |
| १७ | सामान भाडे, जागा भाडे | २००००० | | १००००० | १००००० |
| १८ | रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर | ३०००००० | ३०००००० | | ३३०००००० |
| | | | | | |
| | **एकूण** | **९९८१०२०००** | **१०७१०५०००** | **१०००००** | **११०५१०७०००** |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नवीन संगणक खरेदी | २०००००० | | ४००००० | १६००००० |
| २ | संगणक साहित्य, हार्डवेअर, सोफ्टवेअर खरेदी/ दुरुस्ती (सर्व विभाग) | ६००००० | ४००००० | | १०००००० |
| ३ | नगर सचिव विभाग आकस्मिक खर्च | ३००००० | १००००० | | ४००००० |
| ४ | सिटी सर्व्हे- सावेडी गावठाण | २०००००० | | १७००००० | ३००००० |
| ५ | हातगाड्या, ढकलगाड्या, सायकल रिक्षा, कचर कुंडी दुरुस्ती | ३००००० | | २९९००० | १००० |
| ७ | खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतूक करणे, वाहन खरेदी, डिझेल इ. खर्च | ३५०००००० | | २५००००० | ३२५००००० |
| ८ | सार्व, शोचालय देखभाल व दुरुस्ती | २५००००० | | १९००००० | ६००००० |
| ९ | कोंडवाडा बांधकाम करणे | ४००००० | २००००० | | ६००००० |
| १० | अंत्यविधी खर्च योजना | १०००००० | १०००००० | | २०००००० |
| ११ | नवीन शववाहिनी व ॲम्बुॅलन्स खरेदी | १०००००० | ८००००० | | १८००००० |
| १२ | पिंजरे खरेदी | १००००० | | ९९००० | १००० |
| १३ | कार्यालय/ शाळा दुरुस्ती | २००००० | २००००० | | ४००००० |
| १४ | महापौर शहर विकास निधी | ० | ३२५००००० | | ३२५००००० |
| १५ | उपमहापौर शहर विकास निधी | ० | ५०००००० | | ५०००००० |
| १६ | स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ० | ५०००००० | | ५०००००० |
| १७ | सभापती- महिला व बाल शहर विकास निधी | ० | १५००००० | | १५००००० |
| १८ | उपसभापती- महिला व बाल शहर विकास निधी | ० | १०००००० | | १०००००० |
| १९ | वॉर्ड विकास निधी | ० | ३६५०००००० | **०** | ३६५०००००० |
| २० | उपनगरातील रस्ते नसलेल्य ठिकाणी रस्ते विकास | ३०००००० | ४०००००० | | ७०००००० |
| २१ | शहर, उपनगर, हद्दवाढीतील परिसर नागरी सुविधा कार्यक्रम | ५०००००० | २०००००० | | ७०००००० |
| २२ | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार खर्च (यु. आय. डी एस. एस. एम. टी.) | ७५००००० | | **५०००००** | ७०००००० |
| २३ | सिनानदी प्रदुषण प्रतिबंधबाबत तात्पूर्ती उपाययोजना | ५०००००० | | **४००००००** | १०००००० |
| २४ | नगर शहर पर्यटन विकास निधी. | ० | १५००००० | | १५००००० |
| २५ | कत्तलखाना विकसीत करणे मनपा हिस्सा | १०००००० | | **५०००००** | ५००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६ | स्मशानभूमी सुधारणा व नवीन स्मशानभूमी | १८००००० | १२००००० | | ३०००००० |
| २७ | चौक सुधारणा व रूंदीकरण | ५००००० | ५००००० | | १०००००० |
| २८ | मनपा कर्मचारी घरकूल योजना | ० | १०००००० | | १०००००० |
| २९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आवास योजना मनपा हिस्सा | २५००००० | १००००००० | | १२५००००० |
| ३० | IHSDP/RAY/HUDCO/यु.आय.डी.एस.एस. एम.टी योजना प्रकल्प अहवाल मनपा हिस्सा | ४०००००० | | ५००००० | ३५००००० |
| ३१ | डेपो सुधारणा व खत प्रकल्प उभारणी | ३००००००० | | ५०००००० | २५०००००० |
| ३२ | नाका भाडे, बांधकाम, दुरुस्ती व स्थलांतर | १०००००० | १०००००० | | २०००००० |
| ३३ | मशिनरी खरेदी व दुरुस्ती (रक्तपेढी/दवाखाने | ५०००० | १५०००० | | २००००० |
| ३४ | नवीन वाहन खरेदी (रक्तपेढी ) | ० | १५००००० | | १५००००० |
| ३५ | प्रभाग समिती क्र. ४ कार्यालयालगत ओपन स्पेस विकसीत करणे | ० | १४००००० | | १४००००० |
| ३६ | बुरुडगाव रोड व केडगाव या उपनगरामध्ये उद्यान विकसीत करणे (प्रत्येकी १५ लाख) | २०००००० | १०००००० | | ३०००००० |
| ३७ | सारसनगर, बोल्हेगाव परिसर, कॉटेज कॉर्नर जवळ, मुकुंदनगर (प्रत्येकी दहा लाख) व कल्याण रोड येथील नालेगाव स. न. ३३/१,३४ येथे (१५ लाख), नालेगाव स.न. ५/२ संभाजीनगर येथे (५ लाख) उद्यान विकसीत करणे. | ० | ६०००००० | | ६०००००० |
| ३८ | राजर्षी शाहू महाराज व्यायाम शाळा दुरुस्ती | ० | १०००००० | | १०००००० |
| ३९ | वरद विनायक हेल्थ क्लबकरीता जीम साहित्य खरेदी | ० | १५००००० | | १५००००० |
| ४० | कटेनर, कॉम्पॅक्टर, डंपर प्लेसर इ. खरेदी | १००००० | ४९००००० | | ५०००००० |
| | | | | | |
| | **एकूण** | **१०८८५००००** | **१२२८५००००** | **१७३९८०००** | **२१४३०२०००** |

सही /-
(श्री.किशोर आसाराम डागवाले,)
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.